סדר חמש תעניות·

THE FIVE JEWISH FASTS.

इस्राएलांचीं पंचोपोषणें·

किंमत एक रुपया दहा आणे·

THE

PRAYERS

OF THE

FIVE JEWISH FASTS.

TRANSLATED

From Hebrew into Marathi

BY

JOSEPH EZEKIEL RAJPURKAR,

HEAD MASTER, DAVID SASSOON BENEVOLENT INSTITUTION,

FELLOW OF THE UNIVERSITY OF BOMBAY,

AND

JUSTICE OF THE PEACE.

Bombay:

PRINTED AT THE "NIRNAYA-SAGARA" PRESS.

1890—5650.

Registered under Act XXV. of 1867.

סדר חמש תעניות

इस्राएलांचीं पंचोपोषणें.

या ग्रंथाचें

इब्री मूळ ग्रंथावरून मराठीभाषेंत,

योसेफ येहेजकेल राजपूरकर,

दावीद सासोनच्या शाळेचे मुख्य गुरु,

मुंबईच्या युनिवर्सिटीचे फेलो

व

जस्टिस आफ धी पीस,

यांनीं भाषांतर केलें

तें,

मुंबईमध्यें,

निर्णयसागर छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९०. इस्राएली ५६५०.

सन १८६७ च्या आक्ट २५ प्रमाणें नोंदिलें असे.

TO

The Memory

OF

MY DEAR UNCLE,

MR. ELIJAH JOSEPH RAJPURKAR,

(MAY HIS SOUL BE BOUND UP IN THE BAND OF THE LIVING.)

HAZZAN TEACHER &c. &c.,

OF THE

OLD SYNAGOGUE IN BOMBAY; WHO CONDUCTED HIS VARIOUS DUTIES FOR THIRTY-SIX YEARS; WHO LOVED AND WAS LOVED AND VENERATED BY THE WHOLE CONGREGATION; DURING THE LONG PERIOD OF WHOSE MINISTRY THE CONGREGATION ENJOYED PEACE AND HARMONY AND THE SYNAGOGUE SIGNAL PROSPERITY; AND WHO DEPARTED THIS LIFE

ON THE

First Day of the Feast of Passover,

6TH APRIL 1871,

AT THE AGE OF 59 YEARS;

THIS TRIBUTE IS INSCRIBED AS A TOKEN OF GREAT VENERATION TO HIS DEPARTED MERITS BY HIS AFFECTIONATE NEPHEW,

JOSEPH EZEKIEL.

माझे प्रिय चुलते

अ. एलीया योसेफ राजपूरकर.

(त्यांचा आत्मा स्वर्गवासी जनांशीं मिळालेला असो.)

ज्यांनीं मुंबईतील जुन्या प्रार्थनामंदिराच्या हाज्जानचे शिक्ष-
काचें इत्यादि अनेक कामें ३६ वर्षें चालविलीं; जे
सर्वांवर प्रीति करून सर्वांस प्रिय व बहुमान्य
होते; ज्यांच्या वेळीं समाजांत शांति
व समेट असून प्रार्थनामंदिराचा
उत्कर्ष होता; आणि जे
आपल्या आयुष्याच्या
५९ व्या वर्षीं

पेसाहच्या पहिल्या दिवशीं

तारीख ६ एप्रिल १८७१

गुरुवार रोजीं

एदेनांत विश्रांति पावले;

त्यांच्या गुणांच्या सन्मानास

हा ग्रंथ,

मीं मोठ्या आदरानें समर्पिला असे.

योसेफ येहेजकेल राजपूरकर.

प्रस्तावना.

इस्राएल हे पूर्वी ईश्वराचे प्रिय व खासगी लोक असून त्यांजवर त्याची पूर्ण कृपा होती. त्यांजकरितां अनेक वेळां मोठमोठे चमत्कार करून, त्यांच्या व सर्व जगाच्या कल्याणाकरितां उत्तम नियम त्यांस लावून देऊन, आणि त्यांच्या रक्षणाकरितां आपल्या गौरवाच्या रूपानें त्यांमध्यें स्वतां वास करून ही कृपा त्यानें स्पष्ट दाखविली. परंतु ही कृपा त्यांनीं आपणांवर राखिली नाहीं. त्यांनीं अनेक वेळां त्याच्या आज्ञा मोडिल्या, ह्मणून त्यानेंही त्यांस अनेक वेळां लहान लहान शिक्षा केल्या. शेवटीं ते आपल्या परमदयाळू देवास विसरून मूर्तिपूजा करूं लागले; तेव्हां त्यानें बाबेलच्या राजाकडून त्यांच्या राज्याचा, त्यांच्या पवित्र नगराचा व मंदिराचाही नाश करवून त्यांस बाबेलदेशीं दास्यत्वांत पाठविलें. या शिक्षेवरून त्यांस बोध होऊन मूर्तिपूजेचा त्यांस अगदीं वीट आला. तेव्हां त्यानें त्यांस त्यांच्या देशीं परत नेऊन पूर्वीप्रमाणें त्यांचें राज्य, त्यांचें पवित्र मंदीर इत्यादि गोष्टी पुनः स्थापन केल्या. परंतु त्या दुसऱ्या मंदिराचाही नाश झाला. हा नाश अभिमान, परस्परांत वैर व हेवा यांवरून झाला आहे व दीर्घ वाढला आहे; तो होऊन अठराशें बेवीस वर्षें होत आलीं.

इतिहासावरून असें कळून येतें कीं, जोंपर्यंत त्यांमध्यें ऐक्य होतें, तोंपर्यंत ते प्रतापी व समर्थ होते व त्यांजवर इतर मोठमोठाल्या राजांचेंही कांहीं चाललें नाहीं; परंतु जेव्हां त्यांस अभिमान येऊन ते परस्परांत भांडूं लागले, तेव्हां रोमी लोकांस चढून येऊन त्यांचा देश जिंकून घेण्यास व त्यांच्या दुसऱ्या पवित्र मंदिराचा नाश करण्यास साधलें. लढाईस आरंभ होतेवेळीं वेढा पडल्यास दोन लक्ष मनुष्यांस वीस वर्षें पुरे एवढें अन्न येरूशालेमेंत होतें; परंतु त्यांमधीलच अभिमानी लोकांचे तीन पक्ष होऊन त्यांनीं परस्परांत लढून तें सर्व जाळिलें. यामुळें त्यांचें सामर्थ्य उणें होऊन शेवटीं त्यांचा सर्वस्वीं नाश झाला; आणि त्यांस हल्लींची दशा प्राप्त झाली आहे.

आतां ही आपल्या पूर्वजांची दशा आपणांस उघड दिसून येत असतांही आपण या पश्चिम हिंदुस्थानांतील इस्राएल सावध होऊन बोध न घेतां त्याच रिपूंच्या स्वाधीन होऊन तसेच वर्ततों, आणि त्यामुळें आपणांस अधिकाधिक

निकृष्ट अवस्था प्राप्त होत आहे ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. ही स्थिति सुधारणें आपल्याच हातीं आहे. या ग्रंथावरून या प्रार्थनेचा अर्थ समजेल एवढेंच नाहीं, परंतु आपल्या पवित्र मंदिराचा नाश कसा व कां झाला, त्यामुळें आपल्या लोकांस कोणती दशा प्राप्त झाली आहे, आपल्या धर्माच्या सत्यतेकरितां व ईश्वरी नामाच्या एकत्वाकरितां कोणीं कोणीं व कशीं कशीं दुःखें सोसून आपले प्राणही दिले हें कळून येऊन त्यांच्या उदाहरणांवरून आपल्या ईश्वरदत्त धर्मावरील आपला विश्वास दृढ होईल; आणि या ग्रंथीं वर्णिलेल्या दुःखांविषयीं व आपल्या लोकांच्या हल्लींच्या स्थितिविषयीं विचार करून, पूर्ण पश्चात्ताप करून आपल्या दयाळू बापास शरण गेल्यानें, आणि जेखार्या भविष्यवाद्यानें सुचविल्याप्रमाणें सत्य व शांति यांजवर आवड ठेविल्यानें सर्व दुःखें दूर होऊन सुखप्राप्ति होऊं लागेल, आपला बाप पुनः आपला अंगिकार करील, आणि त्यानें अभय वचन दिल्ह्याप्रमाणें इस्राएलांच्या उद्धाराचे दिवस लवकरच येतील अशी आशा करितों. हा प्रवास दीर्घ वाढून उद्धाराचे दिवस येण्याची वाट पाहावी लागेल, आणि कित्येक त्याविषयीं निराशही होतील अशीं शास्त्रांत सांगितलेलीं भविष्यें ज्याप्रमाणें पूर्ण होत आहेत, त्याप्रमाणें इस्राएलांचा पूर्ण उद्धार होऊन सर्वसमर्थ देवाचें राज्य सर्व पृथ्वीवर स्थापन होईल, हीं भविष्येंही पूर्ण झाल्यावांचून राहणार नाहींत.

इस्त्राएलांचीं पंचोपोषणें.

पंचोपोषणांच्या दिवसांच्या प्रार्थनेचे नियम.

या पांच उपोषणांतील पहिल्या चार उपोषणांच्या म्हणजे गेदालयाच्या, तेवेतच्या, एस्तेरच्या व तम्मुजच्या उपोषणांसंबंधानें संध्याकाळच्या प्रार्थनेंत कांहीं अधिक उणें नसतें; ही प्रार्थना नित्याच्या संध्याकाळच्या प्रार्थनेसारिखीच असते; जें कांहीं अधिक किंवा उणें तें पाहांटेच्या व तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेंत असतें. पाहांटेची प्रार्थना तीही ארני שפתי पर्यंत नित्यासारिखीच असते; तरी उपोषणाकारणें ארני שפתי मध्यें नित्याच्या प्रार्थनेंत लिहिल्याप्रमाणें עננו אבינו हा भागहि म्हणावा लागतो. याप्रमाणें ארני שפתי पुनः मोठ्यानें म्हटल्या नंतर (गेदालयाच्या उपासाच्या दिवशीं प्रायश्चित्ताच्या दिवसांत त्यामागून म्हणायाचीं אבינו מלכנו हीं वाक्यें म्हणून) पुढें लिहिल्याप्रमाणें वाचितात.

על ידי רחמיך हे आमच्या बापा, तूं आपल्या मोठ्या दयेनें आह्मांस क्षमा कर, कारण वेडेपणानें आह्मीं पुष्कळ चुका केल्या आहेत; हे आमच्या राजा, आह्मांस माफ कर, कारण आमचे अपराध फार वाढले आहेत. तूं मंदक्रोधी देव आहेस; तुझ्या दयेचा व कृपेचा मोठेपणा तुझ्या प्रियकरांच्या संततीकरितां आज तूं आठीव. तूं दयेनें आह्मांकडे फीर, कारण तूं दयेचा स्वामि आहेस; आणि नम्र (मोशे) यास कळविल्याप्रमाणें आह्मी प्रार्थना व काकळूत करीत तुजपुढें येतों. तर तुझ्या शास्त्रांत लिहिल्याप्रमाणें तूं आपल्या क्रोधापासून फीर; मग ज्या दिवशीं हे परमेश्वरा तूं मेघांत उतरलास, त्या दिवसाप्रमाणें आह्मी तुझ्या पंखाच्या छायेमध्यें आश्रय व निवारा घेऊं. ज्या दिवशीं तूं तेथें (मोशे) जवळ उभा राहिलास, त्या दिवसाप्रमाणें आमचें उलंघन दूर कर व आमचा अपराध क्षमा कर. ज्या दिवशीं तो परमेश्वराचें नाम मोठ्यानें बोलला, त्या दिवसाप्रमाणें आमची विनंति ऐक, आणि प्रसन्नतेनें आमच्या ह्मणण्याकडे कान लाव. (आणि तेथें येणेंप्रमाणें ह्मटलें आहे:—)

ויעבור.

אבלה נפשי माझा जीव दुःखानें दुर्बळ झाला, आणि माझी मुखचर्या काळी पडली आहे. माझा मनोरम वाडा[1] सिंहाच्या[2] हातून भस्म

---

१ पवित्र मंदीर. २ सिंह ही उपमा एथें बाबेलचा राजा नेबूखादनेसार यास दिल्ही आहे.

झाला, आणि माझ्या नातलगांतून जे शेष उरले होते, तेहि या तिशरी महिन्याच्या या तिसऱ्या तारखेस नाश पावले. त्यांचा पाठलाग होत असतां अगाध जलांमध्यें ते वाहून गेले; शत्रूंनीं माझें पवित्र मंदीर तुडविलें, आणि त्यांचा विषय लुटला. जे शेष उरले त्यांतील वृद्ध सूड घेण्याच्या दिवशीं आहीकामाचा पुत्र गेदालया याबरोबर मारले गेले. त्या देशांमधील दरिद्री फाडले गेले; जें शतपादांनें सोडिलें, तें टोळानें जोरानें खाऊन टाकिलें. त्या देशाच्या स्वामीच्या हातून जे शेतकरी व नांगरे वांचले, ते एकवट झाले आहेत; त्यांकरितां कुपण घालणारा व संकटसमयीं उभा राहणारा कोणी नाहीं. मी काय वर्णूं ! माझें कण्हणें तर अतिशय वाढलें आहे; माझा जीव कंटाळला, आणि माझी मंडळी त्रासली आहे. तरवारीपासून व क्रोधापासून सुटून जे उरले, त्यांचे शेष अद्याप स्थिरावले जात नाहींत; परंतु तटांतटांवर नाश पावतात. (हे देवा), आह्मांपासून तूं आपलें मुख कोठपर्यंत लपविशील ! आमची अरोळी ऐक, आणि आमच्या बेड्या तोड. हे पवित्रा ! आमच्या कष्टांकडे लक्ष लाव, कारण आह्मांस कोणाचाच आश्रय नाहीं; आमची दरिद्रावस्था पाहा, आणि आमची स्तुति तुजपुढें मान्य होऊं दे. पिढोपिढीं व कोनोंकोनीं आह्मांवर जुलूम होत आहे; नागाच्या पिल्यानें आह्मांस दंश केला आहे. हे समर्थ देवा ! तूं आपल्या न्यायाकरितां ऊठ व जागृत हो; आमचीं पापें क्षमा करून (तारणाचा) वेळ जवळ येण्यास आज्ञा कर. सर्व लोकांपेक्षां उणे झालेल्याकरितां तूं आपल्या दयेला द्रव येऊं दे; सर्व लोकांच्या देखतां त्यांचा निभाव कर; आणि हे आकाशांत वास करणाऱ्या खडकरूप आश्रया, आणि दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा ! तूं आपल्या दयेनें सर्व लोकांसमक्ष त्यांचें रक्षण करून तूं आपला चमत्कार त्यांस दाखीव.

.אל מלך

יקם דם עבריך हे देवा, तूं आपल्या सेवकांच्या रक्ताचा सूड घे; आणि जे तुजसमोर ओरडतात, त्यांस रिकामे परतवूं नको; आही-

---

१ इ. विझाले. २ इ. विभाग. ३ हा एक जातीचा टोळ आहे. ४ जे लोक नेबूखादनेसाराच्या हातांतून वांचले, ते टैटसाचे हातून मारले गेले.

कामाचा पुत्र गेदालया याचा वध झालेल्या दिवसास विसरूं नको; आणि आमच्या शत्रूंच्या पदरीं सातपट घाल. तूं ह्मणाला आहेस कीं, बहिरा व मुका मीच करितों, तर मुक्या पोरव्याच्या रक्ताचा मी न्याय करीन व उगा राहणार नाहीं; मी आपल्या वैऱ्यांचा सूड घेऊन आपल्या द्वेषांची फेड करीन; आणि माझ्या लोकांचा व माझ्या मंदिराचा द्वेष करणारे आपलें वतन पावतील. तूं ह्मणाला आहेस कीं, पिडलेल्यांवरील जुलमाची मी चौकशी करीन, अन्य लोकांच्या मंडळीवर मी आपल्या बाणास रक्तानें माजवीन, माझी तरवार मास खाईल, हाणलेले व धरून आणलेले यांच्या रक्तानें मी तृप्त होईन; तर जे तुजपुढें ओरडत आहेत, त्यांस रिकामे परतवूं नको. तूं ह्मणाला आहेस कीं, माझीं वचनें पूर्ण होतीलच होतील, आणि वांकडेपणानें वर्तणाऱ्या माझ्या शत्रूचा मी नाश करीन; अहो राष्ट्रांनों! तुह्मी त्याच्या लोकांसंगतीं उल्हास करा, कां तर तो आपल्या सेवकांच्या रक्तपाताचा सूड घेईल; भयंकर जो खडकरूप आश्रय, तो आपल्या वैऱ्यांचा सूड घेऊन फेड करील. तूं ह्मणाला आहेस कीं, मीं परात्पर देवानें आपणाविषयीं शपथ वाहिली आहे कीं, निर्दोष रक्त पाडणारांचा मीं सत्यनाश करीन, आणि जरी दुसऱ्या अपराधाकरितां मीं सूड घेतला नाहीं, तरी त्याच्या रक्ताचा सूड मी सीयोनेंत वास करणारा देव घेईन; तर आहीकामाचा पुत्र गेदालया हा मारला जाण्याचा दिवस तूं विसरूं नको. आणि हे प्रभु, जो तुझा धिक्कार आमच्या शत्रूनें केला आहे, तो धिक्कार-सातपट त्याच्या पदरीं घाल. मग आह्मी तुझे लोक व तुझ्या चारण्याचीं मेंढरें तुझे उपकार सर्वकाळ मानूं; पिढोपिढीं तुझ्या स्तुतीचें कथन करूं.

कोठें कोठें प्रत्येक ויעבור पूर्वीं या पुढील गीतांतील एक एक ओवी ह्मणण्याची चाल आहे.

שלש עשרה מדות नम्र (जो मोशे) त्यानें (देवाचे) तेरा गुण पूर्णपणें वर्णिले; जेव्हां परमेश्वर त्या पुढून पार गेला तेव्हां. हे देवा दयेनें व कृपेनें आमचा न्याय कर; कारण मनुष्याची बुद्धि त्याचें तोंड प्रकाशित करिते. हे आपल्या लोकानें चुकून केलेल्या पापांची व अ-

१ इ. शेजाऱ्याच्या. २ मुकाट्यानें अनेक कठोर दुःखें सोसणाऱ्या इस्राएलांचा.

पराधांची क्षमा करणाऱ्या, आणि आपणाकरितां त्यांतील एक एक पार करणाऱ्या, तूं आपल्या लोकांसाठीं आणि पूर्वींप्रमाणें प्रसन्नतेच्या वेळीं आपल्या सत्वशीलांसाठीं सीनाय पर्वतावरील उभें राहणें स्मर. जी काकळूत ते करतात, तीं तूं आपल्या दयेनें मान्य कर, जुलमगारांच्या हातांतून तूं आपल्या लोकांस सोडीव; हे दयावंता व कृपावंता! तुझा साक्षात्कार व तुझें पादासन हीं त्याच्या ठिकाणीं पुनः स्थापन करण्यास आपलीं पावलें उचल. ज्याचें काम पूर्ण असा जो खडकरूप आश्रय, हजारांशीं दया राखणारा, आणि गर्विष्ठांकडून पाठलाग होतो ह्मणून तारणाची आशा करणाऱ्या लोकांच्या अपराधाची क्षमा करणारा, त्याच्या पूर्वजांची यथार्थता व पुण्याई मागतो. हे देवा, तूं आपल्या लोकांस एकवट कर आणि तार, त्यांच्या आरोळीकडे कान लाव, आणि संतुष्ट होऊन आपल्या लोकांस सुख दे; आरीएलें बांध आणि त्यांची इच्छा पूर्ण होऊन त्यांनीं देवाचें नाम गावें ह्मणून तूं प्रकाशित हो. तूं आपल्या लोकांस तारणाचें शुभवर्तमान ऐकीव, त्यांची आरोळी ऐक, आणि आपल्या लोकांस तारायास मान्य हो, हारएलें बांध व त्यास स्थापित कर, मग जसें (मोशे) भविष्यवाद्यानें तुजपुढें ह्मटलें, त्याप्रमाणें ते सुंदर गीत गाऊन ऐकवितील.

אנשי אמונה नि. प्रा.
אל מלך नि. प्रा.
תמהנו מרעות नि. प्रा.
אל מלך नि. प्रा.

וכשחטאו ישראל जेव्हां इस्राएलांनीं रानांत पाप केलें; तेव्हां मोशेनें तुजपुढें उभें राहून प्रार्थना केली, आणि तुझ्या इस्राएल लोकांवर त्वां कृपा करावी ह्मणून त्यानें विनंति केली; आणि तो आपल्या प्रार्थनेंत असें ह्मणाला कीं, तूं आपल्या मोठ्या दयेप्रमाणें, आणि मिस-

१ हें येरूशालेमेस दिल्हेलें नाम आहे; आणि येहेजकेल अ. ४३ ओ. १५ एथें यज्ञवेदीस दिल्हेलें नाम आहे. २ हारएल याचा अर्थ देवाचा डोंगर असा होतो, यावरून हें नाम येरूशालेमेसहि शोभतें; परंतु येहेजकेल अ. ४३ ओ. १५ एथें हें नाम यज्ञवेदीस दिल्हें आहे. ३ इ त्यापुढें.

रांतून एथपर्यंत ज्याप्रमाणें त्वां या लोकांचें सहन केलें, त्याप्रमाणें या लोकांस क्षमा कर. त्वांहि आपल्या चांगुलपणाच्या रीतीप्रमाणें त्यांवर दया करून त्यास शुभवर्तमान ऐकविलें, आणि त्यास उत्तर देवून ह्मणालास कीं, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें म्यां क्षमां केली आहे.

דניאל איש חמודות दानीएल जो प्रिय मनुष्य, तो तुजपुढें ह्मणाला, कीं हे माझ्या देवा, तूं आपला कान लावून ऐक, आपले डोळे उघड, आणि आमचीं ओसाड स्थानें व ज्या नगराला तुझें नांव दिलेलें आहे तेंहि पाहा; कारण आह्मीं आपल्या न्यायीपणामुळें नव्हे, परंतु तुझ्या फार दयेमुळें आपली विनंति तुजपुढें करितों. हे प्रभु, ऐक, हे प्रभु, क्षमा कर, हे प्रभु, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपल्याकरितां असें कर, कां कीं, तुझ्या नगरास व तुझ्या लोकांस तुझें नाम दिलें आहे. आणि तूं आपल्या येरूशालेम नगरास ह्मणाला आहेस, कीं पाहा, मीं पाप केलें नाहीं, असें तूं ह्मणतीस, ह्मणून मीं तुजशीं वाद करीन. तर आमच्या कर्मीमुळें आह्मांस लज्जा प्राप्त होती, आणि आमच्या अपराधांमुळें आह्मी विस्मित होतों; आह्मांस तुजकडे परतायास तोंड आणि डोकें उंच करायास धैर्य[1] नाहीं.

אוא על תעש पा. क्ष. प्रा.
אנא יי पा. क्ष. प्रा.
אשמנו מכל עם पा. क्ष. प्रा.
אשמנו באומר पा. क्ष. प्रा.
לעינינו עשקו पा. क्ष. प्रा.
אשמנו בגדנו पा. क्ष. प्रा.

עזרא הסופר एज्रा जो लेखक, तो तुजपुढें ह्मणाला कीं, हे माझ्या देवा, हे माझ्या देवा, मला तुजकडे आपलें तोंड वर करायास लाज वाटती व मी विस्मित होतों; कां कीं, आमचे अन्याय आमच्या डोक्यावरतीं वाढले आहेत, आणि आमचा दोष आकाशापर्यंत मोठा झाला आहे. परंतु तूं क्षमाशील, कृपाळू व दयाळु, मंदक्रोध व बहुप्रसाद

१ इं० कपाळ.

देव आहेस, ह्मणून (आमचे पूर्वज याप्रमाणें असतांहि) तूं त्यास सोडिलें नाहींस.

על תעזבנו אבינו तर हे आमच्या बापा! आह्मासहि सोडूं नको, हे आमच्या राजा! आह्मास धिक्कारूं नको; आणि हे आमच्या उत्पन्न कर्त्या! आह्मास विसरूं नको; आणि आमच्या पाडावपणांत आमचा निःपात करूं नको; आणि हे परमेश्वरा, आमच्या देवा, तुझा भविष्यवादि इर्मेया याजकडून जें अभयवचन तूं आह्मास दिलें आहेस कीं, "त्या दिवसांत, त्या समयींच इस्राएलांचा अन्याय शोधण्यांत येईल, परंतु कांहीं नाहीं; आणि यहूदांचीं पातकें शोधण्यांत येतील, परंतु तीं सांपडणार नाहींत; कारण ज्यांस मी राखून ठेवितों त्यांस क्षमा करीन;" (हें वचन) तूं पूर्ण कर. आणि आमच्या सर्व पापांकडून व अपराधांकडून आमच्या प्रार्थनेस अडथळा होऊं देऊं नको; परंतु आमचे सर्व अपराध माफ व क्षमा कर; कारण तूं चांगला व क्षमाशील आहेस.

नि. प्रा. אל ארך אפים
नि. प्रा. ויעבור
नि. प्रा. והוא רחום
नि. प्रा. ויאמר דוד
नि. प्रा. לדוד אליך
नि. प्रा. יי אלהי ישראל

गेदाल्याच्या उपासाच्या दिवशीं हें पुढील ह्मणतात.

עד מתי יי हे परमेश्वरा, तूं आपल्या चारण्याच्या मेंढरांवर सूड उगवायासाठीं क्रोध चढावा ह्मणून कोठपर्यंत आपला राग चेतविशील! शत्रूनें तर रागानें व क्रोधानें आमचा नाश केलाच आहे. ते ह्मणतात आमचा हात उंचावलेला आहे; त्यांनीं मजशीं विनाकारण दगा केला. मजवर जुलूम करणारे सिंहासारखे गर्जले; याच दिवशीं त्यांनीं आहीकामाचा पुत्र गेदाल्या यास मारिलें. आणि जे वांचले ते अतिशय व्याकुल झाले, आणि परमेश्वरानें[1] त्यांस दक्षिणेकडे व पूर्वेकडे विखरलें. हे माझ्या देवा, त्यांच्या हातांच्या कर्मीचें फल तूं त्यांस केव्हां देशील!

१ इ. परमेश्वराच्या मुखानें ह्मणजे परमेश्वराच्या वचनाप्रमाणें ते विखरले.

आणि त्यांची योग्य शिक्षा ते केव्हां भोगतील ! लूबीम व कूशीम[1] या लोकांनीं त्यांचा नाश करायास एकत्र मसलत केली; अश्शूरहि त्यांशीं मिळाला. त्यांची योग्य शिक्षा त्यांस मिळो. तुझें तारण आमच्या दृष्टीपुढें दाखीव, आणि आमच्या शत्रूच्या पदरीं सातपट घाल.

तेवेतच्या उपासाच्या दिवशीं हें ह्मणतात.

'יגוני'' हे परमेश्वरा, ज्या दिवशीं बाबेलचा राजा येरूशालेमेवर चढून आला, त्या दिवशीं माझीं दुःखें मला शोक करावयास लावितोत[2] त्यानें आपलें सैन्य चालविलें, आणि आपला गर्व दाखविला, आणि त्याच्या उजव्या हातीं येरूशालेमेविरुद्ध शकून होता. ईश्वरी इच्छेप्रमाणें करणारांनीं[3] (इस्राएलांचें) रक्त येरूशालेमेभोंवतें पाण्यासारखें वाहविलें. येहूदाच्या वैभवाचा व येरूशालेमेच्या वैभवाचा नाश करून त्यांनीं मला अशक्त व उदास करून टाकिलें आहे. त्यांनीं गड पाडिला, चांदवा कोसळविला, आणि सीयोनेंत अग्नि लावून येरूशालेमेंतील वाडे भस्म केले. त्यानें बाबेलचे लोक माझ्या लोकांवर उठविले, कारण हें विघ्न येरूशालेमेच्या द्वारीं ईश्वराकडून आलें. केदाराची पूर्ती फेड कर; उगा राहूं नको. हे परमेश्वरा, जीं एदोमाचीं लेंकरें, येरूशालेमेच्या नाशाच्या दिवशीं (तिला पाडून टाका) असें ह्मणालीं, त्यांची आठवण कर. आणि पाहा, (कोणी सहाय करणारा) उरलेला अथवा एकीकडे राहिलेला असाहि नाहीं. आणि येरूशालेम पडली ह्मणून शत्रूनें माझी पाठ पुरविली आहे. आह्मी आपणांवरील घावाकरितां उपायाची आशा करितों; परंतु पाहा, नाशच पुढें येतो; तर तूं कोठपर्यंत येरूशालेमेवर दया करणार नाहींस !

एस्तेरच्या उपासाच्या दिवशीं हें ह्मणतात.

אויב גבר'' हे परमेश्वरा, आहाश्वेरोशाच्या दिवसांत शत्रु पवित्र व शुद्ध लोकांवर बळावला; आबालवृद्धांस मारायास त्यांनीं एकत्र जमून विचार केला; आणि तुझा द्वेष करणारांनीं आपलें डोकें उंचावलें. त्या ओंगळ छळणारानें कंपनाच्या प्याल्यानें माझी तहान भागविली, आणि

---

१ लूबीम हे मीसराच्या पश्चिमेस व कूशीम हे दक्षिणेस राहणारे रानटी लोक होते. २ इ. बोलवितात. ३ इ. आकाशाचें काम करणारांनीं. ४ इश्माएलाचें संतान.

मला विष प्यावयास दिलें. संकटसमयीं उत्तर देणारानें त्या शत्रूवर आपला हात फिरविला, तेव्हां तो डोकें झांकून शोक करीत गेला. पूर्वीच्या पिढ्या उत्पन्न करणारानें आपल्या लोकांचें शांतवन करण्याकरितां दयेनें त्यांचा शोध ठेविला; सर्वांहून श्रेष्ठ असा जो उंचावलेला देव, त्यानें, ते शत्रूच्या देशांत असतां त्याजविषयींचें आपलें वचन पूर्ण केलें.

तम्मूजच्या उपासाच्या दिवशीं हें ह्मणतात.

שטופה ״ हे परमेश्वरा, पूर्ण सुंदरि सीयोन दडपली, असडली आणि मरणानें छेदली गेली आहे. शत्रूनें आपला राग अतिशय चेतविला, आणि क्रोधानें सीयोनेच्या कन्येच्या वेशींत आग लाविली. माझें पवित्र मंदिर शम्मा आणि मिज्जा यांनीं लुटलें, आणि त्यांनीं सीयोनेस आग लाविली. जेव्हां तिनें दुःखाचा शब्द ऐकिला, तेव्हां ती शोक करून म्लान झाली; प्रभूच्या क्रोधानें सीयोनेच्या कन्येस कशी झांकिली आहे! सीयोनेची आठवण करून आह्मी रडतों, आणि हातावर हात आपटितों. आमच्या अपराधांनीं आह्मास खांडलें व आह्मावर घाव केले; ज्यांनीं आह्मास बंदिवान करून नेलें, त्यांनीं आह्मास सीयोनेचें एखादें गीत गावयास सांगितलें; (परंतु आह्मी ह्मणालों कीं,) आमचें दुःख वाढलें आणि मोठें झालें आहे, तर आह्मी परमेश्वराचें गीत कसें गावूं! आमच्या पुष्कळ अपराधांमुळें आह्मी दास्यत्वाचें जोकड वाहत आहों. सर्व असें आहे, तरी मला आशा आहे कीं, देव सीयोनेचें तारण करील. (हे देवा,) तूं येहूदा व एफ्राईम यांचें शांतवन करच कर, येरूशालेमेचीं गांवकुसें बांध आणि आपल्या प्रसन्नतेनें सीयोनेचें बरें कर. अगे सीयोनेंत राहणारिणी! मोठ्यानें ओरड व उत्सव कर, असें शुभवर्तमान ऐकविणाराचा शब्द फुकट विकले गेलेले लोकांस लवकर ऐकीव. हे परात्परा! शांतवनाचा दृष्टांत लवकर प्रत्ययास आण, ह्मणजे सीयोनेंतून पाडाव करून नेलेले जेव्हां परततील, तेव्हां आह्मास केवळ स्वप्नावस्था प्राप्त होईल.

यानंतर שוב מחרון אפיך, אבינו מלכנו אבינו אתה. आणि קדיש לעילא वाचून प्रत्येक सोमवार व गुरुवार या दिवसांप्रमाणें दोन אל ארך אפים इत्यादि बोलून, शास्त्र काढितात, आणि त्यामधून ויחל משה ह्मणजे निर्गम अ० ३२ ओ० ११–१४ व अ० ३४ ओ० १–१० पर्यंत वाचायास तीन मनुष्यें बोलवितात. शास्त्र वाचणें पूर्ण झाल्यावर

१ इ. बोलविणारानें. २ शम्मा आणि मिज्जा हे एसावाचे कुळांतील नायक होते.

קדיש לעילא वाचून पुढें प्रार्थना चालवितात; आणि शास्त्र नेऊन ठेविल्यावर תפלה לדוד הטה יי या गीताबद्दलः—

गेदाल्याच्या व तेवतच्या उपासाच्या दिवशीं गीत ८३.

एस्तेरच्या उपासाच्या दिवशीं गीत २२.

तम्मूजच्या उपासाच्या दिवशीं गीत ७९. याप्रमाणें वाचून नित्याप्रमाणें प्रार्थना पूर्ण करितात.

तिसऱ्या प्रहरची प्रार्थना.

ही प्रार्थना नित्याप्रमाणें אשרי יושבי च्या शेवटपर्यंत करून קדיש לעילא वाचितात. मग जसें पाहांटेच्या प्रार्थनेंत तसें शास्त्र काढितात; परंतु उपास जर शुक्रवारीं असला तर आणि एस्तेरच्या व तिशआबेआवच्या उपासांच्या दिवशीं दोन אל ארך אפים म्हणण्याबद्दल संक्षिप्त יהי יי म्हणून शास्त्र काढितात, आणि त्यामध्यें ויחל משה हा भाग वाचायास तीन मनुष्यांस बोलावितात, आणि तिसरा मनुष्य गेदाल्याच्या उपासाच्या दिवशीं यशाया अ० ५५ ओ० ६ पासून अ० ५६ ओ० ८ च्या शेवटपर्यंत पुढील व मागील धन्यवाद करून हाफतारा वाचितो; परंतु मागील धन्यवाद מגן דוד पर्यंत मात्र करितो. मग יהללו इत्यादि बोलून शास्त्र परत नेऊन ठेवितात; परंतु तेबेतच्या उपासाच्या दिवशीं יהללו म्हणण्यापूर्वी गीत २० יענך יי; तो उपवास शुक्रवार असल्यास गीत १२६ שיר המעלות בשוב יי आणि एस्तेरच्या उपासाच्या दिवशीं गीत १२४ לולי יי म्हणतात. शास्त्र ठेविल्यावर קדיש לעילא वाचून पाहांटेच्या प्रार्थनेप्रमाणें אדני שפתי हळू व मोठ्यानें वाचून (गेदाल्याच्या उपासाच्या दिवशीं प्रायश्चित्ताच्या दिवसांत त्यामागून म्हणायाचीं אבינו מלכנו हीं वाक्यें म्हणून) पाहांटेच्या प्रार्थनेंतील על ידי רחמיך हा भाग त्या मागील ויעבור च्या शेवटपर्यंत वाचितात; त्यानंतर אנשי אמונה पासून על תעובנו אבינו च्या शेवटपर्यंत; त्यानंतर ויאמר דוד, יי אלהי ישראל हें वाक्य, אבינו מלכנו אבינו אתה, קדיש תתקבל, תפלה לעני गीत १०२. קדיש יהא שלמא व עלינו לשבח हे भाग वाचून प्रार्थना पूर्ण करितात. परंतु तेबेताचा उपास शुक्रवारीं असल्यास תפלה לעני गीत १०२ बद्दल יי מלך גאות गीत ९३ वाचितात. एस्तेरच्या उपासाच्या दिवशीं אדני שפתי नंतर लागलाच קדיש तीत २२. למנצח על אילת השחר आणि קדיש תתקבל יהא שלמא व עלינו לשבח वाचून प्रार्थना पूर्ण करितात. परंतु पुरीम आदितवारीं असल्याकारणें उपवास बृहस्पतवारीं असतो; तेव्हां ही प्रार्थना गेदाल्याच्या उपासाच्या प्रार्थनेप्रमाणें करितात; मात्र गीत १०२ बद्दल गीत २२ वाचितात.

तेबतचा उपास.

या उपासाच्या दिवशीं אדני שפתי पर्यंत प्रार्थना केल्यानंतर हें पुढील म्हणावें.

וארץ שפל רומי माझा थोरपणा पडून धुळीस मिळाला आहे,

आणि माझा खेद वाढला आहे. ज्या दिवशीं सिंह[1] माझ्या पवित्र डोंगरावरील सुंदर सीयोन नगरासमोर येऊन पोहोंचला, त्या दिवशीं मी चकित होऊन बसतों, आणि त्या दाहाव्या महिन्यांत मी शोक व विलाप करितों. या दाहाव्या महिन्यांत तो सिंह विक्राळपणें चढून आला, आणि या दशमीस त्यानें मजसमोर मोरचा बांधिला, आणि मजवर व माझ्या लोकांवर सूड घ्यावा ह्मणून तो आपल्या सैन्यासहित जवळ येऊन ठेपला, आणि त्यानें लढाईची तयारी केली. हे माझ्या सामर्थ्या व तारका! माझ्या शत्रूशीं व मला नमविणाऱ्याशीं तूं लढाई [2]चालीव. हे परमेश्वरा, माझ्या मेंढपाळा! हे माझ्या ढालरूप आश्रया व माझ्या तारणाच्या शिंगा! तूं त्यांस मिश्रणानें भरलेला प्याला पाज.

בחדש העשירי या दाहाव्या महिन्यांत शत्रु तरवार घेऊन माझ्या पाठीस लागला; आणि या दशमीस तो मजवर दबा धरून [3]बैसला; याकरितां मी शोक करितों, आणि माझा हर्ष नाहींसा [4]होतो. आह्मांस हाय हाय! कारण दिवस सरला, आणि संध्याकाळची छाया आह्मांवर पसरली आहे. ही संध्याकाळ पालटून सकाळ [5]होवो, आणि दगा करणारे वर्चस्व न पावोत. तूं आपल्या लोकांवर दया कर; आणि त्यांचीं दुःखें दूर कर. हे मारणाऱ्या व जीवंत करणाऱ्या, कबरेंत उतरणाऱ्या व (तिजमधूनही) वर चढविणाऱ्या, जेव्हां मी आपले हात व तळवे तुजकडे पसरितों, तेव्हां माझ्या पूर्वजांसीं केलेला करार तूं मजकरितां आठीव.

בחדש העשירי या दाहाव्या महिन्यांत रानांतील [6]लांडग्यानें माझ्या लोकांवर डरकाळ्या फोडल्या; त्यांतून जे कोणी बाहेर निघाले, त्या सर्वांचे त्यानें या दशमीस फाडून तुकडे केले; कारण [7]चित्ता टपत बसलाच होता. त्यांस पुष्कळ दुःखें देऊन त्यांनीं त्यांचें नगर जाळिलें. हे परमेश्वरा, गर्विष्ठांचा नाश करायास तूं आपलें सामर्थ्य

---

१ एथें सिंह ही उपमा नेबुखादनेसारास दिल्ही आहे. २ इ. ठेव. ३ हें २ राजे अः २५ वरून लिहिलें आहे. ४ इ. अंधारमय होतो. ५ हे दुःखाचे दिवस जाऊन सुखाचे दिवस येवोत. ६ ही उपमा नेबुखादनेसारास दिल्ही आहे. ७ ही उपमा नेबुखादनेसाराचे सरदारास दिल्ही आहे.

उंचाव, ह्मणजे हे इस्राएलाच्या पवित्रा, सैन्याच्या परमेश्वरा, जेव्हां तूं आमच्या कल्याणाचें सुचिन्ह आह्मांस दाखविशील, तेव्हां ते लज्जित होतीलच होतील.

בחרש העשירי या दाहाव्या महिन्यांत ते ढाल व कवच धारण करून निघाले, आणि या दशमीस विश्वासू नगरीवर लढाईची सिद्धता करून येणाऱ्या मनुष्याप्रमाणें चढून आले. तर अगे सुखवासी मंडळी! तूं तरट पांघर आणि आपले डोईवरील केंसांचा मुगुट कातरून उडवून टाक, आणि उंच टेंकड्यांवर (बसून) शोक कर. हे देवा, तुझे लोक आज तुजपुढें शोकाचेंच भाषण करीत आहेत. आणि तुझ्या वस्तिस्थानाच्या नाशाकरितां आमच्या डोळ्यांच्या पात्यांतून पाणी वाहात आहे. ज्या शत्रूंनीं तुझ्या मंदिरीं गोंधळ केला, त्यांचा सूड घेण्याचा दिवस उगीव. हे परमेश्वरा, तुझ्या वाटा मला कळीव, आणि तुझे मार्ग मला शिकीव.

בחרש העשירי या दाहाव्या महिन्यांत माझ्या पीडकांनीं माझ्या नगरासमोर गडगे रचिले; या दशमीस (शत्रूनें) माझा मुगुट उडविला, आणि माझी शोभा पडली. मजवर त्रासदायक घाव करणारांनीं मला घेरिलें, ह्मणून माझीं आंतडीं, माझीं आंतडीं कळवळतात. जो पवित्रांच्या मंडळींत मोठ्या भयास योग्य, त्या देवाची मी वाट पाहीन; आणि उल्लंघनें व ऋणें पार घालविणाऱ्यापुढें मी प्रार्थना करीन. तूं आमची दुष्टाई मनावर धरूं नको, आणि आमचीं नोंदलेलीं पापें पुसून टाक; हे परमेश्वरा, आह्मांस तूं आपणाकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं.

וייעבור आणि על ידי רחמיך पृष्ठ १.

אז בבוא יום जेव्हां भविष्यकथनाच्या खोऱ्याच्या[3] पाहाणीचा दिवस आला, तेव्हां परमेश्वराच्या चेतलेल्या रागामुळें अग्नीचे इंगळ त्याजवर उडविले गेले[3]; कारण "तूं आपणासाठीं या दिवसाचें, याच दिवसाचें नांव लिहून ठेवें" असें बूझीचा पुत्र जो भविष्यवादी यास तूं कळविलेंच होतेंस. मी आपल्या चेतलेल्या आवेशानें या फितुरी घराण्यांच्या नाशा-

१ इ. ओतलें. २ टीका १. ३ हें येहेजकेल अ. १० यावरुन लिहिलें आहे. ४ येहेजकेल अ. २४ ओवी २. ५ येहेजकेल भविष्यवादी.

विषयीं बोललों कीं, पाहा, क्रोधामुळें मी तिला भयंकर वादळ असा झालों आहें; मी त्यांस ह्मणीसारखें अपशब्दासारखें आणि "थाली अग्नीवर ठेव, अग्नीवर ठेव" असें ह्मटल्यांप्रमाणें त्यांस निंदास्पद केलें आहे. सियोनेला व तिच्या मंदिराला मोठ्या वादळानें गांठलें; तिच्या जिवाला थरकांप सुटला, आणि तिचें सैन्य विरघळून गेलें. तिजमध्यें घायाळांचे तुकडे एकवट कर, असें ज्या वेळीं ह्मटलें जातें, त्या वेळीं तिचें मन फाटून जातें. तिजशीं वाद करणारांस मी बंदिवानांनीं व लुटीनें भरीन; तिचे याजक व तिचें सुगंधाचें मिश्रण करणारे यांस मी सर्वकाळ पाडावपणांत पाठवीन. मग निवडक शेरडें धरलीं जातील; आणि त्यांस मुक्त करणारा कोणीच रहाणार नाहीं. अगे लोकांवर अधिकार करणारे! ते तुजवर अधिकार करतात व तुझी थट्टाहि करतात. आतां तूं सर्वकाळ सोडलेली या नामानें ह्मटली व ओळखली जातेस. तुझे वैरी तुजविषयीं साक्ष देऊन ह्मणतात कीं, रक्तपाति नगरीस हाय हाय! तिनें आज्ञा मोडिली, सरळ मार्ग सोडिला, आणि अनंताचा करार मोडिला. तिनें उल्लंघन केलें व दुष्टाई केली, ह्मणून ती खांचेंत बुडाली आहे. ती ओरडते; परंतु देव तिचें रडणें ऐकत नाहीं; कारण तिचे रक्ताचा दोष तिजवरच आहे. पीडकांकडून पीडलेल्यांची वाणी (हे देवा) तूं ऐक; त्यांची तळतळ व त्यांचें ओरडणें व्यर्थ जाऊं देऊं नको; कारण सात्विक सातवेळ जरी पडला, तरी तो उठेल. हे मोठ्या व भयंकर देवा, आह्मी आपल्या दुष्टाईमुळें बहकलों आहों; आणि जरी आमचीं उल्लंघनें वाढलीं आहेत, तरी तुझी दया प्रबळ होऊं दे. तूं दया कर; नाहीं तर तुझ्या क्रोधामुळें ते लवकर छेदले जाऊन नाहींसे होतील. जरी (अनेक) दुःखें व संकटें आह्मांवर आलीं; तरी परमेश्वराच्या नामानें आह्मी हाक मारूं. थोडके उरलेल्या लोकांकरितां तुझ्या दयेला द्रव येऊं दे; आणि तूं आपल्या कृपेनें सर्व लोकांच्या देखतां त्यांस उंचाव. हे उंचांत वास करणाऱ्या व दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, तूं आपले चमत्कार त्यांस दाखीव.

१ येहेजकेल अ. २४ ओ. ३. २ दीर्घपाडावपणांत पाठवीन. ३ इस्राएलांतले मोठमोठाले लोक. ४ अगे सियोन नगरी. ५ रिकामे परतवूं नको.

אל מלך नि:. प्रा.

שעה עליון हे परात्परा! गरीबाच्या वाणीकडे लक्ष दे, त्याची विनंति तूं धिक्कारूं नको. कारण "तूं आपणासाठीं या दिवसाचें, याच दिवसाचें नांव लिहून ठेव" असें ज्या दिवशीं बूझीचा पुत्र जो भविष्यवादी[1] यास सांगितलें गेलें, त्या दिवशीं त्याचें मन खेदित होतें. हे सैन्याच्या परमेश्वरा, ज्या संकटाकडून मला अतिशय दुःख प्राप्त होतें, त्याची आठवण कर; कारण या मकर राशींतें मजविरुद्ध तीन संकटांचा एकच मेळ मिळाला नव्हता काय? तिजमध्यें डळमळलेल्या लोकांमध्यें पटकी उठली, तुझ्या नामाविरुद्ध अपवाद करणारा त्याच्या हर्षयुक्त नगरीसमोर आला, आणि द्वारपालांचा नायक जो एज्रा याजक, तो नाहींसा झाला. हीं सर्व व यांसारखीं आणखी पुष्कळ दुःखें मजवर आलीं. या दिवशीं सिंह हर्षित झाला, आणि त्यानें माझ्या नगरावर तीर सोडण्यास आज्ञा केली, ती दाहावी राशि या दशमीस दाहाव्या वंशाच्या राहिलेल्या शेषास नष्ट करायास, आणि फलांच्या घुडाचा नाश करून माझीं निवडक द्राक्षें टिपून न्यावयास उठली; यासाठींच आश्शूर जो मला दुःख देण्यास उमेदवार आहे, त्याच्या दास्यत्वांत मी आहें; याप्रमाणें मी नष्ट होत आहें, तर यासाठीं किंवा त्यासाठीं मी रडावें हें मला कळत नाहीं. ज्या दिवशीं सिंह तुझ्या पवित्र नगरासमोर आला त्या या दिवशीं तूं आपल्या लोकांचें सहाय कर; या महिन्याच्या दशमीस त्यांचें ओरडणें ऐक व त्यांचीं पापें क्षमा कर; दडपून गेलेलें राज्य पूर्वीच्या दिवसाप्रमाणें नव्यानें स्थापन कर; आणि हे अनंता! पूर्वीप्रमाणें तुझ्या नामाची पवित्रता स्तविली जाऊं दे; मग आमचे सर्व द्वेषणारे व पीडणारे तुझ्या क्रोधाच्या सामर्थ्यानें तुडविले जातील; आणि जसे बाराकाच्या दिवसांत कादेशाजवळ तसे ते धरले व नष्ट केले जातील; तर हे परात्परा! सीयोनेकडे फीर, ह्मणजे आह्मी तुला तोंडातोड पाहूं, आणि सुवचनानें ह्मणूं कीं, हा आमचा देव पाहा.

יושב בשמים हे आकाशांत वास करणाऱ्या! अग्नीच्या

---

१ येहेजकेल. २ बारा राशींतील जी दाहावी. ३ टीका. २. ४ योसेफाच्या वंशाच्या. ५ न्यायाधीश. अ. ४ पाहा.

(ज्वालांत) व पाण्याच्या (डोहांत) पडलेल्यांवर कृपादृष्टि कर, आणि ज्या लोकांस त्यांच्या पापाकरितां दुप्पट शिक्षा झाली आहे, त्यांजवर ज्या दिवशीं शत्रूनें इस्राएलाच्या सैन्याच्या समुदायास वेढा घालण्यास आरंभ केला, आणि बाबेलचा राजा येरूशालेमेवर चढून आला, त्या या दिवशीं दया कर. हे संकटीं उत्तर देणाऱ्या, गरीबाचें दुःख तूं धिक्कारूं नको. या दाहाव्या महिन्याच्या दशमीस, ज्या दिवशीं बूझीचा पुत्र जो भविष्यवादी यास दृष्टांत दाखवून "तूं आपणासाठीं या दिवसाचें, याच दिवसाचें नांव लिहून ठेव" असें सुचविलेंस, आणि ज्या दिवशीं सिंह व चित्ता हे त्वरेनें आमच्या दाराजवळ येऊन ठेपले, त्या दिवशीं आमच्या दुःखाकडे लक्ष लावून पाहा. ज्या दिवशीं ते शत्रु आमच्या वतनाच्या गौरवयुक्त व मनोहर वाड्यावर चढून आले, त्याच दिवशीं धुळीनें माखलेल्या लोकांवर पटकी चालू झाली, त्याच दिवशीं एज्रा जो याजक व लेखक तो (आपल्या लोकांशीं) मिळाला. आणि त्या दिवशीं किरयाथ सेफेर एथें जय मिळविणाऱ्या सारख्या वीरांचें मन पाण्यासारखें झालें; कारण बाबेलचा राजा येरुशालेमेससमोर चढून आला होता.

एस्तरचा उपास.

या उपासाच्या दिवशीं אדני שפתי पर्यंत प्रार्थना केल्यानंतर हें पुढील ह्मणावें.

על ידי רחמיך पृष्ठ १.

אגגי בהעמיקו जेव्हां आगागीनें[4] पवित्र लोकांचा नाश व विध्वंस करण्याकरितां गुप्त मसलत करून आपल्या युक्तीचे विचार लपवून ठेविले, तेव्हां ईश्वरानें आपल्या लोकांस टाकूं नये ह्मणून येमीनी[5] हा आकाशांत राहणाऱ्या खडकरूप आश्रयापुढें हंबारून रडला. आगागीनें या दिवशीं इस्राएलाचे शेष नष्ट करायाचा व आमचा विध्वंस व समूळनाश करण्याचा बेत करून पूर ह्मणजे पण पाडला; परंतु येमीनी

---

१ नेबूखादनेसार व त्याचा सरदार नेबूझारआदान. २ मरणपावला. ३ टीका. ३. ४ आगागी कुटुंबांतला जो हामान यानें. ५ येमीनी ह्मणजे बिनयामीनी कुटुंबांतला मोर्देखाय.

हा त्यास मान देण्याकरितां त्यासमोर उठला नाहीं, व त्यास भ्यालाहि नाहीं; कारण जे परमेश्वरावर भरंवसा ठेवितात, त्यांस त्याची दया वेष्टिते. आगागीस त्याच्या पशुवत् विचाराच्या गर्वानें ठकविलें, त्यानें विखरलेल्या शेरडांचा नाश करण्याकरितां वीस हजार किक्कार[१] लागलेच तोलून दिल्हे; परंतु येमीनीनें आपलें मन शुद्ध करून उपास केला व अन्नपाणी त्यजिलें, कारण संकटाच्या दिवशीं परमेश्वर चांगला आश्रय आहे. आगागी आपल्या रंगमाहालांतून आनंदानें निघाला, आणि सत्वशील मनुष्यांस फांशीं देण्याकरितां त्यानें लांकडाचा खांब तयार केला; परंतु येमीनीनें ईश्वरी कृपा धारण करून ऐश्वर्यानें वेष्टिलेला, आणि पोरक्यांचा बाप व विधवांचा न्यायाधीश (जो देव,) त्याजवर भरंवसा ठेविला. आगागीनें त्वरेनें आपल्या सुज्ञ मित्रांस व आपल्या भांडखोर बायकोस बोलाविलें; परंतु त्यांनीं त्यास असा सल्ला दिला कीं, तूं लज्जायमान होऊन त्यापुढें पडशीलच पडशील; येमीनीनें सर्व गुह्य हादस्सेस[२] कळविलें, तेव्हां तिनें राजकीय वस्त्रें पांघरूण आपल्या जीवावर उपासाचें बंधन करून घेतलें. आगागी जेव्हां त्या निमित्ताच्या जेवणास बसला, तेव्हां त्या प्रिय व परोपकारी बाईनें चतुरपणें आपलें मुख उघडून (भाषण केलें), आणि येमीनी हा हामानाचा गुप्त मोड पाहून हंसला, आणि त्यानें जाणिलें कीं, पवित्रांच्या मंडळींत देव फार भयास योग्य आहे. हे आकाशांतील सेरफीम दूतांच्या मंडळीमध्यें पवित्र भयास योग्य असणाऱ्या (देवा) ! माझी विश्वासू मंडळी तुझा थोरपणा उच्चारिते; आणि मी तुझ्या तारणाची वाट पाहतों; तर हे परमेश्वरा ! तुझे शत्रु असे नाश पावोत. सर्व लोकांपेक्षां उणे झालेल्यांकरितां तूं आपल्या दयेला द्रव येऊं दे, आणि हे उंच आकाशीं वासकरणाऱ्या खडकरूप आश्रया, आणि दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा ! तूं आपल्या दयेनें सर्व लोकांसमक्ष त्यांचें रक्षण करून तूं आपला चमत्कार त्यांस दाखीव.

אֵל מלך.

יחלת עבריך तूं आपल्या सेवकांस आपल्या दृष्टांताच्या लेखाव-

१ हें एक प्रकारचें फार मोठ्या किमतीचें नाणें आहे. २ एस्तेरचें नांव हादस्सा असेंहि होतें.

रून अशी आशा दिल्ही आहेस कीं, त्यांच्या सर्व पाडाव नेणारांसमक्ष तूं त्यांजवर दया करशील; आणि जरी ते आपल्या शत्रूच्या देशांत आहेत, तरी त्यांचीं दुःखें दूर करण्याविषयीं तूं त्यांच्या मनाची शांति केली आहेस. परंतु सिंहानें तर मला माझ्या सफल द्राक्षवेलावरून तोडून दास्यत्वांत आणि दुःखाच्या देशांत नेलें आहे. पूर्वी तूं आपल्या सुज्ञ नियमाचें ध्यान करणाऱ्या चौघां (भक्तांस), ह्मणजे दानीएल, हानानया, मीशाएल व आजारया यांस रक्षिण्याकरितां त्वरा केलीस; आणि ते आपल्या शत्रूच्या देशांत असतां पहिल्यास सिंहापासून आणि दुसऱ्यांस अग्नीच्या ज्वालांतून तूं वांचविलेंस. एडक्यानें व डुकरानें मला त्रास देण्याकरितां व तुडविण्याकरितां त्वरा केली, माझा प्रकाश बहुतकरून अंधारमय झाला, आणि माझ्या सूर्याचें तेज झांकलें गेलें; तरी येमीनी व हादस्सा यांजकडून तूं माझे उजवे हाताचा आश्रय झालास. तेव्हां ज्या धनुर्धरांनीं जे तीर मजवर मारले, ते परत जाऊन त्यांच्याच उरांत लागले. माझ्या उल्लंघनामुळेंच तो पशुवत् मुर्ख मजवर उठला; जसें रानांतलें डुकर तसें त्यानें आपलें मुख मजवर पसरिलें. परंतु पूर्वीच तूं मजकरितां (आमच्या) मोकळ्या धर्माविषयीं भांडणांमध्यें उत्तर देणारें देऊन ठेविलें आहेस; आणि जरी ते आपल्या शत्रूच्या देशांत आहेत, तरी मी त्यांच्या बुद्धीविषयीं व त्यांच्या वचनाविषयीं आनंद मानितों.

ואף גם זאת आणि ते आपल्या शत्रूंच्या देशांत राहत असतां, त्यांची समाप्ति करावी व मी त्यांशीं केलेला करार मोडावा, असा मी त्यांस धिक्कारणार नाहीं; कां तर मी परमेश्वर त्यांचा देव आहें. आणि मी याकोबाशीं जो माझा करार तो आठवीन, आणि इसहाकाशीं जो माझा करार व आब्राहामाशीं जो माझा करार तो आठवीन, आणि देशहि आठवीन. संकटांत मी परमेश्वरास हाक मारिली, तेव्हां प्रशस्तस्थानीं त्यानें मला उत्तर दिल्हें. परमेश्वर माझा आहे, मी भिणार नाहीं; मनुष्य माझें काय करील? जे माझें सहाय करितात त्यांबरोबर परमेश्वर माझा आहे; ह्मणून मी आपल्या वैऱ्यांस पाहीन. मनुष्यावर

१ इ. रोग बरे करण्याविषयीं. २ नेबुखादनेसारानें. ३ इ. अंधाराच्या देशांत. ४ आहाश्वेरोशानें व हामानानें. ५ इ. घसा.

विश्वास ठेवणें, यापेक्षां परमेश्वराचा आश्रय धरणें, उत्तम आहे. अधिपतींवर विश्वास ठेवण्यापेक्षां परमेश्वराचा आश्रय धरणें उत्तम आहे. सर्व लोकांनीं मला वेढिलें, परंतु परमेश्वराच्या नामानें मी त्यांस छेदून टाकीन. मीं पडावें ह्मणून तूं मला ढकललें; परंतु परमेश्वरानें मला सहाय केलें.

יהירים קמו בכל דור पिढोपिढीं गर्विष्ठ (मजवर) उठले, परंतु देवानें मला रक्षिलें. पहिल्यानें सिंह उठला, त्यानें मला कोना कोपऱ्यांत दडपिलें; त्यामागून पिलीं हरण केलेली आस्वल उठली, तिनें मला अति नीचास विकून टाकिलें. मीं पडावें ह्मणून त्यांनीं मला ढकललें, परंतु परमेश्वरानें मला सहाय केलें. जेव्हां मी मिसऱ्यांच्या जुलमांतून निघालों, तेव्हां मी थकलेला व व्याकूळ असतां माझें मन दचकविण्यासाठीं मार्गांत सैर्पानें मला आडविलें; परंतु तूं त्याच्या मांड्यांवर व तंगड्यांवर मारून त्याचे तुकडे केलेस, ज्या दिवशीं नम्र (ह्मटलेल्यानें) आपले हात वर केले, तेव्हां तूं मला सबळ केलेंस. जेव्हां हामान जो आगागी अजगरासारखा मला गिळावयास उठला, आणि एकेच दिवशीं मला छेदून टाकण्याकरितां, जेव्हां त्यानें मजवर दोषारोप लिहिला, तेव्हां देवानें मजकरितां आकाशांतून सहाय पाठवून मला तारिलें, जीवंत राखलें, आणि सामर्थ्यानें व तारणानें मला वेष्टिलें. तुझें नाम माझा भरंवशाचा दुर्ग आहे; हे देवा, तूं मला (माझ्या आईच्या) उदरांतून काढिलेंस, आणि मरणापासून व कबरेपासून माझे जीवास, अश्रूंपासून माझे डोळ्यांस व ठेंच लागण्यापासून माझे पायांस मुक्त केलेंस; आणि परमेश्वर देवानें माझ्या पाडावपणाच्या देशांत मला वाढविलें.

דחה דחיתני मीं पडावें ह्मणून तूं मला ढकललेंस, परंतु परमेश्वरानें मला सहाय केलें. परमेश्वर माझें सामर्थ्य व माझें गीतच आहे; तो माझें तारणहि झाला आहे. हर्षाचा व तारणाचा शब्द नीतिमा-

---

१ नेबुखादनेसार. २ आहाश्वेरोश, ज्यानें हामानानें वीस हजार रुप्याचे किक्कार देवूं केल्यावरून सर्व इस्राएलांचा नाश करण्याचा हुकूम त्यास दिल्हा तो. ३ मिसरांतून निघाल्यावर इस्राएलांशीं पहिल्यानेंच जो आमालेक लढला त्यानें. ४ आमालेकांशीं लढाई चालत असतां मोशे एका टेंकडीवर गेला; तेथें जेव्हां तो आपले हात वर करी तेव्हां इस्राएल बलावत असत.

नांच्या वस्त्यांत आहे, परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो. परमेश्वराचा उजवा हात उंचावलेला आहे; परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करितो. मी मरणार नाहीं परंतु वांचेन; आणि परमेश्वराचीं कर्में कथीन. अनंतानें मला मोठी शिक्षा लाविली; परंतु मरणाच्या हातीं मला सोंपिलें नाहीं. मजसाठीं तुह्मी नीतीचीं द्वारें उघडा, मी त्यांतून आंत जाऊन परमेश्वराला स्तवीन. हें परमेश्वराचें द्वार आहे, यांतून नीतिमान आंत जातील. तूं मला उत्तर दिल्हेंस, व तूं माझें तारणहि झालास ह्मणून मी तुला स्तवीन. जर परमेश्वर आह्मांकडे नसता, (तर त्यांनीं आह्मांस सजीव गिळलें असतें) असें इस्त्राएल ह्मणतो.

אַיךְ זֵדִים अघोर शत्रूंनीं मला मधमाशांसारखें कसें वेढिलें ! जेव्हां हामान या वेळीं उठला, आणि आपलें योग्य वेतन समजून त्यानें मला लुटिलें; तेव्हां माझ्या पुष्कळ अपराधांमुळें, ज्यावर कांहीं उपाय चालत नाहीं असा कंपनाचा प्याला त्यानें मला पाजिला; परंतु जर परमेश्वर आह्माकडे नसता, तर ह्यांनीं आह्मास सजीव गिळलें असतें. त्यांनीं त्यांस जगांतून अगदींच नाहींसें करण्याकरितां कशी योजना व कल्पना केली ! इस्त्राएलांच्या विलक्षण राष्ट्रांचा संहार करण्याकरितां त्यांनीं विचार केला; त्यांचा समूळ नाश करण्याकरितां त्यांनीं गुप्त मसलत केली; आणि भट्टी व चूल यांमध्यें सांपडले असतांहि पाण्यानें आह्मास बुडविलें असतें. शत्रु उठला आणि त्यानें आपला पूर्ण हेवा व वैर मजवर चेतविला, आणि सर्व समर्थांची मंडळी व त्याचें वतन असें मानिलेल्या लोकांचा नाश करण्याकरितां राजाचा हुकुमनामा बजावण्यास त्यानें वेळ नेमिला; परंतु खडकरूप आश्रयानें दया व कृपा करून त्याचा व त्याचे पुत्र ज्यांनीं आह्मास दुःख दिल्हें, त्यांचा नाश व संहार करून आपलें सामर्थ्य दाखविलें. संकटसमयीं शत्रूनें विचार करून पूर ह्मणजे पण पाडिला; परंतु खडकरूप आश्रयानें त्याकडे लक्ष देऊन त्याची फेड त्याच्याच शिरीं केली, या आदार महिन्यांत जे आह्मास मारीत होते, त्यांस गौरववान देवानें मारून व त्यांचा समूळ नाश करून आपल्या मंडळीस आपलें सामर्थ्य दाखविलें.

---

१ इ. राष्ट्राच्या कन्येचा.

״ לולי इस्राएल ह्मणतो कीं, जर परमेश्वर आह्माकडे नसता, जेव्हां मनुष्यें आह्मावर उठलीं, आणि जेव्हां आह्मावर त्याचा क्रोध संतप्त झाला, तेव्हां जर परमेश्वर आह्माकडे नसता, तर त्यांनीं आह्मास सजीव गिळलें असतें. जलांनीं आह्मास बुडविलें असतें; प्रवाह आमच्या जीवावर गेला असता. तेव्हां उचंबळलेलीं जलें आमच्या जीवावर गेलीं असतीं. परमेश्वर ज्यानें आह्मास त्यांच्या दांतांसाठीं आहारसा दिला नाहीं, तो सुवंदित असो. जसा पक्षि पारध्यांच्या फासांतून, तसा आमचा जीव मुक्त झाला आहे; फांस तुटला आणि आह्मी मुक्त झालों आहों. परमेश्वर जो आकाशाचा व पृथ्वीचा उत्पन्नकर्त्ता, त्याच्या नामांत आमचें सहाय आहे.

ארני שמעה हे प्रभू, ऐक; हे प्रभू, क्षमा कर; हे प्रभू, कान देऊन कार्य कर; उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं, तुझ्या नगराला व तुझ्या लोकाला तुझें नांव ठेविलें आहे. हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव, ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

तम्मूजचा उपास.

या उपासाच्या दिवशीं ארני שפתי पर्यंत प्रार्थना केल्यानंतर हें पुढील ह्मणावें.

וארץ שפל רומי माझा थोरपणा पडून धुळीस मिळाला आहे; ज्या दिवशीं दुष्टानें मला नमविण्याची योजना केली, (त्या दिवशीं) माझ्या मनाचा हर्ष बंद झाला; कारण माझ्या विश्रांतीच्या ठिकाणांतून मी हांकून लाविला गेलों; माझे उदार व परोपकारी लोक ज्या दिवशीं नाहींसे झाले, त्या दिवशीं माझ्या वेसींत दुःख व शोक ऐकूं येतो; ह्मणून मीहि प्रतिवर्षीं[1] चौथ्या महिन्यांत शोक करितों.

בחרש הרביעי चौथ्या महिन्यांत दुःखांनीं व संकटांनीं मला घेरिलें, या सतराव्या तारखेस मी दुःखामुळें थकलों, आणि कोठेंच मला आश्रय मिळत नाहीं, मोठ्यानें मोठ्यानें मी रडतों, आणि आह्मा सर्वांच्या डोक्यावर टक्कल[2] आलें आहे; कारण याच दिवशीं पाट्या फुटल्या. त्या पाट्या माझ्या हातांतून गेल्या, संकटांनीं मला घेरिलें,

१ इ. दिवसेंदिवस. २ डोक्यावरील टक्कल ही दुःखाची खूण होती. ३ टीका ४.

माझ्या शत्रूचा हात मजवर बळावला, आणि त्यानें कोनोंकोनीं माझी दाणादाण केली; तर (हे देवा,) आतां तुझ्या आश्चर्यकारक वेळाची वाट पाहणारांचें तूं वेष्टन हो, आणि त्यांचें रक्षण कर; कारण सैन्याचा देव सूर्य व ढाल असा आहे.

בחדש הרביעי चौथ्या महिन्यांत मी चिखलाच्या लोंढ्यांतून वर येण्याची योजना केली, परंतु आधार देणारा कोणी नव्हता. त्याच्या सतराव्या तारखेस शत्रूनें मला मारून माझा नाश करावा ह्मणून मी (त्याचे हातीं) लूट असा सांपडलों, आणि कोठेंच मला आश्रय मिळत नाहीं. माझीं दुःखें नेहेमीं मजसमोरच आहेत; कारण याच दिवशीं नित्याचें अर्पण बंद पडलें. ज्या दिवशीं नित्याचें अर्पण बंद पडलें, त्या दिवशीं एग्लाईमाच्या आकांतासारखा माझा आकांत वाढतो, आणि हा-दादरिम्मोनाच्या शोकापेक्षां माझा शोक दुप्पट होतो. तर हे आकाशांत वास करणाऱ्या देवा, तूं आमचें वेष्टन हो, आणि आमच्या गाढ झोंपेंत पडलेल्यांस जागृत कर. तोच आह्मास दोन दिवसांनंतर सजीव करील.

בחדש הרביעי चौथ्या महिन्यांत मीं आपल्या खडकरूप आश्रयाचा क्रोध व त्याचा मजवर चेतलेला राग सोसिला; त्याच्या सतराव्या तारखेस मला थरकांप सुटला, आणि वादळानें मला उधळलें; सेईराच्या वादामुळें मी पूर्वीचं सुख विसरलों, आणि माझ्या जीवानें शांतीचा तिरस्कार केला; कारण या दिवशीं नगर फोडलें गेलें; ज्या दिवशीं तेमान व मगदीएल हे उठले, त्या दिवशीं नगर फोडलें गेलें, माझा हात अशक्त झाला आणि मला कोठूनच सहाय मिळालें नाहीं. तर (हे देवा,) आतां फीर, आरीएलाच्या शेषास तूं पवित्र कर; ह्मणजे तेहि याकोबाच्या पवित्रास व इस्राएलाच्या देवास पवित्र मानितील.

בחדש הרביעי चौथ्या महिन्यांत हायहायचा, निषेधाचा व क्रोधाचा दिवस होता, त्याच्या सतराव्या तारखेस माझें महत्त्व गेलें,

---

१ इ. खाऊन. २ टीका ५. ३ टीका ६. ४ टीका ७. ५ टीका ८. ६ तेमान व मगदीएल हे उत्पत्ति अ० ३६ एथें सांगितलेल्या एदोमाच्या नायकांतले दोघे होते. ७ आरीएल हें नांव यशाया अ. २९ ओं. १–२ एथें येरुशालेमेस दिलें आहे.

आणि माझी शोभा लुटली गेली; माझ्या भंगास कांहीं उपाय झाला नाहीं, मजवरील घाव वाढूं लागले, आणि माझें हृदय फुटून गेलें; कारण त्या दिवशीं आपोसतेमोसानें शास्त्र जाळलें. ज्या दिवशीं शास्त्र जाळलें गेलें त्या दिवशीं मला नवीन दुःख झालें, आणि माझे वृद्ध व ह्मातारे पवित्र नगरांतून पाडाव होऊन गेले; तर (हे देवा,) आतां फीर आणि आपल्या सामर्थ्यानें आपल्या सत्वशील मंडळीवर दया करून, त्यांजवर बुद्धीचा व परमेश्वराच्या भयाचा आत्मा घाल.

בחדש הרביעי चौथ्या महिन्यांत परक्यानें माझा दुराचार मापानें मापिला आणि सतराव्या तारखेस त्या परक्यानें माझें मंदिर ओसाड केलें व याकोबास खाऊन टाकिलें. या दिवशीं प्रतिवर्षी अनेक कारणांवरून मला दुःख करावें लागतें; कारण याच दिवशीं पवित्र ठिकाणीं मूर्ति स्थापली गेली.[४] ज्या दिवशीं पवित्र ठिकाणीं मत्सरयुक्त व ओंगळ मूर्ति स्थापन झाली, त्यादिवशीं माझे जीवावर घाव होतात, आणि माझे आशेची निराशा होते. तर (हे देवा,) आतां तूं आपल्या लोकांचा भ्रष्टाचार नीट कर, आणि दयेनें त्यांजवर प्रीति कर. हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं.

ויעבור आणि על ידי רחמיך. पृष्ठ १.

אזי בבגדי जेव्हां मीं आकाशांत वस्ति करणाराचीं वचनें धिक्कारलीं, आणि त्यामुळें जेव्हां माझे अपराध एकत्र झाले; तेव्हां माझ्या पिडणारानें मजवरील जोकड भारी केलें; शत्रुचा हात मजवर प्रबल झाला, हातोडीनें त्यानें मला ठेंचलें, त्यानें आपल्या रागानें फाडून माझे तुकडे केले. त्यानें (देवानें) जो मार्ग मला शिकविला होता, तो मीं धिक्कारला; यास्तव पाहा, त्याचा राग, क्रोध व संताप मजवर चेतला, त्यानें आपला राग मजवर ओतला, मजवर नेम धरण्याकरितां मला उभें करून त्यानें आपले तीर मजवर सोडले. या दिवशीं एकामागून एक अशीं पांच अरिष्टें मजवर आलीं; त्यांनीं माझी मंडळी विदारिली, आणि मला

१ टीका ९. २ माझ्या दुराचाराची झडती घेतली, किंवा योग्य शिक्षा केली. ३ इ. खावें लागतें. ४ टीका १०. ५ टीका ११.

ओसाड करून ठेविलें आहे; माझा जीव थकला व भागला; या गोष्टी ऐकून मी घाबरा झालों व पाहून भयभीत झालों. हें जेव्हां मला आठवतें, तेव्हां माझें कण्हणें चेततें, मजमध्यें ज्वाला पेटतात, आणि माझ्या अंतरमाळेचा व गुर्दकमळांचा भडका होतो; मी मोठ्या दुःखानें शोक करितों, आणि (सर्व) हर्ष दूर करितों; कारण या दिवशीं पाट्या फुटल्या. मजविरुद्ध परके जमा झाले, व त्यांचें सैन्य एकत्र मिळालें; त्यांनीं मला पाण्यासारखें घेरिलें, त्यामध्यें मी बुडालों, मला उभें करणारा कोणी नाहीं; याकरितां मी आपल्या मुखानें शोक व नेहमीं आक्रंदन करितों; कारण यादिवशीं नित्याचें अर्पण बंद पडलें. माझ्या नाश करणारांनीं नदीच्या पुराच्या धुमाळीप्रमाणें धुमाळी केली, त्यांनीं दास्यत्वांत माझा जीव नाहींसा केला, (माझें प्रेत पशूस) खाण्यासाठीं दिलें; त्यांनीं मजवर जमाव बोलविला, आणि माझी मंडळी अगदीं नागविली आहे; कारण यादिवशीं पवित्र ठिकाणीं मूर्ति स्थापिली गेली. परक्यानें माझ्या मोठ्या लोकांस दुःख दिलें, त्यांचीं द्वारें त्यानें जाळून उघडलीं; रागाच्या व क्रोधाच्या दिवशीं त्यानें माझा द्राक्षमळा ओसाड करून टाकिला; परक्यानें आपली इच्छा पुरवून घेतली व त्याचा हात सामर्थ्यानें प्रबल झाला; कारण या दिवशीं आपोसतेमोसानें शास्त्र जाळलें. ज्या दिवशीं परमेश्वराचा राग मजवर चेतला, त्यादिवशीं दुष्टांनीं मजवर दांत करकरविले; त्या परक्या शत्रूनें लहानथोरांतून कोणावरहि दया केली नाहीं; त्याचा राग मजवर चेतला, व त्याचे इंगळ मजमध्यें पेटले; कारण या दिवशीं नगर फोडलें गेलें. हे परमेश्वरा, शोकग्रस्तांवर दया कर व त्यांच्या मनाचें समाधान कर; हे अनंता! दयेच्या आसनावर बसणाऱ्या देवराजा, या सतराव्या तारखेस उदास होऊन बसणाऱ्यांवर तूं आपल्या दयेचा लोट येऊं दे.

אֵל מֶלֶךְ. नि. प्रा.

שעה נאסר बंदांत पडलेले आणि बाबेलच्या व नगरावर (पाठविलेल्या) सरदाराच्यी हातीं सोंपलेल्यांकडे कृपादृष्टीनें पाहा; किती दिवसांपासून ते तुजकडे ओरडतात, आणि लहान मुलाप्रमाणें

१. नेबूझारआदान जो येरुशालेमेवर चढून येण्यास नेमिला होता त्याचे.

काकळूत करितात! हे खडकरूप आश्रया, ज्या दिवशीं शत्रु प्रबल झाला आणि नगर मोडलें गेलें, त्या दिवशीं खेदित मनानें व कळकळणाऱ्या अंतर्यामानें ते तुजपुढें दयेकरितां आग्रह करितात. यावरून ह्मणजे या दिवशीं मजवर पांच अरिष्टें आलीं ह्मणून मी ओणवा होऊन हातावर हात आपटीत आहें; (रानांत केलेल्या) वांसरापायीं (पहिल्या) पाट्या माझ्या हातांतून गेल्या; परक्यानें माझा किल्ला जिंकून मला बंदांत नेलें; नित्याच्या अर्पणाचा त्यानें नाश केला, आणि तें अर्पिण्यास त्यानें मनाई केली; सुंदर मंदिरांत मूर्त्ति मांडिली गेली, आणि त्या परक्या शत्रूनें तुझें नेमशास्त्र अग्नीनें पेटविलें. सर्व समर्थानें ज्या दिवशीं मला निराश्रित टाकिलें, त्या दिवशीं मी कष्टी होतों व थरथर कांपतों; कवड्या सापानें उत्तरेकडून येऊन लोंढ्याप्रमाणें मजवर प्रलय केला, सुंदर देशांतून त्यानें मला पाडाव करून नेलें आणि चेंडूप्रमाणें उडविलें; त्या दिवशीं शेशाखेनें माझा प्रकाश अंधारमय केला, आणि लोटून मला पारासाचे हातीं दिलें; आणि त्यानें मला खाऊन फस्त केलें, यावरून मी शोक करितों. हे माझ्या आश्रया! तुझा राग मजवर सर्वकाळ चेतेल काय? पेरेसाच्या पुत्राकडून माझी मोडलेली कुंपण नीट करीव, कांट्यांतून गुलाबाचीं फुलें निवडून घे, आपले डोळे उघडून माझी प्रार्थना पुष्पार्पणाप्रमाणें मान्य कर, तुझ्या वस्तीचें मंदिर बांध, कर्मेल व बाशान या सीमा पुनः स्थापन कर, आणि मुक्यांचा न्याय कर; ह्मणजे (तुझ्या पवित्र मंदिराच्या) धुंडाळणाराची व तें जाळणाराची योग्य फेड होईल.

אלהי ישעֵנו हे आमच्या तारणाच्या देवा, आमच्या अरोळीकडे लक्ष दे, आणि आमच्या नाशाकडे व आमच्या दीर्घ पाडावपणाकडे पाहा; आमच्या पूर्वजांवर ज्या दिवशीं पांच संकटें आलीं, त्या दिवशीं प्रतिवर्षी आमच्या दुःखाची आह्मास आठवण होते. हे (सर्व) प्राणिमात्रांच्या देवा, गुप्त गुर्दकमळें पारखणाऱ्या, आह्मी विनंति करितों कीं,

---

१ एथें कवड्यासापाची उपमा नेबूखादनेसारास दिल्ही आहे. २ टीका १२. ३ दावीदाचा पूर्वज पेरेस याच्या कुलांत जन्मणाऱ्या माशीयाहकडून. ४ ही उपमा शेलोमाच्या गीतांत इस्राएलांस अनेक वेळ दिल्हेली आहे.

हांकून लावलेल्या आणि चोहों दिशांकडे विखरलेल्या शेरडांकडे लक्ष लाव, तीं प्रतिवर्षी या वेळीं दुःख करितात; ज्या दिवशीं तीं दुष्टाईकडे वळलीं त्या दिवशीं पाट्या फुटल्या, ह्मणून त्या दिवशीं आह्मी आमच्या आयुष्याच्या सर्व दिवसांत आपल्या दुःखावरून शोक करितों. चिखलाच्या लोंढ्यांत रुतलेल्यांस तूं सोडीव, त्यांस उभे करणारा कोणी नाहीं; ह्या (तुझ्या) कळपानें खाल्लें, लुटिलें व नासिलें जावें ह्मणून तूं त्यांस सोडून दिलें आहेस; प्रतिवर्षी दुःख करण्यास (तो कळप) यादिवशीं एकत्र होतो; यादिवशीं शत्रूनें आपला हात उभारला, आणि याचदिवशीं आमच्या पुष्कळ अपराधांमुळें व मोठ्या पापामुळें नित्याचें अर्पण बंद पडलें. हे अनंता व सर्वशक्तिमान देवा, ज्या वांकड्या व मूर्ख मनुष्यानें याकोबाचे शेष खाऊन टाकिले आहेत, त्यांच्या हातांतून अगदीं अपत्यहीन झालेल्या (लोकांस) खंडून घे; प्रतिवर्षी या दिवशीं ते दुःखावर आपला निर्वाह चालवितात, कारण शत्रूनें मजसमक्ष पवित्र ठिकाणीं मूर्ति उभी केली, यावरून आह्मावर आलेल्या विघ्नामुळें आमचे अश्रू वाहतात. आमचा नाश किती भयंकर; कारण जो भयपात्र व आपणांस गौरवानें आच्छादणारा यापासून आह्मी वळलों, त्यानें माझी फेड सर्वांस दाखविली आहे; मी प्रतिवर्षी या दिवशीं शोक शोधितों, कारण यादिवशीं आपोसतेमोसानें शास्त्र जाळलें; यावरून व आमच्या शोभायमान मंदिराचा नाश झाला ह्मणून आह्मी लज्जित होऊन पडून राहतों. दयाळू देव आमचे अपराध क्षमा करील, तो आपला पूर्ण राग चेतविणार नाहीं; (हे देवा,) तुझ्या विखरलेल्या व धिःकारलेल्या शेरडांस सेईराच्या हातांतून खंडून घेण्यास त्वरा कर; ज्या दिवशीं शत्रू प्रबल झाला व नगर फोडलें गेलें, त्या दिवशीं प्रतिवर्षी माझें अंतर्याम कळकळतें; कारण आह्मी आमच्या भोंवतालच्यांस थट्टा व हंसें असे झालों आहों. हे दयावंता! पिडलेल्या सीयोनेकडे दयेनें फीर, आणि खेद करणारीस शांतवन त्वरेनें पाठीव, ह्मणजे आमचे विखरलेले जेव्हां एकवट केले

---

१ रानांत सोन्याचें वांसरूं करण्याच्या दुष्टाईकडे. २ उपोषणानें हा दिवस काढितात. ३ इ० भंग.

जातील, आणि आमचे पाडावपणांतून तूं आह्मांस नेशील, तेव्हां आह्मी तुझ्या नाश पावलेल्या कन्येविषयीं गायन करूं.

यानंतर व मागील प्रत्येक उपासाच्या भागानंतर אנשי אמונה אל מלך इत्यादि वाचावें.

तम्मूजच्या उपासानंतर पहिल्या शाब्बाथ दिवशीं.

דברי נביאים भविष्य जाणणाऱ्या भविष्यवाद्यांचीं वचनें पूर्वी देवाच्या सर्व लोकांत ऐकविलीं जात असत, तीं अशीं कीं, तुह्मी आपल्या खडकरूप आश्रयापुढें आपलीं हृदयें फाडा, परंतु त्यांनीं व्यर्थ मेहेनत केली व निष्फळ श्रम केले. त्यांनीं त्यांच्या निषेधाकडे कान दिल्हा नाहीं व ऐकिला नाहीं; त्यांनीं ईश्वराचा विवेक नाकारिला. त्यांच्या पापांनीं त्यांस पूर्वेकडे व पश्चिमेकडे हांकून लाविलें आहे; ते आपल्या वतनावरून जाऊन बंदिशाळेंत पडले आहेत. त्यांचें तेज अंधारमय झालें आहे, ते आपल्या पवित्र वस्तिस्थानांतून जाऊन पृथ्वीच्या तळाशीं बुडाले आहेत. त्यांच्या भंगामुळें मी याजेरासारखा शोक करितों; त्यामुळें माझे कान ठणकतात व माझ्या डोळ्यांतून अश्रु वाहतात. ते अन्य लोकांच्या देशीं असतां, हे खडकरूप आश्रया! त्यांजवर दया कर; कारण तुझ्या शिक्षेमुळें व रागामुळें ते ओणवे झाले आहेत. त्यांकरितां उद्धारक पाठवून आपली ज्योति प्रकाशित कर; मग तुझें सामर्थ्य व तुझा प्रकाश प्रफुल्लित होईल.

לו ישקלו माझे शेजारी माझा व्याकुलपणा ताडून पाहते तर बरें! तो माझ्या अतिक्रमाप्रमाणें समुद्राच्या कांठावरील रेतीसारिखा वाढला आहे. यास्तव मला मूर्च्छा येऊन माझीं वचनें गोंधळतात, व माझे सर्व विचार नाश पावतात. जर माझी मंडळी वधली गेली आहे, आणि माझ्या मंदिराचा नाश झाला आहे; तर मीं पहिल्यानें कशाविषयीं शोक करावा! वाऱ्यावरून व वाइटावरूनहि प्राणिमात्रांनीं तुला स्तवावें हें योग्य आहे; ह्मणून माझा एकुलता जीव तुझी स्तुति करितो.

נשמת שרודים नाश पावलेल्या व विखरलेल्या लोकांचा आत्मा पिडकाच्या देशांतहि तुला स्तवितो; ते लोक याजकांतील हिलकीयाचा

१ टीका १३. २ इ. हातामुळें.

पुत्र इर्मेया याच्या वचनाचें शोकानें ध्यान करितात. आनाथोथांतील भविष्यवाद्यांच्या वचनाविरुद्ध बंडावा करून आपलीं मनें कठोर करणारांचा आत्मा त्या भविष्यवाद्यांच्या गोष्टी ह्मणजे ज्या देवानें त्यांस पाठविलें त्याच्या गोष्टी आठवून वर्षोवर्षी तुला वर्णितात. कंपायमानाच्यांचा व शोक करणाऱ्या मजुरांचा आत्मा तुझें सामर्थ्य मान्य करितो; त्यांनीं आपले कान बंद केले होते, आणि त्यांनीं एकत्र होऊन एक चित्तानें भविष्यवाद्यांचीं वचनें ऐकिलीं नाहीं. आपल्याच पापाच्या फांसांत व जाळ्यांत गुंतलेल्यांचा आत्मा तुजसाठीं उत्कंठित होत आहे; तूं त्यांस शांतवनाच्या वचनानें शुभवर्त्तमान कळवून त्यांच्या कल्याणाच्या गोष्टी आरंभून पूर्ण कर. जे आपल्या अपवादाच्या बंडामुळें नीच झाले आहेत, त्यांचा आत्मा शोकाच्या वेळीं तुझें गायन करो, आणि आमचीं तोंडें समुद्रासारखीं गायनानें भरोत.

לפדות עם דל माझ्या पीडकाच्या दास्यत्वांतून गरीब लोकांस सोडवायास, आतां माझ्या प्रभूचा थोर पराक्रम दिसून येवो. तेथें पारवा परक्याच्या हातीं कोठपर्यंत राहील ! सूर्याची पूजा करणाराचा हात तर बळावला आहे, दासीपुत्रानें माझा मळा ओसाड करून ठेविला आहे. हे परमेश्वरा, ऊठ, झोंपीं कां जातोस ! तो कष्टकऱ्यांवर अणखी जुलूम करून त्यांस जोंकडास जुंपतो, ह्मणून मूर्त्तीची सेवा करणारांचा नाश व क्षय कर, आणि विखरलेल्यांस तूं आपल्या मंदिरीं पुनः वसीव, मग "परमेश्वर उंचावला जावो" असें ते नेहमीं ह्मणतील.

שנה בשנה वर्षोवर्षी पारव्यासारखा मी ध्यान करितों, कारण सकुमार नगरी व्यभिचारिणी झाली आहे. तिच्या राज्याच्या व तिच्या लोकांच्या नीच पदावरून आश्चर्य वाटतें, तिच्या द्वेषणाऱ्यांनीं तिजवरील हार व कुंडलें हिरावून घेतलीं, तिचें ठिकाण रानगाढवाची आश्रयाची जागा झालें आहे, ईश्वरी साक्षात्काराच्या ठिकाणीं घातक पशु व शाहामृग राहतात ह्मणून हर्षाबद्दल आकांत व शोक होत आहे. तिच्या ओळखीच्या व परिचयाच्या मनुष्यांस विसावा कोठें सांपडेल ! तिच्या आसनीं केदाराचे[३]

१ इर्मेया. २ इस्राएल, शेलोमोच्या गीतांत इस्राएलांस पारव्याची उपमा अनेक वेळ दिलेली आहे. ३ केदार हा इश्माएलाचा पुत्र होता.

आणि हामाचे पुत्र बसले आहेत; ती (नगरी) आपले पापांत असतां, तूं तिचें सांत्वन कसें करशील? सर्व प्रांतोप्रांतीं तिची थट्टा होत आहे; तिनें लज्जेचा व विस्मयाचा वांटा उचलला आहे. धिःकारलेले व अनाथ, आणि संकटांत पडलेले गरीब व दरिद्री लोकांच्या प्रार्थनेकडे फीर, शिनआरांत विखरलेल्यांस सीयोनेंत एकवट कर, मग ते आमाना पर्वताच्या[1] शिखरावरून धूपाच्या डोंगराकडे[2] देवाला धन्य ह्मणत येतील.

יונה נכאבה दुःखानें गांजलेल्या पारव्यांचा[3] जीव क्षीण होत आहे; तो आकाशांत वस्ति करणाराच्या मंदिरास प्रतिदिवशीं प्रदक्षिणा करीत असेतो. मोठ्या वाणीनें तो आपल्या प्रियकराची काकुळति करितो; तो जाणतच आहे कीं, त्याच्या मूर्खपणामुळें हा प्रवास दीर्घ वाढला आहे; जर तो सुवर्णमय करारावर आवड ठेविता, तर किती बरें असतें! त्याच्या खडकरूप आश्रयानें त्यास त्याच्या डोळ्याच्या पुतळीप्रमाणें व बाहुलीप्रमाणें पुनः पूर्वस्थितीस आणिला असता. हे प्रियकन्ये! ऊठ, आतां बसली राहा; अगे सुंदर मुली! तुजवर उजेड प्रकाशला आहे, तुजवरील राग निघून गेला आहे; आतां तूं दासी होणार नाहींस; आणि शेबा व सेबा यांचे प्रलय तुजवरील प्रीतीचा निःपात करूं शकणार नाहींत.

तम्मूजच्या उपासानंतर दुसऱ्या शाब्बाथ दिवशीं.

שמעו והאזינו अहो! तुह्मी माझें ह्मणणें ऐका व त्याकडे कान लावा; माझा आश्रय जो देव, त्यास मी ह्मणतों कीं, तूं मला कां विसरलास! माझे पीडणारे वाढून व एकवट होऊन मला मारितात; मग मी आणखी कशाची आशा करूं? मोआब व आराब यांच्या लेंकरांनीं मला फासांत धरण्याकरितां खांच खणिली, अशीं अनेक संकटें मजवर आलीं. जरी पूर्वीं त्वां मला डाव्या हातानें धक्यावर धक्के दिल्हे; तरी आतां तूं आपल्या उजव्या हाताच्या सामर्थ्यानें मला आपणाजवळ घे. माझ्या ओंठांच्या वचनाकडे कान लाव, आणि ह्मण कीं, "माझ्या लेंकरांविषयीं व माझ्या

---

१ आमानापर्वत खनान देशाच्या उत्तर शीमेवर आहे. २ टीका १४. ३ इस्राएलाचा. ४ मंदिर पुनः बांधलें जावें ह्मणून नित्य प्रार्थना करीत असतो. ५ पवित्रशास्त्रावर. ६ शेबा व सेबा हे हामाचे वंशज होते. ७ इ. काल. ८ इ. आज.

हाताच्या कामाविषयीं मला आज्ञा कराल काय?" ज्या दिवशीं (सर्व) प्राणी माझी सेवा करायास उभे राहतील, (त्या दिवशीं) मी त्यांचा जीव माझें स्तवन करायास आपल्या पवित्र नगरा जवळ आणीन.

נשמת ילדים आरीएलेच्या नाशामुळें एकांतवासांत बसलेल्या लेंकरांचा आत्मा लज्जित व विस्मित होतो; कारण "याकोबाच्या घराण्या व इस्राएलाच्या वंशांच्या कुलांनो, तुह्मी परमेश्वराचें वचन ऐका" हें देवाचें वचन त्यांनीं ऐकिलें नाहीं. माझी छाया निघून गेल्यादिवसापासूनं निराशा झालेल्या दरिद्रांचा आत्मा, हे यथार्थ बोलणाऱ्या, तुला सत्य मानितों; कारण तूं त्यांस सांगितलें होतें कीं, "लेंकरांनो, माझे शब्द ऐका; तुमच्या पूर्वजांस माझ्या अंगीं कोणता अन्याय सांपडला, ह्मणून ते मजपासून दूर गेले? पवित्र लोक जे भट्टीच्या व चुलीच्या मध्यें पडले आहेत, त्यांचा आत्मा शोक करीत चालला आहे; कारण त्यांनीं आकाशांत वस्ति करणाराचा नियम धिःकारला, आणि ज्या परमेश्वरानें आह्मास मिसर देशांतून आणिलें, तो कोठें आहे?" असें त्यांनीं विचारिलेंहि नाहीं. दुःखानें गांजलेले व बंदांत गुंतलेले लोकांचा आत्मा तुला थोर मानितो; आणि (ते लोक) आपली वाणी समुद्राच्या व लाटांच्या गर्जनेसारखी उंचावून विनंति करितात आणि ह्मणतात हीं आमचीं तोंडें समुद्रासारखीं गायनानें भरोत.

אל את אויבי हे देवा, तूं आपल्या शत्रूंचा लवकर व थोडक्या वेळांत नाश व निःपात कर. त्याच(देवाला) मात्र मी ध्यान करून हाक मारितों, कारण माझ्या संकटीं माझें सहाय असा तो ह्मटलेला आहे? आणि माझ्या वैऱ्यांवर राग, क्रोध व क्षोभ येवो, आणि त्यांचा सूर्य मावळो. हे पवित्र व भयंकर (देवा), आणि आश्चर्यकृत्यें करणाऱ्या, तुझी मंडळी जी चिखलानें व मळानें भरली आहे, तिला बंदिशाळेंतून काढ, आणि माझ्या लोकांवर बलात्कार करणारांचा नाश व निःपात कर. हे परात्पर देवा, तुझें नाम थोर मानिलें जावो; तूं आपल्या गरीब व दरिद्री लोकांवर दया कर, आणि अन्य भाषेच्या लोकांचें तोंड विरस करून त्यांमधून त्यांस सीयोन डोंगराकडे चढीव.

१ टीका १५. २ येरुशलेमेच्या. ३ माझा आश्रय नाहींसा झाल्यापासून.

יום כמו נר ईश्वराचा आशीर्वाद पावलेल्यांचें संतान, जे पवित्र लोक, त्यांकरितां आज माझ्या तोंडावर केवळ अश्रूंचे ढीगच उभे आहेत. त्यांचें सर्व गौरव निघून गेलें, आणि त्यांच्या सुंदरपणाचें सामर्थ्य नमलें; कारण परमेश्वर रागानें त्यांशीं वाद करावयास उभा आहे. भविष्यवाद्यांनींहि लज्जा पांघरून आपलें डोकें झांकून घेतलें आहे; आतां त्यांस ईश्वराचा दृष्टांत होत नाहीं. ते या प्रवासांत आपले हात सत्यानें दृढ करितात, कारण परमेश्वर दयाळू व कृपाळू आहे. ते तुला थोर मानून प्रत्येक आपल्या भावास हाक मारून ह्मणतात कीं, तुह्मी देवाला स्तवा, आणि परमेश्वराचें सुवंदन करा.

עד אן צבי हांकून लावलेल्या हैरणास कोठपर्यंत कोणीच एकवट करणारा नसेल ! तें दुःखांत पडून गुंतलें आहे, त्याच्या तिडकाहि फारच वाढल्या आहेत, ह्मणून तें मोठ्यानें ओरडून कडवटपणें आपल्या दुःखाच्या क्लेशामुळें रडतें; त्याची थट्टा, धिःकार, व पाठलाग करणारानें त्याच्या मानेवर जोकड ठेविलें आहे, तें तें वाहत आहे. जुलमामुळें मी देवाकडे ओरडतों, परंतु कोणीच उत्तर देत नाहीं; यास्तव माझें मन फारच रिचवितें व खेदित होतें; मी आपली पाठ परक्यास व अन्य सरदारांस तुडवायास दिली आहे; आणि मृत्युलोका एवढ्या खोल खांचेंतून मी ओरडत व कण्हत आहें. परक्याच्या लेंकरांनीं माझ्या दिसण्यांतील सर्व आवडत्या वस्तु आपल्याशा करून घेतल्या आहेत. माझे वंश व माझीं लेंकरेंही पाडावपणांत गेलीं आहेत, शत्रूनें माझ्या पवित्र स्थानाचा व वसतिस्थानाचा नाश केला आहे; रागानें त्यांनीं स्त्रिया व लेंकरेंहि मारिलीं, त्यांनीं माझ्या डाहाळ्या कापून गजर केला आहे. हे तारण करणाऱ्या देवा, ऊठ, आणि उंचाविला जा; तुझी आशा करणाऱ्या लोकांस खंडून घे, त्वरा व उतावळ करून आह्माकरितां उद्धारक पाठीव, तो आह्मास आश्रय होईल; हे निर्माणकर्त्या ! आह्माकरितां अरोग्यतेचा उपाय पाठीव; कारण आमचा उद्धार करायास तुजवांचून कोणीच खडकरूप आश्रय नाहीं.

---

१ इस्राएलास.

आव ह्मणजे श्रावण महिन्याच्या प्रतिपदेची सूचना करितांना कोठें कोठें हें ह्मणतात.

אשחר ערתי मीं आपल्या मंडळीस पाहावयास त्वरा करावी, तर ती अति पीडित आहे; मीं आपल्या मंदिराचा समाचार घ्यावयास जावें, तर तें अगदीं ओस पडलेलें मला सांपडतें. त्याच्या कुंपणी कोसळल्या आणि त्याच्या भिंती झुकल्या आहेत; त्याजवर काळोख व अंधार असून तें मूर्च्छित व कोरडें पडलें आहे. तेथें बगळा ओरडतो, कावळा आपला घरोटा बांधितो, आणि शाहामृग व अजगर दुःखाचा शोक करितात. सरडा, वनपशु, घार व गीध विलाप व आक्रोश करून शोकाच्या वाणीनें ओरडतात. मी त्यांस विचारिलें कीं, प्रिय हरणीचीं पिलीं, हैरणें आणि बंदिस्तीच्या कोठडींतील पारवे कोठें आहेत? स्फटीकानें व उंच एरेझ झाडाच्या लांकडानें बांधलेल्या कोठड्या कोठें आहेत व शेथीया दगड कोठें आहे? राजवाडे व त्यांचे मोलवान पाये, आणि हरणीच्या पिलांचीं अंगणें व हरणीचीं मंदिरें कोठें आहेत? कशीद्याचीं विचित्र वस्त्रें पांघरणाऱ्या आणि रंगमहालांतील पूर्ण गौरवी कुमारी कोठें आहेत? विलास कोठें आहे? आणि सुगंधि तेलें, हर्षाचे द्राक्षरस व निर्मळ सपीठ कोठें आहे? पूजन कोठें, प्रमाणनेम कोठें, याजकपणा कोठें, व लेवीपणा कोठें आहे? न्यायानें, निर्मळ वैचनानें व कपटावांचून स्थापन केलेलें राज्य कोठें आहे? उरावर पाळलेलें चंद्रासारखें (सुंदर) आणि सूर्याच्या खालोखाल तेजस्वि असें जें सत्य तें कोठें आहे? त्यांच्या भविष्यवाद्यांनीं त्यांची वस्ति खोलवटींत, भूमीच्या बिळांत व विस्मरणाच्या खिंडींत होईल, असें सांगून ठेविलेंच आहे. त्यांच्या पाठीवर गवत व हिरवळ वाढून तें भेंकरें तुडवितात व त्यावर कोंकरें चरतात. सकाळीं व संध्याकाळीं थंडीनें व उन्हानें त्यांस खाल्लें. ते पुराच्या लोटांत व मोठ्या प्रलयांत सांपडले आहेत. सागरांत ते बुडाले आहेत, त्यांच्या पाडावपणांत त्यांच्या जिवाच्या दुःखाचा व शरीराच्या नाशाचा अंत नाहीं. ते समुद्रांत फिरतात, अधोगतींत त्यांचा मार्ग, मृत्यु त्यांचा नावाडी, आणि कबर त्यांची नाव झाली आहे. त्यांस कंप, विस्मय, भय व त्रास वाटतो; कारण त्या अवघ्या तारवांत कांहींच

१ टीका. १६. २ टीका १७. ३ इ. ओंठांनीं.

वाणी व उत्तर नाहीं. सुंदरमंडळी पूर्ण नाशाकरितां, चेचरली जाण्याकरितां, विखरली जाण्याकरितां आणि उपसलेल्या तरवारीनें मारिली जाण्याकरितां विकली गेली आहे. तिचें विखरलेलें संतान चिरडून व तुडवून गेलें आहे; पिढीपिढीं त्यांजवर नव्या पीडा व जखमा होतात. त्यांच्या बापानें त्यांच्या आईचा[१] व त्यांचा धिःकार केला आहे; ह्मणून अन्य लोकांच्या कन्या त्यावर स्वामित्व करितात. जशा एमोरी, हित्ती, हगरी, कित्ती, मिदयानी व मोआबी. तरी त्यांचा बाप दयेंकरून आपल्या अनाथ लेंकरांवर दया करील, आणि विखरलेल्यांस पवित्र देशांत एकवटील. हे महान व थोर ईश्वरा, नीचकरणाऱ्या व उंच करणाऱ्या, घायाळ करणाऱ्या व निरोगी करणाऱ्या, मारणाऱ्या व जीवंत करणाऱ्या, तूं आपल्या नगराकडे फीर, आपलें मंदिर बांध, आपल्या घरीं वास कर; आणि पःरागंदा झालेल्यांस एकवट कर. हे महिने नवे करणाऱ्या, पवित्र मंडळींतील पुरुषांस व स्त्रीयांस बंदिस्तीच्या नगरीं एकवट; आणि हा महिना शुभ होऊन, हे महान् कृत्यें करणाऱ्या देवा, (आह्मांवर) तुझी प्रसन्नता होण्याची आज्ञा कर.

तम्मूजच्या उपासानंतरच्या तिसऱ्या ह्मणजे तिशआबेआबच्या अगोदरच्या शनवार दिवशीं.

आव महिन्यास आरंभ झाल्यावर आनंद उणा करितात; आणि जर कोणा इस्राएलाचा एखाद्या अन्य जातीच्या मनुष्याबरोबर कांहीं वाद असला, तर या दिवसांत इस्राएलांचें भाग्य वाईट असतें, ह्मणून इस्राएलानें त्या अन्य जातीच्या मनुष्यापासून दूर राहावें. आव महिन्याच्या प्रतिपदेपासून नवमीपर्यंत नवीं वस्त्रें पांघरीत नाहींत व शिवीतहि नाहींत. आणि मास खाऊं नये व द्राक्षरस पिऊं नये अशीहि चाल आहे. कोणी तम्मूज महिन्याच्या सतराव्या तारखेपासून असें करितात. ज्या सप्तकांत तिशआवेआव येतो, त्या सप्तकांत हजामत करवूं नये, आणि वस्त्रेंहि धुवूं नयेत. तिशआवेआव झाल्यावर तीं पांघरणें असेल तरी, आणि तें एकच वस्त्र असलें तरी आणि प्रतिपदेपासून तिशआवेआवपर्यंत पशु व पक्षि कापणें बंद करितात.

אפתח פי मी आपलें मुख स्तुति करावयास उघडितों, आणि मोठा आकांत करून ओरडतों; "जो ह्मणतांच ही पृथ्वी झाली" (ही स्तुति करितांना) मी देवास धन्य ह्मणतों. देवाच्या मंदिराच्या

---

१. ईश्वर जो त्याचा बाप यानें त्यांच्या आईसमान येरूशालेम नगरीचा.

नाशाकरितां, माझ्या अश्रुधारा वाहतात; जशी डोंगरासारखी भिंत कोसळते, तसा नाश झालेल्या लेंकरांकरितां, जशी खिडींतून नदी, तसें माझ्या डोळ्यांतून पाणी वाहतें; ज्या वेळीं हा न्यायाचा निवाडा होऊन व त्याजवर मोहोर होऊन तो पूर्ण झाला, तो हाच वेळ. मंदिराचा नाश होण्याच्या या दिवशीं माझीं दुःखें वाढतात, माझ्या पुष्कळ क्लेशांमुळें मला लज्जा प्राप्त होते व मी विस्मित होतों; मजकरितां होणाऱ्या चमत्कारांची वाट पाहतां माझ्या डोळ्यांची ज्योति नाहींशी झाली; हाय्योथ व ओफन्निम देवदूतहि आपल्या पाहऱ्यावरून (असेंच) उत्तर देतात. चांगल्यावरून (ईश्वरास) सुवंदावें हा सर्व मनुष्यांचा धर्म आहे; त्याप्रमाणें जरी त्यांजवर वाईट आलें, तरी त्यांनीं पश्चात्ताप करून त्याची स्तुतिच करावी; तर सर्व गायनापेक्षां (तुझें गायन) आह्मी पुनः उंचवावें, ह्मणून तूं आह्मास फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं.

אריה שאג सिंह गर्जला, त्यास क्रोध चढला, रागाच्या संतापानें त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें केलें, त्यानें आपल्या पायानें व पंजानें वृद्धास व लेंकरांस मंदिरांत व देवडीवर तुडविलें व विदारिलें; जो बोलतांच पृथ्वी झाली तो सुवंदित असो. माझें डोकें भट्टीच्या व चुलीच्या मध्यें पडलें आहे; मारले गेलेले व पाडाव केलेले यांकरितां व तान्हीं बालकें यांकरितां माझ्या डोळ्यांतून पाण्यासारख्या अश्रुधारा वाहतात, मी फारच चकित व अगदीं मुका होऊन बसलों आहें. शेरडें विखरलीं आहेत, त्यांस कोणी मेंढपाळ नाहीं; तीं सर्व कोनाकोपऱ्यांत गेलीं आहेत, कुरणांतून त्यांस हांकून लाविलें आहे; त्यामध्यें सिंह येऊन पोंचले, त्यांनीं त्यांच्या बाळकांसहि फाडून टाकिलें आहे, माझा मेंढपाळ मजपासून कोठें लपाला आहे! कुमारि कोंडल्या आहेत, विधवा शोक करीत आहेत, आई पुत्रहीन व कन्याहीन झाल्या आहेत, त्या शोक, विलाप व आक्रोश करितात, त्यांनीं आपलें हृदय व आपले डोळे वर जगताच्या देवाकडे लाविले आहेत. मी कैदेंत उभा आहें, कारण माझा पाय गुतला आहे; सर्वसमर्थ मजशीं कडवटपणें वागतो, ह्मणून माझी शक्ति खचती, दुःखानें माझें हृदय उकळतें व माझे आयुष्याचे दिवस संपतात; अशा वाईट व दुःखाच्या गोष्टीवरून माझे लोक ह्मणतात कीं, खडकरूप आश्रय जो जगताचा देव, हा आह्मांस विसरला आहे.

איך משכני परत्पराचें वसतीस्थान कसें नाशास गेलें ! त्याचीं लें-करें आपल्या सीमेपासून दूर प्रवासांत गेलीं आहेत. तीं पळालीं व प-रागंदा झालीं, तरी तीं तरण्या सिंहांच्या मध्यें सांपडलीं आहेत, ह्मणून तीं कण्हतात; त्यांच्या पिलांनीं त्यांची थट्टा मांडिली आहे. ज्या दि-वशीं परक्यांनीं त्यांस हांकून नेलें, त्या दिवसापासून तीं अगदीं उभीं राहूं शकत नाहींत. त्यांच्या शोकांच्या अश्रूंनीं दगडहि झिंजून गेले. आपणांस झालेली लज्जा व आपला झालेला धिःकार हीं त्यांनीं साहिलीं; कारण त्यांनीं आपले बंडखोर ओंठ थट्टा करण्यास उघडले होते. ते हात आपटतात, कारण ते आपल्या पापांत बुडाले आहेत; आणि ते ज्वाला चोखितात. त्यांनीं थोर मानिलेल्या खडकरूप आश्रयाच्या द-र्शनाची प्रतिदिवशीं ते वाट पाहतात; पाहा, त्याची दया व त्याचा न्यायहि ते यथार्थ मानितात. जो देव आपणावर आवड धरणाऱ्यांच्या फुटलेले मनावर झालेले घायांस पट्टी बांधितो, त्या देवास ज्या दिवशीं ते त्याचे दार ठोकितात, त्या दिवशीं ते मान्य होवोत. आपल्या नि-र्माणकर्त्यास लगटून राहावें, ह्मणून ते कीर्तन करितात, कारण सा-त्विकांचे जीव देवाशीं लगटून राहतात.

הלנופלים תקומה दुःखाच्या खांचेंत पडलेल्यांच्यानें उठवेल काय? आणि जे मौन्यरूपि खाड्यांत बुडाले, त्यांच्यानें वर येववेल काय? माझ्या मंदिराचा नाश झाल्या दिवशीं मला कधींच हर्ष होत नाहीं, माझें गौ-रव पालटून मला धिःकार प्राप्त होतो, माझें गायन पालटून शोक होतो, माझी ज्योत अंधारमय होते, तिजवर ढग येऊन बसले आहेत, चंद्र व सूर्यहि आपल्या ठिकाणाच्या एका कोंपऱ्यांत बुडाले आहेत, सप्तऋषि व अगस्त्य हीं नक्षत्रेंहि भूमीच्या तळीं जाऊन पोहोंचलीं. माझ्या पाडाव-पणाचें दास्यत्व पालटून त्याचा शेवट व अंत होईल काय? अथवा माझ्या दुःखाच्या वेदनांस कांहीं उपचार होईल काय! सेबाच्या व हावीलाच्या पुत्रांनीं माझी वर्तनभूमि आपली करून घेतली आहे, माहानाथ व तेमा माझ्या डेऱ्यांत विश्रांति घेतात, नेबायोथ व शैम्मा यांच्या हातून माझा

१ सेबा व हावीला हे हामाचे वंशज होते. २ इ. सीमा. ३ मानाहाथ व तेमा हे एसावाचे वंशज होते. ४ नेबायोथ हा इश्माएलाचा पुत्र व शम्मा हा एसावाचा नातु होता.

नाश होत आहे. हे देवा, मजविषयीं तूं कोठपर्यंत उगा राहशील व मौन धरिशील! तुझीं लेकरें चकित होऊन चिमणीसारखीं परक्याच्या फांसांत पडलीं आहेत; तीं भ्रमतात आणि कठोर स्वामीच्या हातून धक्के खातात; ऊठ, त्यांचा सूड घे, ह्मणजे ते नमतील; आणि लोरूहामा[1] इला तूं (आश्रयाचा) दुर्ग व कोट असा हो. जे लोक तुझा क्रोध साहतात, त्यांस दुःखाच्या खांचेंतून काढ; त्यांनीं आपलीं मनें व आपले डोळे तुझ्या आसनाकडे लाविले आहेत; त्यांच्या सैन्यास कैद केलेल्या बंदिशाळेंतून काढ, आणि पूर्वीप्रमाणें उभारलेल्या हातानें दक्षिणेकडून व पूर्वेकडून, आणि हादाद व तेमाँ या लोकांमधून त्यांस तूं आपल्या मंदिराकडे फिरीव. योसेफाचे[2] शेष खंडून काढण्यासाठीं तूं आपला पराक्रम[3] पुनः त्यांस कळीव; क्षीण झालेल्या व बहकलेल्या (इस्राएलांस) सर्व देशांपेक्षां जो रम्य देश, त्यांत तूं एकवट कर; मग सर्व बुद्धिवान प्राणी तुझी सेवा करण्याची आवड धरितील, आणि सर्व गुडघे व शरिराचे बांधे प्रतिदिवशीं तुजपुढें नमन करतील; आणि प्रत्येक आत्मा तुझी स्तुति करील.

נשמת אמונים प्रामाणीक मनुष्यांचा आत्मा क्रोधाच्या दिवशीं थरथरतो व म्लान होतो, आणि आकांत करून रडतो; आणि आपणावर आलेल्या वाईटाविषयीं प्रतिवर्षी ध्यान करून ह्मणतो कीं, जें नगरें लोकांनीं भरलेलें असे, तें कसें एकटेंच बसलें आहे! लेंकरांचा आत्मा ओझ्याच्या भारामुळें ओरडून व आकांत करून रडतो; त्यांचें ओंगळ पाप प्रगट झाल्यादिवसापासून, जें नगर सर्व प्रांतांत मुख्य होतें, तें कर देणारें झालें आहे, यावरून तीं शोक करितात. विषानें व कडू पदार्थांनीं धालेल्यांचा आत्मा विस्मरणाच्या कोनीं मोठ्यानें आकांत करून रडतो, तो निघून पाडावपणांत गेला व तेथें विस्मित होऊन बसला आहे; तो रात्रीं फारच रडतो व त्याचे अश्रू त्याच्या गालांवरून वाहतात. परात्पर देवाच्या रागानें चेंचरलेल्यांचा आत्मा आकांत करून रडतो; आणि ईश्वरानें आपल्या रागानें सीयोनेच्या[4] कन्येस कशी झांकिली!

---

१ लोरूहामा ह्मणजे दया न पावलेली, हें नांव इस्राएलास होशेया अ. १. एथें दिलें आहे. २ हे इस्राएलाचे पुत्र होते. ३ इ. हात. ४ येरूशालेम.

याविषयीं शोक व विलाप करीत आणि चिंताक्रांत तो बसला आहे. रानांत व कोनाकोंपऱ्यांत हांकून लावलेल्यांचा आत्मा, ज्या दिवशीं लोकांनीं भरलेली वस्ति विधवेसारखी झाली, त्या दिवशीं आकांत करून रडतो, (आणि ह्मणतो) विश्वासू नगरी कशी व्यभिचारिणी झाली! पाडावपणाच्या देशांत कंपायमान व खिन्न झालेल्यांचा आत्मा, त्यांचीं लेंकरें, त्यांचे शेष, व त्यांचें संतान देवाकडे काकुळति करून ह्मणतात कीं, आमचीं तोंडें गायनानें भरोत.

נלאה להליל जरी आमचीं तोंडें अक्रोशानें भरलीं, तरी आमच्या भंगाविषयीं ओरडतांना आह्मी थकलों आहों. जरी समुद्राची शाई केली, उंच आकाशासारखे पट्ट ताणिले, आणि सर्व रोथेम झाडांच्या लांकडांच्या लेखकाकरितां लेखण्या केल्या, तरी माझ्या दुःखाचा एखादा अंशहि लिहिण्यास तीं पुरणार नाहींत. माझ्या मंदिराचा नाश झाला, माझें पवित्र स्थान धुळीस मिळालें, माझे सुज्ञजन व माझ्या पाठशाळा हीं नाहींशीं झालीं; माझे रथ व माझा दळभार कोठें आहेत? यांकरितां आमचे डोळे अंधारयुक्त होतात. देवाच्या घराच्या जळण्यावरून माझ्या मनाचा दाह होतो, वेदीहि नाहीं आणि हारएल नांवानें ह्मटलेलें स्थंडिलहि नाहीं, आणि आमच्या सर्व पापांचें प्रायश्चित्त व्हावें ह्मणून देवाचें पूजन करायास मुख्य याजकहि नाहीं. दिव्याचें झाड, मेज, दर्शनीय भाकरी, केरूबीम, (संकेतलेखाचा) कोश, लेवी, उपाध्ये व गीत हीं सर्व नाहींशीं होऊन संकटें आलीं, आणि नृत्याचें गायन पालटून शोक झाला आहे. सुगंध, थावराचा आवाज, तांबडी कालवड, मान मोडण्याची कालवड, नैवेद्याचें तर्पण, लोग, हीन, एफा, आणि आमचें अतिक्रमाचें प्रायश्चित्त होण्याचा एडका हें सर्व बंद पडलें

---

१ स्थंडिलावरील अग्नीचे इंगळ ज्या थावरानें काढीत असत तो; त्याचा आवाज मोठा होत असे. २ पोंवळी सांगोपांग कालवड जिची राख गणना अ. १९ प्रमाणें शुद्धतेकरितां पाण्यांत मिश्र करून शिंपडीत असत ती. ३ शोध न लागलेल्या खुनाच्या दोषाचें प्रायश्चित्त होण्यासाठीं अनुवाद अ. २१ ओ ४ प्रमाणें ज्या कालवडीची मान मोडित असत ती. ४ लोग, हीन व एफा हीं निरनिराळ्या प्रकारचीं मापें होतीं. ५ इ. शुभ्र होण्याकरितां. ६ हा लेवी अ. १६ एथें लिहिलेला आजाजेलचा एडका, ज्यास प्रायश्चित्ताच्या दिवशीं रानांत नेऊन कड्यावरून लोटीत असत तो.

आहे. आमच्या पवित्र मंदिरांतील पूजन पुनः चालू कर, प्रवासांत विखरलेल्यांस एकवट कर, आमच्या नाशामुळें आह्मांस प्राप्त झालेल्या नीचपणांतून आह्मांस उंचाव, आणि आमच्या पूर्वस्थीतीस आह्मांस आण; ह्मणजे हे अनंता! आह्मी हास्यवदन करूं.

" היכל " היכל परमेश्वराचें मंदिर, परमेश्वराचें मंदिर, परमेश्वराचें मंदिर (आमच्या पापांच्या प्रायश्चित्ताकरितां आहे; असें समजून दोष करूं नका) असें (भविष्यवादि) मोठ्यानें ह्मणत नव्हता काय! यद्यपि माझे अपराध वाढले. ज्या दिवशीं (ईश्वरी साक्षात्कार) मंदिरांतील (दयासनावरून) केरूबावर जाऊन बसला, त्या माझ्या नाशाच्या दिवशीं मी हाय हाय करून ओरडतों; माझीं दुःखें बळावलीं, ह्मणून माझें मन वितळतें; आणि माझ्या पुष्कळ अपराधांमुळें माझें कपट मजसमक्ष साक्ष देतें, व भयंकर वाणी माझ्या कानीं येते. माझ्या खडकरूप आश्रयानें माझ्या पापामुळें माझी शोभा नाहींशी केली आहे, त्यानें माझा मुगुट उंचावरून खालीं जमिनीवर पाडिला आहे, क्लेशामुळें माझ्या अंगावरील रोमांच उभे राहतात, मला विषाच्या व कडूदवण्याच्या ओहोळांत हर्ष मानावा लागतो, आणि माझ्या दृष्टीसमोर माझा सूर्य अंधारमय झाला आहे. शत्रूनें सोडत काढण्याचा विचार करून मजविषयीं पण पाडिला होता; आणि जे लोक पूर्वी सीनाय पर्वताजवळ शिक्षण पावले, त्यांतील किती लक्षावधि तरवारीच्या धारेच्या भयानेंच मेले, आणि माझ्यांतले किती लेवी व याजक यांस मारायास नेलें. शोक करणाऱ्या लेंकरांचें शांतवन तूं केव्हां करशील? मुख्यजनांच्या शेषास सीयोनेकडे तूं केव्हां परतविशील? आणि तेथील मूर्त्ति तूं केव्हां जाळशील? मग हे परमेश्वरा, तुझ्या शत्रूचा छेद होतांना मी ह्मणेन कीं, "हे परमेश्वरा, तुझीं कृत्यें किती महान आहेत!

יום נלחמו בי ज्या दिवशीं माझे मित्र एकत्र होऊन मजशीं लढले, त्या दिवशीं परमेश्वराची दया माझें शस्त्र होतें. जशी हरणाची

१ हें वाक्य इर्मेया अ. ७ ओ. ४ एथें सांपडतें. २ हें येहेजकेल अ. २१ ओ. २१ वरून लिहिलें आहे; ही सोडत बाबेलचा राजा नेबुखदानेसार यानें येरुशालेमेवर चढून येण्यापूर्वी काढिली होती.

इच्छा पाण्याच्या ओहोळावर, तसा मी उत्कंठित झालों आहें; माझे शत्रू तर आनाकीमाच्या पुत्रांसारखे उंच वाढले आहेत, आणि आकाशांतील प्रकाशाच्या ज्योति अंधारमय झाल्या आहेत, माझ्या लेंकरांच्या पेंढ्या नमल्या आहेत, माझें तोंड उतरलें, आणि माझ्या आयुष्याच्या वर्षांची मला आवड राहिली नाहीं. बाप जीवंत असतां लेंकरें अनाथ झालीं आहेत; देवास नाकारणारे त्यांजवर उठले आहेत, त्याच्या बालकांचें रक्त त्यांनीं पाण्यासारखें वाहविलें, माझ्या दृष्टीसमोर माझ्या लोकांच्या मोठाल्या समुदायास त्यांनीं टांगिलें, आणि आईस तिच्याच पुत्रावर आपटून मारिलें. अगणित संकटें मजवर आलीं, सुंदर स्त्रिया भुकेनें मेल्या, त्यांचींच लेंकरें त्यांचा भक्ष झालीं, लहान बालकें भाकर भाकर करीतच मेलीं; हे परमेश्वरा, याकरितां तूं आपणास दयेपासून आकळिशील काय! मारले गेलेल्यांस (शत्रूनें) पाय धरून ओढीत नेलें, आणि त्यांस झाडावर टांगून तेथेंच त्यांस सोडून गेले, (नेहमीं) हर्ष करणाऱ्या कुमारींस पाडाव करणारांनीं घेरिलें; याविषयीं माझ्यांतले वृद्ध शोक करितात; सण व शाब्बाथ यांस देव विसरला आहे. शोक करणारांस तूं शांतवन केव्हां ऐकविशील? पृथ्वीच्या कोनांतून आपलीं लेंकरें एकवट करून नाश झालेलीं नगरें पुनः जेव्हां वसविशील, तेव्हां माझे गवयी व सूरकरी तुझ्या मंदिरीं गातील, आणि हे परमेश्वरा, ते तुझें नाम सुवंदितील.

קול אהלה आहोलाची वाणी धापा देत आहे, पाडावपणांतून ती कडूपणें शोक करून ओरडत आहे; आहोलीबाच्या पाडावपणांतील वाणीनें व तिच्या शोकाच्या वाणीनें माझें मन फाटून जातें. रेऊबेनास सुंदर वंत नाहीं, शिमओन दगड एकवटींत आहे, इस्साखार बुद्धिवंत

१ आनाकीमाचे पुत्र हे खनान देशांत राहणारे प्राचीन व महाकाय लोक होते. गणना अ. १३. ओ. ३२–३३ पाहा. २ उत्पत्ति अ. ३७. ओ. ७. एथील योसेफाच्या स्वप्नांत नीचपद दर्शविण्यास या म्हणीचा उपयोग केला आहे. ३ आहोला हें नांव येरूशालेमेस व येहुदाचे राज्यास दिल्हेंलें आहे. ४ आहोलीबा हे नांव शोमरोनास व इस्राएलाचे राज्यास दिल्हेलें आहे.

आहे काय! असें शत्रु ह्मणातात, जेबूलुन तोंड उघडून एक शब्दही काढीत नाहीं, तो डोंगरांवरून व टेकड्यांवरून पळतो. येहूदा चिखलांत कसा रुतला? लेवी आणि बिनयामीन हे कसे रंडके झाले! आणि पवित्र मंदिरीं सूर्याची मूर्ति कशी बसली! हें सर्व माझ्या तारुण्यांतील अपराधांचें फळ आहे, तें एथपर्यंत कीं ऋणानें माझा जीव भरून गेला आहे. योसेफ आणि गाद हे कसे परागंदा झाले! आशेर आणि नफताली हे कसे दूर गेले! दानाचें सैन्य कसें गुंतलें! त्यांच्या राहुट्याही ताणिलेल्या नाहींत; त्यांच्या नाशावरून वेळही हर्षित होतो. सर्व कन्यांमध्यें जी प्रियँकर तिला एकवट कर, तिला दानें पाठीव, (भविष्यवाद्यांनीं) कथिलेल्या सत्य भविष्यांप्रमाणें तिचें सुंदर स्वरूप सर्व लोकांस दाखीव; कारण अनंत देवानें याकोबास निवडून घेतलें आहे.

בורא עַר אנה हे उत्पन्न कर्त्या! तुझा पाँरवा फांसेपारध्याच्या सांपळ्यांत व जाळ्यांत कोठपर्यंत गुंतलेला राहील! तो कष्ट व पीडा भोगीत आहे, पिलांविरहित होऊन तो एकटाच बसला आहे, आणि हे माझ्या बापा! हे माझ्या बापा! अशा हाका मारीत आहे. तो पारवा आपल्या घरोब्यापासून भटकत व हिंडत आहे; दिवस व रात्रीं उन्हामध्यें व थंडीमध्यें तो राहतो; शत्रूच्या तरवारीमुळें व तरुण सिंहांच्या दांतांमुळें तो थरथर कांपत आहे. हे अनंता! ज्यावेळीं त्वां त्यांस फाडणारांच्या हातीं सोंपून दिल्हें, तेव्हां त्यांनीं त्याची मान खाऊन व त्याची नरडी फोडून टाकिली; शत्रूचें जोकड वाहातां वर्षांचीं वर्षें व किती हिंवाळे व उन्हाळे लोटले. आपल्या प्रियकराकडे आपल्या रंगमाहालांत टेंकड्यांवरून व डोंगरांवरून उडत व कुदत येण्यास त्यास गरुडाचे पंख कोण देईल! (असें होतांच) माझ्या कष्टांचा मला विसर पडेल. परक्या पीडकांनीं त्याजवर दुष्ट विचार योजिले; भारी जोकडाच्या लज्जेनें व विस्मयानें त्यांस अगदीं अगदीं अशक्त करून ठेविलें आहे; यामुळें माझा खेद वाढतो. हे उंचांत वास करणाऱ्या देवा! त्यांच्या मनाचें

---

१ हें छलनेचें भाषण आहे; कारण १ कालवृत्तांत अ. १२ ओ. ३३. येथें इस्साखाराच्या वंशांत पुष्कळ ज्ञानी होते असें लिहिलें आहे. २ इ. जेबूलुन तोंड उघडीत नाहीं. ३ इस्राएल. ४ शेलोमोचे गीतांत इस्राएलांस अनेक वेळ हें नांव दिल्हेलें आहे.

शांतवन कर; शोकग्रस्तांच्या मनाचें समाधान कर, अन्य लोकांमध्यें फांकलेल्यांस व विखरलेल्यांस एकवट कर; आणि उद्धारक येऊं दे.

तिशआबेआबच्या आदल्या दिवसाचें वर्तन.

या दिवशीं तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेकरितां प्रार्थनामंदिरीं इतर दिवसांपेक्षां कांहींसें लवकर जाऊन इतर दिवसांप्रमाणें प्रार्थना करितात, परंतु तोंडावर उपडें पडून जो भाग ह्मणायाचा असतो, तो ह्मणत नाहीं. नंतर घरीं जाऊन बराच दिवस आहे इतक्यांत शेवटलें जेवण आटोपून घेतात. या जेवणांत मांस खात नाहींत, द्राक्षरस पीत नाहींत, व दोन प्रकारचें शिजविलेलें अन्न खात नाहींत. जो कोणी शकतो, तो मिठासंगें कोरडी भाकर व वाटीभर पाणी पिऊन राहतो. आणि भुईवर बसतात व जेवणानंतरचा धन्यवाद एकत्र करीत नाहींत; जर तिघे असले, तर प्रत्येक हा धन्यवाद एकटाच बसून करितो. आणि शिजविलेली डाळ अथवा अंडीं खाण्याची चाल आहे, कारण हें सुतक्याचें खाणें आहे. जर तिशआबेआब रविवारीं आला, किंवा शनिवारीं आला ह्मणून रविवारावर गेला, तर या शेवटल्या जेवणांत मांस खातात, द्राक्षारस पितात, आणि शेलोमो राजा राज्य चालवीत असतां त्याच्या जेवणाच्या वेळेस जसें त्याचें मेज सजवीत असत, तसें जरी आपलें मेज सजविलें तरी चालेल. या तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेंत צדקתך ह्मणत नाहींत.

तिशआबेआबच्या रात्रीची रीति.

प्रार्थनामंदिरीं जातांना पायतणें काढून ठेवावीं, आणि प्रार्थनामंदिरीं गेल्यावर भुमीवर बसावें, आणि ज्याप्रमाणें रात्रीस त्याप्रमाणें दिवसास तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेपर्यंत करावें. आणि या दिवसाचीं शोकप्रद गीतें व इर्मेयाचा विलाप वाचण्याकरितां मात्र एक दिवा लावावा. या दिवशीं खाणें व पिणें, सुखाकरितां अंगास सुगंध लावणें व अंघुळ करणें, (सकाळीं हात धुणें ते बोटांच्या सांध्यापर्यंत मात्र धुवावे,) कातड्याचीं पायतणें घालणें, आणि स्त्रीपुरुष एका बिछान्यावर निजणें मना

आहे. आणि जसें रात्रीस तसेंच दिवसास. आणि या सर्व गोष्टी प्रायश्चित्ताच्या दिवसाप्रमाणें तीनसांजांपासून मना आहेत. आणि शास्त्राभ्यासहि बंद करितात; परंतु शास्त्रांतून इयोब व इर्मेयाचें पुस्तक याशिवाय आणखी कांहीं वाचण्याची मनाई आहे; आणि यांतहि जीं शांतवनाचीं वाक्यें असतात तींहि सोडून देतात. शाब्बाथ समाप्त होतांना जर तिशआबेआब असला, तर दिवस असतांच जेवण आटोपून घ्यावें. सूर्य मावळल्यावर सुतक धरितात व पायांतून पायतणें काढितात; आणि दिवा पाहिल्यावर בורא מאורי האש हा धन्यवाद करितात. मग हाज्जान पुढें लिहिल्याप्रमाणें आरंभ करून प्रार्थना करितो. (परंतु पुढें लिहिल्याप्रमाणें आरंभ करण्यापूर्वी अनुवाद अ. ३२ ओ. १–४२ वाचण्याची चाल आहे.)

על נהרות בבל बाबेलच्या नद्यांजवळ आमच्या ज्योतींचा प्रकाश अंधारमय झाला, आणि आमच्या शोकाच्या वाणीनें आमच्या कर्ण्याचा आवाज नाहींसा झाला. बाबेलच्या कन्येस आमच्या दुःखांत हर्ष करणें आवडलें; परंतु आह्मी आपले विणे तेथील वाळुंजावर टांगून ठेविले.

על נהרות בבל गीत १३७.

पुढें नित्याप्रमाणें प्रार्थना चालते, परंतु ארני שפתי मध्यें उपासाच्या दिवशीं ह्मणायाचा עננו אבינו हा जो भाग आहे, तोहि ह्मणतात; आणि אלהי נצור व שים שלום यांबद्दल हा पुढील भाग ह्मणतात; आणि पाहांटेच्या प्रार्थनाहि याप्रमाणें करितात.

עושה השלום हे शांति राखणाऱ्या! (तूं आपल्या) मोठ्या सामर्थ्यानें व शांतीनें आह्मांस आशीर्वाद दे; कारण तूं शांतीचा स्वामि आहेस. हे परमेश्वरा, आपल्या इस्राएल लोकांस कल्याणयुक्त आशीर्वाद देणाऱ्या! तूं धन्य आहेस.

यानंतर קדיש לעילא

इर्मेयाचा विलाप वाचण्यापूर्वीं हें ह्मणतात.

למי אבכה कशाकरितां मी शोक करूं, हात आपटूं, रडून आकांत करूं; आणि दुःखानें भरलेलें मन कोणास सांगूं. मंदिर, कोश, अ-

थवा केरूब ज्यांच्या ठिकाणीं कावळे व बगळे ओरडतात त्यांकरितां काय! लेव्यास देवाचें गीत गावयास उभें राहण्यास केलेले मंचकासाठीं काय! ऊरीम व थुंम्मीम ज्यांकडून याजक आपल्या हृद्यावर नेमिला जात असे, त्यांसाठीं मी चकित होतों. देवालयांतील सुज्ञ लोकांस ठोक्यानें शकुन पाहणारा व नक्षत्रांवरून प्रश्न पाहणारा यानें येऊन वधिलें यासाठीं काय! विधींचा प्रकाश कसा अंधारमय झाला! तालमूद[३] कसें एकीकडे पडलें! तें आतां कोणास समजतें काय! शास्त्राचा गुह्यार्थ उघड करणारा कोणी आहे काय! आणि या पिढीस आश्रय देणारा असा कोणी आहे काय! बाळकें व तान्हीं यांचे मुडदे पडले; त्यांस उठविणारा कोणी नाहीं व त्यांची करुणा करणारा व त्यांजवर दया करणारा कोणी नाहीं. या सर्व गोष्टींवरून अवघा दिवस व अवघी रात्र मी अक्रोश करितों; अतिशय दुःखामुळें सुतक्यासारखा मी शोक करितों. मी अतिखेदानें शोक करितों, बगव्यास आपला भाऊ असें ह्मणतों, आणि आपल्या अश्रूंकडून सीयोनेच्या मातीवरील माझी ममता दर्शवितों. गायनाची वाणी ऐकविणें मी बंद करितों. आणि (जी वस्ति लोकांनीं भरली होती) ती कसी एकलीच बसली आहे, असें ह्मणून विलाप करितों.

इर्मेयाचा विलाप.

'' זכור हे परमेश्वरा! आह्मांस काय झालें आहे तें स्मर; हाय हाय! आमची निंदा लक्ष लावून पाहा; हाय हाय, आह्मांस काय झालें! अवघें वर्षभर मी शोक करितों, आणि माझे अश्रू नेहमीं वाहतात; हाय हाय! पाण्याच्या डोहांत मी सांपडलों आहें, आणि माझीं दुःखें नेहमीं मजसमोरच आहेत; हाय हाय, आह्मांस काय झालें! माझें महत्त्व गेलें, आणि माझा प्रकाश अंधारमय झाला; हाय हाय! मला माझ्या वस्तिस्थानांतून हांकूनहि लाविलें; पाहा, मी मनुष्यांच्या धिक्कारास व लो-

---

१ प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग २ टीका १ पाहा. २ नेबूखादनेसार यानें येरूशालेमेवर चढून येण्यापूर्वीं शकुन पाहिला होता असें येहेजकेल अ २१ ओ. २६ वरून कळतें. ३ इस्राएली धर्माचें खरें स्वरूप पृष्ठ ५६–५९ पाहा.

कांच्या तिरस्कारास पात्र झालों आहें; हाय हाय, आह्मास काय झालें! कूथीईम लोकांनीं मला ठेंचिलें, आणि त्यांनीं माझी छलना केली व मजसमोर गर्जना केली; हाय हाय! माझे सर्व पाहणारे माझी थट्टा करितात हाय हाय, आह्मांस काय झालें! दुष्टांच्या संतानानें लांडग्याप्रमाणें मला वेढिलें; हाय हाय! त्यांनीं माझ्या पवित्र मंदिराचा नाश केला, पुष्कळ गोऱ्ह्यांनीं मला वेष्टिलें; हाय हाय, आह्मांस काय झालें! माझ्या सामर्थ्याच्या पवित्र मंदिराचा झाडून नाश केला, आणि माझ्या विश्रांतीच्या ठिकाणाहून त्यांनीं मला हांकून लाविलें; हाय हाय! माझी शक्ति फुटक्या खापरासारखी सुकली; हाय हाय, आह्मांस काय झालें! परक्यांनीं माझा क्षय केला, आणि माझा जीव मरणाच्या पंथास पोंचला आहे; हाय हाय! कारण अजगरांच्या ठिकाणीं त्वां आह्मांस ठेंचलें, आणि मृत्युच्छायेनें आह्मांस झांकिलें; हाय हाय, आह्मांस काय झालें! त्यांनीं मला अगदीं ग्लान करून सोडिलें, त्यांनीं माझ्या कुमाऱ्यांस द्राक्षारसाच्या कुंडांत तुडविलें; हाय हाय! माझें महत्त्व धुळीस मिळालें, आणि माझीं हाडें खिळखिळीं झालीं; हाय हाय, आह्मांस काय झालें! माझ्या शत्रूनें डोंगरांपर्यंत व टेंकड्यांपर्यंत त्यांचा पाठलाग केला; हाय हाय! ते रडून व ओरडून ह्मणतात कीं, हे परमेश्वरा, तुझी पूर्वींची दया कोठें आहे! हाय हाय, आह्मांस काय झालें.

בליל זה या रात्रीं माझे मंदिराचा नाश झाला व माझा वाडा जळाला, त्या या रात्रीं माझीं लेकरें रडून अक्रोश करितात; आणि इस्राएलाचीं सर्व कुटुंबें माझ्या दुःखामुळें चिंतन करितात, आणि ईश्वरानें जें जाळून टाकिलें त्याविषयीं रडतात. या रात्रीं अनर्थाच्या पांच कठोर गोष्टी मजवर आल्या; आमच्या पूर्वजांनीं पवित्र देशीं जाऊं नये असा त्याविषयीं ठराव झाला, त्याप्रमाणें त्यांस शासनहि झालें, पहिल्या व दुसऱ्या मंदिराचा ह्मणजे जुन्याचा व पुनः बांधलेल्या नव्याचाहि नाश झाला, व नांगरणारांनीं तें उखळून टाकिलें, आणि बित्तेर नगर जिंकलें जाऊन पारध्यांच्या फासांत तें सापडलें, या रात्रीं असें व्हावें असा

१ अश्शूराचा राजा शाल्मनेसार याणें, इस्राएलांचें राज्य घेऊन त्यांस पाडाव करून नेल्यावर बाबेल कूथा इत्यादि गांवचे लोक आणून इस्राएलांच्या देशांत वसविले ते. २ टीका १८.

परमेश्वराचा नियमच होता. या रात्रीं जी पीडलेली एकांतवासांत बसली आहे, ती दुःखानें शोक करिते, जशी कीं ती आजच आपल्या बापाच्या घरांतून हरण झाली आहे, आणि नाशकारक ज्वालेनें तिचें मंदिर भस्म झालें ह्मणून ती विलाप करून रडते; परंतु ते इंगळ व तो अग्नि परमेश्वराकडूनच निघालीं. या रात्रीं मला पाडाव करून नेलें, आणि माझ्या मंदिराचा नाश झाला; या महिन्याच्या नवमीस संध्याकाळच्या वेळीं मी येहोयारीबाच्या पहाऱ्यावर पहारा करीत असतां, शत्रूनें आंत शिरून मोठा वध केला, आणि ईश्वराची आज्ञा नसतांहि त्यानें पवित्र मंदिरीं येऊन आपलीं अर्पणें वाहिलीं.

מרי שנה प्रतिवर्षी या रात्रीं नेमिलेला विलाप होतो; कारण सत्यशील नगरी या रात्रीं विधवेसारखी झाली. या रात्रीं मी रडतों व शोक करितों, व माझें तोंड म्लान होतें, दिवसोदिवस मी शोकाची वाणी उचलितों. सर्व रात्रींपेक्षां या रात्रीं सर्व मंडळ्यांमध्यें शोक होतो, त्या कंपणाचा प्याला प्यालेल्या आहेत, सीयोनेचे मार्ग शोक करीत आहेत. याच रात्रीं खडकरूप आश्रयानें आपल्या क्रोधानें शासन करून मजवर अग्नीचे इंगळ ओतिले, त्यानें मजवर घातक घाय केले आहेत, त्याच्या झुंजुरक्याचे तारे अंधारमय झाले आहेत. दुःख व कष्ट पाहून ग्लान झालेला मनुष्य तो मीच, याच रात्रीं माझ्या दुष्टाईची फेड झाली, परमेश्वरानें मला भस्म केलें, दया केलीच नाहीं. याच रात्रीं बुरूज व गढी पायापासून कोसळण्याचा अपघात मजवर घडून आला, माझे सरदार खंदकांत पडले, अंधारानें त्यांस ग्रासिलें.

על זה היה דוה या (सर्व गोष्टींवरून) आमचें मन मूर्च्छित होतें, आणि आमच्या डोळ्यांवर झांक येती. आमच्या पवित्र नगराचा नाश झाल्यामुळें या रात्रीं आह्मी दुःख करितों, आमचें गायन पालटून शोक झाला आहे. आमची चमत्कारिक नगरी, जी ओस पडली आहे, तिजविषयींहि; तिच्या नेमशास्त्राकडे व आज्ञांकडे आमचे कान बंद पडले आहेत. आमचें मंदिर मोडलें ह्मणून आह्मी मोठ्या वाणीनें शोक

---

१ टीका १९. २ जसे अर्पणाकरितां पशु वधले जात असत, तशीं त्यानें मनुष्यें वधिलीं.

करितों; ज्या दिवशीं आमच्या लोकांचीं अगणित प्रेतें पडलीं, त्या दिवशीं आह्मावर हें काय आलें! हाय हाय! स्थंडिल व कोश हीं नाहींशीं झालीं, कारण (ईश्वरी) कोप फारच वाढला; परका आमच्या प्रभूच्या मंदिरीं मोठ्यानें ओरडला. शत्रूच्या जुलमामुळें आमची शक्ति नाहींशी झाली व गळून गेली, कारण आह्मी आपल्या शेजाऱ्यांस ह्मण व हसें झालों आहों. मेलेल्यांप्रमाणें आह्मी मनांतून विसरलों गेलों, शत्रु आह्मांस वधितो व तानितो; ह्मणून शत्रूच्या त्रासामुळें आह्मी देवाकडे ओरडतों, परंतु आह्मास कोणी उत्तर देत नाहीं. एकाएकीं हा अनर्थ आह्मांवर आला, आमची शक्ति थकली, आमच्या स्वामीचा क्रोध चेतल्यामुळें, जुलूमगाराचा हात आह्मांवर प्रबल झाला आहे.

על יום חרבן पवित्र मानिलेल्या मंदिराच्या नाशाच्या दिवसाविषयीं, पवित्र नगराविषयीं, आणि पवित्र मंदिराविषयीं नवीन शोक उत्पन्न होतो. अहो सेफारादींतील पाडावांनो! मोठा आकांत करून रडा; आमचें मन तर अतिशय उडून जातें व थरथरतें; कारण पवित्र वस्तिस्थान आश्चर्यकारक रीतीनें नीचावलें आहे, आणि जसा पेंढा तुडवितात तसे परके त्यास तुडवितात. यावरून सर्वांचा जीव कुडींतून उडून जातो, आणि डोळ्यांतून अश्रु गळतात व वाहतात; केशेद, हाजो, पिलदाश व इदलाफ यांनीं दिलेल्या दुःखामुळें हर्षाबद्दल या रात्रीं शोक होतो. त्यांनीं विटलेल्या जीवानें व गर्विष्ठपणें जिवंत देवाच्या पुत्रांचा सूड घेतला; आणि यथार्थतेनें पवित्र झालेल्या पवित्र मंदिरास अग्नि लावून तें ओसाड करून ठेविलें आहे.

אוי כי ירד אש हाय हाय! कारण आकाशांतून येरूशालेमेवर अग्नि पडला; यासाठीं माझ्या डोळ्यांतून माझ्याडोळ्यांतून अश्रुधारा वाहतात. पवित्र वाडा कसा मोडला! हे आकाशांत वस्ति करणाऱ्या! तूं कोठपर्यंत रागावशील? राजकन्या तर दासी व उघड वेशा अशी झाली आहे. या आब महिन्यांत माझा सूर्य अंधारमय होतो; कारण या महिन्यांत आहारोन

---

१ इ. आमचीं. २ इ. आमचा हात दुर्बल झाला. ३ टीका २०. ४ केशेद, हाजो, पिलदाश व इदलाफ हे नाहोराचे पुत्र होते. ५ इ. उंच हातानें.

याजक मरण पावला[1] आणि सुंदर नगर यांतच दोन वेळ नाश पावलें. या रात्रीं मी अति दुःख करितों, ही प्रख्यात रात्र मला शोकाची रात्र झाली आहे; (इस्राएलांस) मिसरांतून काढणाऱ्या देवानेंच माझा नाश करविला आहे. तरी अनंत देव माझा प्रकाश पहांटच्या उजेडाप्रमाणें फांकवील; खडकरूप आश्रय दुष्टांवर आपला क्रोध चेतवील; आणि येरूशालेमेस निवडून घेणारा पुनः आपल्या लोकांस निवडून घेईल.

זכור יי ליהודה हे परमेश्वरा ! येहूदा व ऐफ्राईम[2] ज्याचें रक्त येरूशालेमेभोवतालें पाण्यासारखें पाडलें, त्यांची आठवण कर. हे परमेश्वरा ! ज्या अभिषिक्त[3] ह्मटलेल्याच्या शरीराची (शत्रूंनीं) चाळण केली, आणि ज्यामध्यें रुतला नाहीं असा एकहि तीर राहिला नाहीं,[4] त्याची आठवण कर; यास्तव मी त्याजविषयीं दुःखित मनानें रडतों, आणि या भंगामुळें सर्वांचें सामर्थ्य खचलें आहे.[5] हे परमेश्वरा ! जे ऐशीं हजार अधिकारी इश्माएली लोकांकडे पळून गेले, आणि त्यांस पाहून त्यांनींही आपले तंबू मारिले, त्यांची आठवण कर; परंतु (त्या इश्माएली लोकांनीं) कांहीं अन्न व हवेनें फुगविलेल्या मसका बरोबर आणून त्यांत पाणी नसतां तान्हेच्या वेळीं त्यास पाजिलें.[6] हे परमेश्वरा ! होमकरणाऱ्या याजकाच्या रक्तासाठीं राजरक्षकांच्या सरदारानें[7] ज्या बापांस व लेंकरास मारिलें आणि जसें पक्ष्यांस तसें त्यांस फासांत गुंतविलें,[8] त्यांची आठवण कर; या भंगाविषयीं (ऐकून) कान बहिरे होतात. हे परमेश्वरा ! ज्या पतिव्रता विधवा बाईच्या सात पुत्रांस दुष्ट अन्यायी यावानाच्या राजानें मारिलें,[9] आणि जिनें शेवटीं स्वतांहि पडून प्राणत्याग केलें,[10] तिची आठवण कर; यावरून सर्वांचीं आंतडीं कळकळतात. हे परमेश्वरा ! जे

१ इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम वर्ष २४८७ पाहा. २ येहूदाच्या राज्यांतले व इस्राएलाच्या राज्यांतले लोक. ३ इर्मेयाचा विलाप अ.४ ओ २० एथें अभिषिक्त हें नांव योशीया राजास दिल्हेलें आहे. ४. २ कालवृत्तांत अ ३५ ओं २३ यावरून हें लिहिलें आहे. ५ इ. सर्व हात अशक्त झाले आहेत. ६ टीका २१. ७ नेबूखादनेसाराचा सरदार नेबूझारआदान यानें. ८ टीका. २२. ९ या बाईची व तिच्या मुलांची गोष्ट संक्षेपांत पुढील בת עמי या गीतांत आणि माकाबीचें दुसरें पुस्तक अ. ७ एथें दिल्हेली आहे. १० इ. गळून पडली.

दहा वयस्कजन[1] आकाशांत वस्ति करणाराच्या नामाच्या पवित्रतेकरितां कठोर धन्यांच्या हातीं सांपडले, जे तरवारीस व अग्नीच्या ज्वालेस वाहिले गेले, आणि मेंढरांसारखे व बकऱ्यांसारखे सोलले गेले, त्यांची आठवण कर.

אליכם ערה קרושה अहो पवित्र मंडळींतील लोकहो! मी तुह्मांस कांहीं प्रश्न करितों. सर्व रात्रींपेक्षां आजची रात्र कशामुळें निराळी आहे? पेसाहाच्या रात्रीं आपण मस्सा व मारोर कां खातों? आतां या रात्रीं तर आपण धिःकारानें धालों आहों; यथार्थ व सरळ याच्या संतानाच्या झालेल्या वधावरून मी आक्रोशानें रडतों, आणि वेदना लागलेल्या प्रसवणारीसारिखी मी आपली वाणी उंचावितों. पेसाहाच्या रात्रीं (आपलें) मेज हर्षानें कां सिद्ध केलेलें असतें? आतां या रात्रीं तर आपल्या अपराधांमुळें (सर्व कडे) उच्छ्वासाची वाणी निघते; अरे रे! आमच्या पायांच्या तळव्यांस कोठेंच आधार मिळत नाहीं; हाय हाय! कारण संकट आलें, व त्यामुळें मी नृत्य वाद्येंहि विसरलों. पेसाहाच्या रात्रीं आपण धन्यवाद करून द्राक्षारसाचे प्याले कां पितों? आतां या रात्रीं तर आपण विलापाचें पुस्तक वाचितों; माझी वस्ती पाडावपणांत व माझें येणें विस्मयाच्या देशांत कसें घडलें! यास्तव अशाविषयीं मी अरोळीची वाणी काढितों. पेसाहाच्या रात्रीं आपण नेहेमीं हाग्गादा (ह्मणजे मिसरांतून निघण्याचें वर्णन) कां वाचितों? आतां या रात्रीं तर आपण आक्रोश व शोक करितों; हाय हाय! कीं मी मेशेखांत वस्ती करितों आणि झडतीचा वेळहि आला आहे; प्रिय नगरीकरितां व भजनालयांकरितां हाय हाय! पेसाहाच्या रात्रीं आपण नेहेमीं पूर्ण स्तुति कां करितों? आतां या रात्रीं तर आपण आरोळी, शोक व विलाप करितों; यासाठीं कीं आपल्या अपराधांमुळें आपण आतां प्रार्थना करूं शकत नाहीं, कारण पवित्र मंदिर विटाळलें गेलें आणि देवालयांचाहि नाश झाला आहे. पेसाहाच्या रात्रीं "जीं राष्ट्रें तुला जाणत नाहींत, आणि जीं राज्यें

---

१ या दहा जनांचीं नांवें व त्यांच्या दुःखांचें वर्णन पुढील אלה אוכרה या गीतांत आहे. २ टीका २३. ३ हें वाक्य गीत १२० ओ. ५ एथून घेतलें आहे; व त्याचा अर्थ, मी अन्यायी व क्रूर लोकांत वस्ती करितों असा आहे.

तुझ्या नामानें हाक मारीत नाहीं, त्यांजवर तूं आपला राग ओत," हें गीत गायनानें कां ह्मणतों ? आतां या रात्रीं तर आपण विष, पित्तरूप विष, आणि कडूविष पीत आहों; हाय हाय! कारण हर्ष उणा होऊन सीयोनेचे मार्ग शोक करीत आहेत. अहो कोरड्या रानांत वस्ती करणाऱ्या लेंकरांनो! तुह्मी आपल्या पाडावपणांत शांतवन पावा; नीचत्वांतून मी तुह्मास उंचावीन, सीयोनेंतील पूजन (पुनः) स्थापीन, आणि माझा रंगमहाल बांधीन; मग तुह्मी हर्षानें आनंद कराल.

शाब्बाथ समाप्त होतांना तिशआवेआव असला तर

" שובה " बद्दल हें पुढील गीत ह्मणतात.

אוי כי קינה רבת हाय हाय! पुत्रांच्या व कन्यांच्याहि मुखीं अति शोक आहे; शाब्बाथाच्या समाप्तीस "प्रभु आमचा देव याची प्रसन्नता आह्मांवर होवो," हें[1] वाक्य ह्मणणें बंद झालें आहे. शाब्बाथामध्यें व इतर दिवसांमध्यें भेद करितांना आह्मास कंप सुटून आह्मी आक्रोशाच्या वाणीनें रडतों कीं, कितिमान सीयोन कशी छेदली गेली व कोमेली, अकस्मात ती कशी गडबडली, आणि पवित्र मंदिरीं कशा ज्वाला पडल्या! सर्व गायन पालटून हाय हाय, आणि सर्व नृत्य पालटून शोक कसा उत्पन्न झाला! अतिखेद होऊन अति वेदना लागल्या आहेत; ज्या दिवशीं मला अति त्रास झाला, त्या दिवशीं (द्राक्षरसाच्या) प्याल्यावरून पवित्रदिवस व सामान्य दिवस यांमध्यें भेद करणें नाहीं, माझ्या प्रिय विभागाप्रमाणें जें माझें पवित्र मंदिर तें परक्यानें आपलें वतन करून घेतलें आहे. अतिक्रमाची झडती होण्याच्या या रात्रीं संकटांत पडलेल्यांस व नाशपावलेल्या दुःखितांस सुगंधि झाडांचा वास घेण्याची मनाई[2] आहे; सुगंधी धूप दाखविण्याच्या वेळीं अन्य लोकांतील उन्मत्तांनीं त्यांस तुडविलें, आणि त्यादिवसापासून सर्वकाळ या दिवशीं शोक करण्याचें हेंच कारण आहे. (या शाब्बाथाच्या समाप्तीच्या वेळीं) "प्रभु आमचा देव याची प्रसन्नता आह्मांवर होवो." हें ह्मणण्याबद्दल सर्वांच्या

---

१ प्रत्येक शाब्बाथाच्या समाप्तीच्या वेळीं जी प्रार्थना करितात तिजमध्यें गीत ९० ओ १३ पासून गीत ९१ चे शेवटपर्यंत ह्मणावें लागतें, त्यामध्यें हें वाक्य आहे.
२ प्रत्येक शाब्बाथाच्या समाप्तीच्या वेळच्या प्रार्थनेनंतर जसा सुगंधि पदार्थाचा वास घ्यावा लागतो तसा.

मुखांतून दुःखाचे सुसकारे निघतात; डोळ्याच्या पुतळीप्रमाणें सांभाळलेल्या प्रियकरांस त्यांच्या कुरणांतून हाकून नेल्यादिवसापासून लोकांनीं भरलेलें नगर क्रोधाखालीं कसें राहिलें आहे!

शाब्बाथ समाप्त होतांना तिशआबेआब असल्यास
हें गीतहि ह्मणतात.

אני הגבר אקונן जो शोक करितो, आणि आजच्या रात्रीं आक्रोशानें रडतो, तो मनुष्य मीच; "प्रभु आमचा देव याची प्रसन्नता आह्मांवर होवो" हें वाक्य ह्मणण्याबद्दल "सोनें कसें निस्तेज झालें" हें वाक्य ह्मणतों. हा शाब्बाथ जो आब महिन्याच्या नवमीस (ह्मणजे तिशआबेआबच्या दिवशीं) आला आहे, तो समाप्त होतांना शोक करून मी मूर्च्छित होतों; हाबदालाच्या प्याल्याबद्दलें मी विषाचा प्याला चोखितों; या रात्रीं शोक करावा असा कित्येक पिढ्यांपासून नियम चालू आहे, ह्मणून मी विलाप करितों, रडतों व निराश्रित होऊन बसतों, सुगंधि झाडांचा मी वास घेत नाहीं. माझ्या पापामुळें मला फारच क्लेश होतात; हे अग्नीपासून प्रकाश उत्पन्न करणाऱ्या! पवित्र नगर जळाल्यामुळें माझे कष्ट मजवर वाढले. हे पवित्र व अपवित्र यांमध्यें भेद करणाऱ्या! शाब्बाथाच्या समाप्तीच्या वेळीं मला हाय हाय; निश्चयें माझ्या मनाचा हर्ष बंद पडला, आणि माझे क्लेश वाळूसारखे वाढले. पाहा, शांतवन करणारा कोणी नाहीं, जुलूम करणारा दया करण्यापासून फिरला, आणि नाशाच्या आब महिन्याच्या नवमीपासून आह्मी पोरके झालों आहों, आह्मांस बाप नाहीं. आमचे पूर्वज अल्पविश्वासामुळें स्वर काढून रडले, त्यादिवसापासूनें मला रडण्याचा आणि शोक व खेद

---

१ इमेयाचा विलाप अ. ४ ओ. १. २ शाब्बाथच्या समाप्तीच्या वेळच्या प्रार्थनेनंतर द्राक्षरसाच्या प्याल्यावर पवित्र दिवसामध्यें व व्यवहारिक दिवसांमध्यें भेद दर्शविण्याकरितां धन्यवाद करितात त्यास हाबदालाचा प्याला असें ह्मणतात. ३ मोशेनें रानांतून पवित्र देश हेरायासाठीं जीं बारा मनुष्यें पाठविलीं होतीं, त्यांतून दहा जणांनीं त्या देशाविषयीं खोटें वर्त्तमान सांगितल्यावरून गणना अ. १४ ओ १ एथें लिहिल्याप्रमाणें जो व्यर्थ शोक केला, आणि मिसरांतून निघालेल्यांतून येहोशूवा व कालेब यांवांचून पवित्र देशांत कोणी जाणार नाहीं, हा देवाकडून जो नियम झाला, तो याच दिवशीं झाला.

करण्याचा नियम झाला आहे. आमच्या पूर्वजांनीं पाप केलें, आणि आतां ते नाहींत; तर त्यांच्या अपराधामुळें मीं दुःख भोगावें काय? हे आकाशांत वस्ति करणाऱ्या ! बापांकरितां लेंकरांनीं मरावें काय? हे आमच्या देवा, तूं आपल्या दयेनें ऊठ, आह्मावर दया कर, आणि आमचा शोक पालटून हर्ष कर; हे प्रभू, पूर्ण मनानें आह्मी तुझ्या तारणाची वाट पाहात आहों. इस्राएलाचे पाडाव परतवून आणि सीयोनेकरितां उद्धारणारा पाठवून, तुजकडील तारणाची व उद्धाराची वाट पाहाणारे जे सीयोनेकरितां शोक करितात, त्यांचें शांतवन कर.

ברוך אתה יי हे परमेश्वरा, आमच्या देवा, जगताच्या राजा! अग्निच्या ज्योति उत्पन्न करणाऱ्या, तूं धन्य आहेस.

या दिवशीं सुगंधावर धन्यवाद करीत नाहीं; परंतु हा तिशआवेआवचा उपास समाप्त होतांना प्रार्थनेनंतर द्राक्षरसाच्या प्याल्यावर בורא פרי הגפן आणि המבדיל בין קודש לחול हे धन्यवाद मात्र करितात.

אז בחטאינו पूर्वी आमच्या पापांमुळें आमच्या पवित्रमंदिराचा नाश झाला, आमच्या अपराधांमुळें आमचें प्रसादस्थान जळालें; यावरून मजबूत बांधलेल्या नगरामध्यें[1] शोक चालला आहे, आणि आकाशांतील सैन्येंहि विलाप करितात. उंच आकाशीं याकोबाचे वंशं[2] रडतात, राशीहि अश्रू गाळितात, येशुरूनाच्या[3] झेंड्यांनीं आपलीं डोकीं नमविलीं आहेत, अगस्त्य व कृत्तिका यांची मुखचर्या अंधारमय झाली आहे. आमच्या पूर्वजांनीं विनवणी केली, परंतु देवानें जशी ऐकिलीच नाहीं, लेंकरेंहि ओरडतात, परंतु बाप त्यांस उत्तर देत नाहीं; शास्त्राची वाणीहि दुःखानें ओरडते, परंतु विश्वासू मेंढपाळ त्यांजकडे आपला कान लावीत नाहीं. पवित्र संतान गोणताट पांघरतें, आकाशांतील सैन्येंहि आपणांस गोणताटानें झांकून घेतात, सूर्य अंधारमय झाला आहे, चंद्रहि दिपला आहे, आणि ताऱ्यांचें तेज नाहींसें झालें आहे. (राशींतील) पहिला मेष खेदित जीवानें ओरडत आहे, कारण शेरडें वधायास नेलीं

---

१ येरूशालेमेमध्यें, या नगरास मजबूत बांधलेलें नगर असें गीत १२२ ओ० ३ एथें म्हटलें आहे. २ इ. बांधला आहे. ३ योसेफानें स्वप्नांत पाहिलेले तारे. ४ येशूरून हें नांव इस्राएलास अनुवाद अ० ३२ ओ० १५ अ० ३३ ओ० २६ इत्यादि अनेक ठिकाणीं दिलेलें आहे.

आहेत; उंच आकाशीं वृषभ राशीचा आकांत ऐकूं येतो, कारण गुरांतील ज्येष्ठ यांचीं शिंगें नमलीं आहेत. मिथून राशीचे तारे खेदानें पीडित आहेत, कारण बांधवांचा वध होऊन पाण्यासारखें रक्त वाहत आहे; कर्क राशी भूमीवर पडूं पाहते, कारण आह्मी तृषेनें व कोरडेपणानें मूर्च्छित झालों आहों. सिंह राशीच्या गर्जनेनें आकाश थरथरतें, कारण आमचें ओरडणें आकाशावर चढलें आहे; तरणे व तरण्या हीं मारलीं गेलीं यामुळें कन्या राशीचें तोंड काळें पडलें आहे. तूळ राशीचीं पारडीं उलटलीं आहेत, तिची करुणा यावी ह्मणून ती काकुळती करिते, कारण आमच्या जीवनाच्या पारड्यापेक्षां मरणाचें पारडें भारी झालें आहे; वृश्चिक राशीस भय व कंप यांनीं व्यापिलें आहे, कारण आमच्या शत्रूंनीं आह्मास विंचवांमध्यें बांधून टाकिलें आहे. धन राशीचें मुख मागें वळलें आहे, कारण आमच्या खडकरूप आश्रयानेंच आह्मावर शत्रूप्रमाणें धनुष्य ताणिलें आहे; आमच्या डोक्यावरून पाणी वाहातें ह्मणून कुंभ राशी मोठ्यानें ओरडते, आणि घडे भरलेले असतांहि आमचा वैसा कोरडा पडला आहे. मकर राशीच्या शोकाची वाणी ऐकण्यांत येते, कारण होम नाहींसा होऊन कोंकरूं व दोषहारक यज्ञाचा बोकड यांचा समूळ नाश झाला आहे; मीन राशीस कंप व थरथराट सुटला आहे, कारण आह्मी माश्यासारखे वाईट जाळ्यांत सांपडलों आहों. हे सर्वसमर्था ! आमचे कष्ट पाहून आह्माकडे आपल्या दयेनें फीर, आमचे अपराध दडपून टाक, आणि आमचें पवित्र मंदिर बांध, ह्मणजे आह्मी आपल्या डोळ्यांनीं पाहून आमचें मन हर्षित होईल.

עד אנא सीयोनेकरितां आह्मीं कोठपर्यंत रडावें, आणि येरूशालेमेकरितां कोठपर्यंत खेद करावा ! तूं फिरून सीयोनेवर दया कर, आणि येरूशालेमेचीं गांवकुसें बांध.

עורה נא ימינך आतां तूं आपला उजवा हात उंच उभार, आणि तुझ्या क्रोधास पात्र झालेलीस शांतवन पावलेली असें ह्मण; मग खेदित भिकारीण पीडलेली व तळमळणारी भिकारीण शांतवन पाव-

---

१ शिंगांचें उभारणें ही थोरपणाची व नमणें ही नीचपणाची ह्मण आहे.
२ इ. टाळा.

लेली अशी ह्मटली जाईल. आतां तूं आपला आटोपून धरलेला हात उभार, आणि तुजकडील तारणाचा वेळ कळीव; मग एकांतवासांत पडलेलीं, पीडलेलीं व तळमळणारीं शेरडें शांतवन पावलेलीं अशीं ह्मटलीं जातील. हे परात्परा ! आतां तूं आपला उजवा हात उभार, आणि दयेनें सीयोन नगरी बांध; मग दीन व दरिद्री लोकांस परमेश्वरानें सीयोनेचें शांतवन केलें आहे असें ह्मटलें जाईल. हे देवा ! आतां तूं आपला उजवा हात उभार, आणि दयेनें इस्राएलांस खंडून घे; मग तुजपुढें मागणाऱ्या दीनास सीयोनेचा उद्धरणारा आला आहे, असें ह्मटलें जाईल.

या नंतर ואני זאת हें वाक्य सोडून ואתה קרוש आणि सुतक्यांचा קריש דהוא עתיר ह्मणून प्रार्थना पूर्ण करितात. मग दिवे मालवून हाज्जान भुमीवर बसून हें पुढील ह्मणतो.

אחינו בית ישראל अहो इस्राएलाचे घराण्यांतील आमचे बांधवहो ! ऐका; आपल्या पवित्र व वैभवाच्या मंदिराचा नाश होऊन आज एक हजार आठशें—वर्षें झालीं;[1] आपल्या डोईवरील मुगूट पडला आहे; हाय हाय ! कीं, आपण पाप केलें.

על היכלי माझ्या मंदिराकरितां लागलेल्या वेदना मला सर्पासारख्या दंश करितात; आणि सीयोनेच्या नाशामुळें मी अंधारांत बसलों आहें. ज्या दिवशीं माझी ज्योत अंधारमय झाली, त्या दिवशीं माझा दिवा विझाला, जें माझें नगर लोकांनीं भरलें होतें, त्याचा विध्वंस झाला त्या दिवशीं, त्या रागाच्या व कोपाच्या दिवशीं सर्वत्र अंधार होतो. मी आपल्या सुंदर वाड्याकरितां दुःखानें थक्क होऊन बसलों आहें, नायक व आज्ञा करणारो येण्याची मी नित्य वाट पाहात आहें; आणि उजेडाची आशा करितों, परंतु पाहावें तर अंधारच. मी आपला बिछाना काळोखांत ताणितों; शोक व विलाप यांतच माझा हर्ष झालेला नाहीं काय ? देवानेंच मजकरितां हा विभाग ठेविला आहे; आणि माझ्या मार्गावर

---

१ हें टैटसाच्या हातून झालेल्या येरुशालेमेच्या दुसऱ्या नाशाचें वर्ष. हा नाश इसवी सन ६८ मध्यें झाला. नेबूखादनेसाराच्या हातून जो पहिला नाश, तो इसवी शकाच्या ४२२ वर्षांपूर्वीं झाला. इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम वर्ष ३३३८ व वर्ष ३८२८ पाहा. २ माशीयाह.

अंधारच आहे. पराक्रमी व गौरववान देवच माझ्या घावांस आरोग्यता पाठवील, जो प्रकाश करणारा तोच माझा प्रकाश पहिल्याप्रमाणें प्रज्वलीत करील, तोच माझा दीपक उजळील, आणि त्याच्या प्रकाशापुढें अंधार नाहींसा होईल.

प्रार्थनेनंतर दु:खानें व खेदानें घरीं जावें आणि एकमेकास सलाम करूं नये, कोणी बेसमज असल्यास त्यास हळू शब्दानें उत्तर द्यावें.

तिशआबेआबची पाहांटेची प्रार्थना.

ही प्रार्थना सीसीथींवांचून व तेफीलीनींवांचून करितात, आणि नित्याप्रमाणें कीर्त्तनाचा भाग वाचितात; परंतु למנצח מזמור לדוד השמים מספרים गीत १९ याबद्दल האזינו על נהרות בבל गीत १३७ आणि אז ישיר निर्गम अ. १५ ओ० १—१९ बद्दल האזינו השמים अनुवाद अ० ३२ ओ० १—४३ वाचून ארני שפתי पर्यंत नित्याप्रमाणेंच प्रार्थना करितात परंतु ארני שפתי संध्याकाळच्याप्रमाणें वाचून तोच भाग पुनः मोठ्यानें वाचितांना נקרישך बद्दल हा पुढील भाग ह्मणतात, आणि पुढें उपाध्यांनीं आशीर्वाद देण्यासंबंधी जो भाग आहे तो ह्मणत नाहींत.

נקרש את שמך जसें वर आकाशांत, जें तुझ्या भविष्यवाद्याच्या हाताकडून लिहिलें आहे, कीं ते एकमेकाला मोठ्यानें बोलत ह्मणाले "पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्याचा परमेश्वर आहे; सर्व पृथ्वी त्याच्या गौरवानें भरली आहे." याप्रमाणें तुझें नाम पवित्र मानितात, तर या तुझ्या पृथ्वीमध्यें आह्मी तें पवित्र मानितों, त्यांचे जे असतात, ते स्तुति करून असें ह्मणतात कीं त्यांच्या स्थानांतून परमेश्वराचें गौरव सुवंदित असो. आणि तुझ्या पवित्र वचनांमध्यें असें लिहिलें आहे कीं "परमेश्वर सर्वकाळ राज्य करितो; हे सीयोने, तुझा देव पिढोपिढीं आहे; तुह्मी परमेश्वराला स्तवा.

मोठ्यानें ארני שפתי पूर्ण झाल्यावर पुढील ह्मणतात.

וארץ שפל רומי माझा थोरपणा पडून धुळीस मिळाला, माझा, मानभंग झाला, माझा जीव मातीशीं मिळाला, आणि माझा हात आखूड झाला आहे. जेव्हां मी आपलीं दु:खें आठवितों, तेव्हां माझ्या हृदयांत लाटा भरून येतात, आणि अग्नीचे इंगळ पेटतात. हे परमेश्वरा! तूं मजवर ढालरूप असतां, माझा आश्रय नाहींसा होईल काय? आणि पाउलें संकोचित होतील काय? सैन्याच्या मोठ्या सरदारानें मजविरुद्ध

लढाइची सिद्धता केली, त्यानें माझ्या गौरवाचें तेज विटाळलें, मोडलें, आणि तुडविलें, ह्मणून आज दिवस, जो पांचव्या महिन्याचा नऊवा दिवस त्यास मी उपासाचा दिवस ह्मणत नाहीं काय! आणि लोकांस बोलावून मी सभा करीत नाहीं काय!

בחרש החמישי या पांचव्या महिन्यांत माझ्या वसतीस्थानाचीं द्वारें शोक व विलाप करितात; आणि या महिन्याच्या नवमीस माझे डोळे अंधुक व मंद होतात. सिंहाच्या राशीमध्यें सिंह गर्जतो, या दिवशीं जेव्हां देवाच्या उंचस्थानावर सिंह ओरडतो, तेव्हां माझे कान ठणकतात. हे परमेश्वरा! मला नीच करायास तूं अतिक्रोधायमान होऊं नको; आणि मला दोषी ठरविण्याकरितां तूं माझे अपराध कधींच आठवूं नको. हे माझ्या ढालरूप आश्रया व माझ्या तारणाच्या शिंगा! तूं आपल्या वसतीस्थानांतून माझ्या अरोळीची वाणी ऐक.

ירדתי לתחתיות मी खोल खांचेच्या तळास पोहोंचलों, माझी आशा बुडाली, माझा[१] शोभायमान मुगुट व माझ्या कपाळावरील फूल हीं गेलीं, न्याय शिकविणारे गेले ह्मणून माझा मार्गहि वांकडा झाला आहे. मी आपल्या खडकरूप आश्रयास धिक्कारलें असें तो ह्मणतो ह्मणून माझा चंद्र मावळला आहे; शोकानें मजपुढून गायनाचे नियम काढून टाकिले आहेत, आणि माझ्या जीवाचें जीवन त्यांतच होऊन राहिलें आहे. माझ्या अति अशक्ततेमुळें माझा जीव नाश पावतो, माझें आयुष्य खुटतें, जळजळाटानें मला व्यापिलें, मी आपल्याच फांसांत सांपडलों, प्रतिवर्षी पांचव्या महिन्यांत मी रडणें व शोक चालवितों, आणि माझा जीव विलापाचें ध्यान करितो.

בחרש החמישי पांचव्या महिन्यांत माझ्या सामर्थ्याचा कमरबंद तुटून त्याचे तुकडे झाले. या महिन्याच्या नवमीस जसें खळें मळणीच्या वेळीं, तुडवितात तसा मी तुडविला जातों. सिंहाचे राशींत जेव्हां सिंह आपल्या झाडींतून त्यांजवर चढून आला, तेव्हां त्यानें माझे लोकांस ओढून ताणून विदेशी केलें. तो आपल्या झाडींतून चढून आला, आणि विषाचा प्याला त्यानें मला पाजिला. त्यानें मला खाऊन फस्त

१ मुख्य याजकाचा.

केलें, आणि फांसांत गुंतविलें. हे मारणाऱ्या व जीवंत करणाऱ्या, खोलस्थानीं उतरणाऱ्या व त्यांतून वर चढविणाऱ्या ! विषाच्या प्याल्यामुळें जे मूर्च्छित पडले आहेत, त्यांस आतां तूं सजीव कर.

דוק ותוג רעשו राष्ट्रांमध्यें जी श्रेष्ठ ती ज्या दिवशीं विधवेसासारखी झाली, (त्या दिवशीं) आकाश व पृथ्वी हीं कांपलीं, ढगामुळें मजवर काळोख पडला, प्रकाशाच्या सर्व ज्योति आणि सूर्य व चंद्र हेही अंधारमय झाले. सत्यशील मनुष्यें ठेंचलीं जाऊन मूर्च्छित होऊन पडलीं; यास्तव मी प्रतिवर्षी "नीतीनें भरलेली नगरी व्यभिचारिणी कशी झाली ?[1]" असें ह्मणून आक्रंदन करितों. सर्व पृथ्वीमध्यें संतोषकारी सुंदर डोंगरावरील दावीदाची राहण्याची नगरी[2] इजमधील लोक नाश पावले व मोडले आहेत, आणि ह्मण व हंसें असे झाले आहेत; तिजमधील सर्व लोक कण्हत आहेत, त्यांस कोठेंच दया सांपडत नाहीं; तिचे सर्व वीर बलात्काऱ्यांच्या तरवारी पुढें कुंठित झाले. याखीन व बोआजे हे आरावनाच्या खळ्यांतूनं मुळांतून उपटले गेले, शेखीनां राहण्याचें ठिकाण परक्यांनीं तुडविलें व तेथें ते गर्जतात.

שכינה צועקת शेखीना[3] अरोळी करून ओरडतो, कीं, अहो लेंकरांनो ! वाईट करणें सोडा; कारण पाय ताणायास खाट न पुरे एवढी आखूड झाली आहे.[5] जेव्हां गर्विष्ठांनीं माझ्या वसतीस्थानांत मूर्ति शिरविल्या, तेव्हां आंतील जें पवित्र स्थान तेथून शेखीना निघाला, आणि ह्मणाला कीं, ते आपलें पातक अंगीकारीत आणि माझें मुख शोधीत, तोंपर्यंत मी आपल्या राहण्याच्या ठिकाणीं परत जातों. तो मंदिरांतून चढून एका करूबावर बसला; आणि त्यानें लोकांस आकाशांतील राशींस व नक्षत्रांच्या सैन्यास नमन करितांना पाहिलें; तेव्हां तो ह्मणाला कीं, या आपण (ईश्वराकडे) फिरूं, असें ते ह्मणत तोंपर्यंत मी आपल्या स्थानीं परत जाईन. तो त्या करूबावरून वळून दुसऱ्या करूबावर जाऊन बसला, मग त्यानें त्यांचीं तोंडें पूर्वेकडील दरवाज्या-

---

१ गीत ४८ ओ. ३ एथें हें नाम सीयोन नगरास दिलेंहें आहे. २ टीका २४.३ टीका २५. ४ ईश्वरी साक्षात्कार. ५ पवित्र मंदिरीं मूर्तीस. जागा न पुरे एवढी दाटी झाली आहे.

कडे पाहिलीं, तेव्हां तो ह्मणाला कीं, ते आपल्या संकटांत मनापासून मला शोधीत, तोंपर्यंत मला रानांत कोण नेईल ? तो त्या करूबावरून मंचकाच्या उंबऱ्याकडे फिरला; आणि त्यांनीं देवाच्या मंदिराकडे पाठ केली, असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां तो ह्मणाला कीं, ते देवाचें वचन शोधायास फिरत, तोंपर्यंत मी आपल्या सैन्यास सोडून जाईन. मग तो उंबऱ्यावरून निघून अंगणांतील चौकांत गेला; आणि त्यांस घाणेरडा वास सोडितांना पाहिलें, तेव्हां तो ह्मणाला कीं, हे देवा, झोपीं कां जातोस ? ऊठ; असें ते ह्मणत तोंपर्यंत मी आपलें मुख त्यांजपासून लपवीन. शेवटीं तो रागानें त्या अंगणांतून गच्चीवर चढला; आणि त्यानें त्यांस आकाशांतील सैन्याकडे ध्यान करून प्रदक्षिणा करितांना पाहिलें; तेव्हां तो तें पवित्र स्थान सोडून निष्ठुरपणें ह्मणाला कीं, भांडखोर स्त्रीबरोबर राहण्यापेक्षां गच्चीच्या कोंपऱ्यांत जाऊन बसणें बरें आहे.

בת ציון שמעתי मी सीयोनेचे कन्येस दुःखाचे उद्गार काढितांना ऐकतों; हाय हाय ! मीहि तोच प्याला पितों व त्यांतील गाळ चोखितों. अगे सुंदरी ! जशी कुमारी गोणताट नेसून आपल्या तरुणपणाच्या नवऱ्याकरितां आकांत करिते, तशी शेखीनाचा प्रकाश अंधारमय झाला आहे, ह्मणून तूंहि आकांत कर. हे लबानोनाच्या अरण्या ! शोक कर, कारण अग्नीनें तुझे गंधसरू भस्म केले आहेत; सीयोनेचे दरवाजेहि विलाप करितात, कारण देवानें तिचा विध्वंस केला आहे; अंगण (राखेंत) लोळतें, कारण होम बंद पडला आहे; न्यायसभेची कोठडीहि विलाप करिते, कारण तिजमधील न्यायसभा नाहींशी झाली आहे. (पवित्र) मंदिरांतील कोठडी रडून ह्मणते, अहारोनाच्या संतानाकरितां हाय हाय ! त्यांतील अतिपवित्रस्थान ह्मणतें कीं, कोश गडप झाला. ह्मणून हाय हाय ! पडदा ओरडून ह्मणतो, माझ्या ठिकाणाचें महत्त्व राहिलें नाहीं, कारण जुलुमगारानें त्याच्या गुप्त गोष्टी पाहून उघड केल्या आहेत. धुपाटणें शोक करून ह्मणतें, सुगंध कोठें आहे ?

१ ईश्वरी साक्षात्कार राहण्याचें पवित्र ठिकाण मंदिराच्या पश्चिमेस होतें त्याकडे पाठ फिरवून आणि पूर्वेकडे आपलीं तोंडें करून पूर्वेस उगवणाऱ्या सूर्यास नमन करतांना पाहिलें.

ऊरीम व थूम्मीम[1] यांकरितां आहारोनाची छाती फाटते; वेदि होमाकरितां व शांतीकारक यज्ञाकरितां थरथरून ह्मणते कीं, पूजनाचा प्रकार वेळेवर कां सिद्ध होत नाहीं! माझें गायन कोण गाईल? असें ह्मणून लेव्याचा विणा रडतो; त्यास शुद्ध दिव्याचें झाड उत्तर करितें कीं, माझे दिवे कोण पेटवील! पडदे कोण ताणील! याविषयीं राहुटि खेद करिते; आणि शास्त्राचा प्रकाश बंद पडला ह्मणून तें कांपतें. दर्शनीय भाकरी रचायास कोणी नाहीं, ह्मणून मेज थरथरतें; पूजन करें बंद पडलें! असें ह्मणून याजकपण ध्यानस्थ बसलें आहे; आणि या सर्व गोष्टींकरितां माझ्या लोकाची कन्या अश्रुधारा गाळिते, कारण तिच्या शत्रूनें तिचे सर्व सरदार पाडाव करून नेले आहेत. हे खडकरूप आश्रया, तुझ्या प्रसन्नतेच्या दिवसाची तिनें कोठपर्यंत वाट पाहावी? परक्याच्या हातीं गुंतलेल्या चिमणीसारिखी ती आहे, तिजला सहाय्य करणारा व आश्रय देणारा कोणी नाहीं, खडकावरील मळ्याच्या फांद्या सुकण्यापूर्वी तूं ऊठ; ज्या त्याग केलेल्या द्राक्षमळ्याचीं कुंपणें तूं मोडिलींस त्यास दर्शन दे.

[2]ממו שרפים ज्या दिवशीं न्यायाच्या निवाड्यावर मोहोर होऊन तो अमलांत आला, त्या दिवशीं सेराफीम दूतांनीं कीर्त्तन करणें बंद केलें; हाय्योथ व ओफन्निम दूत पाहाऱ्यावर स्तब्ध राहिले, आणि शांतीच्या दूतांनीं रडून आकांत केला. ज्योति उगवतांना अंधारमय झाल्या, आकाशांतील सैन्यानें आपणास गोणताटानें झांकून घेतलें, हाय्योथ व त्या समोरील ओफन्निम दूतहि शोकानें रडतात. ज्या दिवशीं परक्याचा हात पवित्र ठिकाणावर वळावला, आणि अग्नीनें मंदिरांत व अति पवित्र ठिकाणीं नाश केला, त्या दिवसापासून हाय्योथ दूतांचे दोन पंख गळून पडले, ह्मणून मी एकांत बसून शोकप्रद गीतें रचितों. हे प्रियकरा! तूं आपल्या वसतीस्थानाकडे केव्हां फिरशील, आणि बापांचें मन लेंकरांकडे केव्हां फिरविशील? तेव्हां सत्यशीलांचे कोंवें हर्ष करून तुझा सन्मान करतील; आणि हाय्योथ व ओफन्निम दूत तुला पवित्र मानितील. परंतु आतां से-

१ प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग २ टीका १ पाहा. २ आब्राहाम, इसहाक व याकोब यांचें संतान.

राफीम दूत वक्तृत्वानें, ओफन्निम दूत कीर्त्तनाच्या वाणीनें, आणि शांतीचे दूत रडून आकांत करितात, आणि त्यांच्या मनांत उकळ येऊन ते ओरडतात; आणि एकमेकांस हाक मारून ह्मणतात.

בחדש החמשי पांचव्या महिन्यांत (मोशेच्यावेळीं) हेरांनीं खोटा मजकूर प्रगट करण्याविषयीं विचार केला; तेव्हां त्या महिन्याच्या नवमीस शोक व वादाची वाणी ऐकूं आली. सिंहराशींत त्यांचे हात अशक्त झाले, आणि त्यांस आरोग्य सांपडलें नाहीं; आळशी ह्मणाला, मार्गांत सिंह आहे, रस्त्यांत त्याचें पिलूं आहे. रस्ते हाय हाय, शोक व आकांत यांनीं भरले आहेत, लेंकरें व तान्हीं खडकावर विखरलीं आहेत; तर हे पवित्रा, इस्राएलांच्या स्तुतींत वास करणाऱ्या! आरीएलाच्या समुदायाशीं कुंठित मनुष्यासारखा तूं कां वागतोस?

בחדש החמשי पांचव्या महिन्यांत अग्नीच्या इंगळासारखे तीर त्यांनीं आमच्या हृदयीं मारले, या महिन्याच्या नवमीस आमचा जीव घाबरून खेदित झाला आहे; सिंहराशींत सिंह समुद्राच्या व नदीच्या गरजण्यासारिखा गरजतो, ती सिंहाचीच गर्जना व त्याच्या पिलाचीच ओरड आहे; त्या पिलानें झडप घालून माझा उंच बांधा छेदला व त्यानें मला खाऊन फस्त केलें आहे; माझ्या मिष्टान्नानें त्यानें आपल्या पोटाची खाखाई पुरविली; हे अनंता, मनुष्यास बुद्धि शिकविणाऱ्या देवा! तूं आपला बाहु उघड आणि गौरवानें प्रगट हो.

בחדש החמשי पांचव्या महिन्यांत रस्तोरस्तीं हायहायची ओरड झाली, या महिन्याच्या नवमीस नाशावर नाश झाले; सिंहराशींत धुमसणें, शोक, विलाप व भय हीं एकदांच येऊन पडलीं; मग सिंह गर्जला तर कोण भिणार नाहीं! तीक्ष्ण तीरांचा भडिमार झाला असतां कोण भिणार नाहीं! ते सिंहाच्या पिलासारखे असून आखलाप्रमाणें गर्जतात; तर दुःखितांकरितां तुझ्या दयेच्या पुरास धैर्य येऊं दे; आणि "अहो विपरीत वर्त्तनाच्या लोकांनो! फिरा;" असें जें तूं विपरीत वर्त्तणाऱ्यांस ह्मटलें आहेस, त्याप्रमाणें तूं आमचा वावगेपणा निटाव.

---

२ गणना अ. १३ व १४ पाहा. १ पहिल्या मंदिराचा, दुसऱ्या मंदिराचा व बित्तेर शहराचा नाश हे याच महिन्यांत व याच तारखेस झाले.

אך זה היום निश्चयें, माझ्या ऋणाची झडती होण्याचा दिवस तो हाच; या दिवशीं माझ्या चोहोंकडे शोकच ऐकण्यांत येतो; कारण या दिवशीं शत्रु प्रबल झाला, आणि सिंहिणीसारखा विदारूं लागला. माझे संकल्प व माझे मनोरथहि मोडले. नाशाच्या दिवशीं लुटारू आला, आणि त्याचीं मुळें वाढलीं; माझ्या शोभायमान मंदिराचे दरवाजे अग्नीच्या ज्वालांनीं भस्म झाले; त्यांतील राजेरजवाडे अन्य लोकांमध्यें शत्रूच्या तरवारीनें वधले गेले; याकरितां त्याची भिंत व त्याचे कोट शोक करून मूर्च्छित पडलीं आहेत. गर्वानें हर्ष करणारांनीं माझें पवित्र मंदिर नासिलें; त्यांनीं मला खाऊन फस्त केलें, माझ्या सर्व सुंदर वस्तु संपविल्या, मला फाडितांना न थांबतां जो सूड त्यांनीं उगविला, तो (हे देवा,) त्वां पाहिला; कां तर त्यांनीं याकोबाला खाल्लें, आणि त्याची वस्ति ओसाड केली आहे. आस्वलानें[1] द्वारें तुडविलीं व कोट मोडिले; जी परगण्यामध्यें मुख्य होती, तिला ओसाड करून टाकिली आहे; तिचे याजक रागानें, क्रोधानें व संतापानें वधले गेले; बाहेर तरवार, आणि खोल्यांमध्यें भय व्यंग करिते. सीयोनेचीं लेकरें संकटसमयीं ह्मणतात कीं, जरी देवानें आपला हात आह्मांवरून आटोपून धरिला आहे, तरी तो दया करण्यास विसरला काय? संकटीं त्वां दयेचीं द्वारें बंद केलीं ह्मणून तिचीं तान्हीं शत्रूपुढें पाडाव होऊन गेलीं आहेत; तुझ्या पवित्र वस्तिस्थानीं यावानी लोकांचीं सैन्यें आलीं; तुझा पवित्र वाडा, जें आमचें आश्रयस्थान, तें त्यांनीं विटाळलें; ज्याविषयीं त्वां आज्ञा केली होती कीं, त्यानें तुझ्या मंडळींत येऊं नये, त्या दुष्टांनीं तुझ्या स्तुतीचें मंदिर भ्रष्ट करून टाकलें आहे. सीयोन ह्मणते मला हाय हाय! कारण सर्व समर्थानें मला अव्हेरिलें आहे, माझे छळणारे चढले आहेत; माझ्या कुमाऱ्या पाडावपणांत गेल्या, आणि माझीं तान्हीं आपटून मारलीं गेलीं; हे माझे शब्द लिहिले जाते तर किती बरें! याप्रमाणें माझ्या पवित्र स्थानाचा नाश होत असतां, व माझे अडसर मोडले असतां; माझ्या पाडावपणाच्या देशांत मी कोठपर्यंत कैदेंत राहावें? अहो माझे मित्र व बंधु हो! माझ्या दुःखासारखें (दुसऱ्या कोणाचें)

---

१ शत्रूनें.

दुःख आहे काय ? माझा बाप जीवंत असतांहि मी पोरकी झालें आहें. हे दयावंता ! तुझें वतन ओसाड, विखरलेलें व त्यागानें परक्याच्या हातीं कोठपर्यंत राहील ? हे सर्वसमर्था ! तिच्या शोकाकडे दृष्टि लाव, आणि तिच्या कण्हण्याकडे कान लाव. हे परमेश्वरा, आह्मांस तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मीं फिरूं.

गीत ७९.

" עַד מָתַי " हे परमेश्वरा, शत्रूनें तुझें प्रार्थनामंदिर जाळिलें व तुझ्या कराराचीं लेंकरें वधिलीं; ह्मणून तुझ्या मंडळीनें या दिवशीं तुजकडे कोठपर्यंत शोक करून ओरडावें ? हे देवा, राष्ट्रें तुझ्या वतनांत शिरलीं आहेत. हे परमेश्वरा, तुजवर उठणारांची गर्दी, तुझ्या मंदिराचा नाश, आणि तुझे लोक जे तुजकरितां जुलूम सोशितात, आणि तुझ्या नामाकरितां वधले जातात, त्यांचें विखरणें तूं कोठपर्यंत विसरशील ? आणि तुझे लोक जे तुझ्या घराच्या नाशाविषयीं खेद करितात, त्यांची प्रार्थना तूं रागानें कोठपर्यंत नाकारशील ? ज्या बलात्काऱ्यांनीं याकोबास[1] खाल्लें व सर्वदा त्यांस लुटिलें, ते कोठपर्यंत प्रबल होतील ! मी त्यांचें कल्याण इच्छितों, तरी ते माझ्या टाळूवरील केंस उपटतात व कातरतात, धिक्कारानें माझ्या गालावर मारितात, आणि खोट्या ओंठांनीं कुटिलपणा करितात; हे परमेश्वरा, दुष्ट कोठपर्यंत हर्षित होतील ? तुझा सेवक तुझ्या दासीचा पुत्र यानें पाडावपणांत कोठपर्यंत ओरडत असावें ? हे परमेश्वरा, मी खाटिकवाड्यांत कोठपर्यंत वस्ति करावी ? आणि कोठपर्यंत भट्टीच्या व चुलीच्या मध्यें पडून राहावें ? त्यामुळें माझे डोळे अंधूक झाले आहेत; पेटलेला अग्नि संध्याकाळीं, सकाळीं व दुपारीं माझ्या पाठीं लागला आहे; दोनवेळां झालेल्या नाशामुळें मी कोठपर्यंत विस्मित राहावें ? तूं येरूशालेमेवर कोठपर्यंत दया करणार नाहींस ? तुझ्या कुरणांतल्या शेरडांच्या शेषानें कोठपर्यंत खेद करीत असावें !

איכה צאן ההריגה वधावयास काढलेलीं शेरडें गोठणीवरून कशीं विखरलीं ? त्यांच्या तोंडांवर काळी मस जमली आहे; तीं चिखलांत लोळतात; उघड्या रस्त्यावरहि त्यांस पाहणारांच्या नजरेस तीं ओ-

१. याकोबाच्या संतानास.

ळखूं येत नाहींत; त्यांचें मुखतेज कोळशांपेक्षां काळें पडलें आहे; त्यांस आळ्यांत कोणी ओळखीत नाहीं. शोक करणें आणि शहामृगास भाऊ होऊन राहाणें, आणि तंतुवाद्यें व इतर मंगलवाद्यें यांबद्दल दवडलेल्या पारव्यांकरितां व घरोब्यांतून नेलेल्या त्यांच्या पिलव्यांकरितां शोक व विलाप करून ध्यान करित बसणें मला शोभतें; तीं शुभ्र पांढऱ्या वस्त्रांवर पाळलेलीं होतीं, परंतु आतां तीं भुकेनें मरतात; मिष्टान्नें खाणारीं आळ्यांत नाश पावतात. ज्या दिवशीं तरवार दुयम उपाध्यांवर येऊन पोंचली, आणि अग्नि पेटून भस्म करूं लागली, तेव्हां ते ओरडले, परंतु कोणीच उत्तर दिलें नाहीं; त्यांतून कांहीं अग्नीमध्यें पडले व कांहीं शत्रूच्या तरवारीनें पडले; त्यांनीं जाणलें कीं, झुडपांत वस्ति करणाराकडूनच याप्रमाणें ठराव झाला आहे, आणि ह्मणूनच पवित्र मंदिराचे दगड सर्व आळ्यांमध्यें विखरले आहेत. बालकें नागवीं, भुकेलीं व अनवाणीं फिरतानां सांपडतात, भाकर कोठें आहे असें तीं विचारतात. आणि तान्हेनेंहि व्याकुळ होतात; त्यांस कैद करून नेणारांची तीं काकळूत करितात, तरी त्यांस भाकर सांपडत नाहीं, तीं आपल्या उत्पन्नकर्त्याच्या दयेची आशा करितात, तरीहि तान्हीं आळ्यांच्या चवाठ्यांत भुकेनें मूर्च्छित होऊन पडतात. देवानेंच आपलें धनुष्य ताणून आह्मावर हें सर्व रचिलें आहे, शत्रूनें ज्यादिवशीं आरंभ करून पूर्ण नाश केला, तेव्हां काकळूत करणारांच्या वाणीस उत्तर देणारा कोणी नव्हता, लेंकरांनीं मेंढ्याप्रमाणें आपल्या माना लांबवून माना मोडणाराच्या हातीं दिल्हा; पवित्र मंदिरांचे सर्व चवाठे त्याच्या भक्तांच्या रक्तानें भरले, आणि आबालवृद्धांचे मुडदे चवाठ्यांत भूमीवर पडले. हे देवा ! फीर; कोठपर्यंत तूं आपला क्रोध त्यांजवर पाठविशील ? त्यांचीं पापें तूं कोठपर्यंत क्षमा करणार नाहींस ? त्यांजकडे तूं आपले तीर कोठपर्यंत लाविशील, आणि त्याच्या काळजास कोठपर्यंत भोंकें पाडिशील ? हे देवा, शेतांवर पाऊस पाडणाऱ्या ! भादरलेल्या नाझीरांच्या विटाळास शुद्धता पाठीव.

१ शहामृगासारखें एकांतवासांत राहाणें. २ मोशेला पहिल्यानें होरेब डोंगरावर झुडपांत दर्शन देणाऱ्या देवाकडून. ३ नाझीर ह्मणजे ज्याच्या डोईवर जन्मापासून केंस असत त्याच्या, त्याविषयींचे सर्व नियम गणना अ. ६ येथें लिहिले आहेत.

שאי קינה अगे सीयोनेचे कन्ये! खेदानें शोक व विलाप कर; माझें पवित्र व वैभवयुक्त मंदिर नाशास गेलें ह्मणून मुकी बैस; इथोन व तेदी[1] या (दरवाज्यावर) कांहीं अवचट येऊन ते गडले; माझा प्रियकर पळाला ह्मणून माझा नाश करणारा मजवर चढून आला आणि माझें गौरव गेलें. ज्या दिवशीं सर्वसमर्थ मजशीं कडवटपणें वागला, त्या दिवशीं मी मोठ्यानें आकांत करितों; ज्या लढाईच्या दिवशीं प्रार्थनेच्या घरावर अग्नि ओतला गेला, त्या दिवशीं मी तरट पांघरतों; कारण स्तविलेलें नाम व लिशकाथ हाग्गोलें या नावाची कोठडी, हीं विटाळलीं गेलीं; माझें बळकट आश्रयस्थान नाशास गेलें, आणि माझें प्रख्यात भरंवशाचें मंदिर उघडें पडलें. (अर्पणें) जाळायास वरून येणाऱ्या अग्नीबद्दल खालच्या अग्नीनें मला भस्म केलें; अर्पणें जाळण्याचें ठिकाण आणि एबेन हाज्जोहेलेथ दगडें हीं पेटलीं; देवानें गाबरीएल दूतास पाठविलें, आणि त्यानेंहि अग्नि विखरलों. परकीय लोकांचा अग्नि व वाणी माझ्या सभामंदिरांत आली. क्रोधाच्या दिवशीं आकाशांत शोक व आकांत व्हावा, अशी देवानें आज्ञा केली ह्मणून दूतांनीं आपणास पंखांनीं झांकून घेऊन मोठा शोक केला; तेव्हां राष्ट्रांचा बापे कंबरेवर हात देऊन रंगमहालीं आला, आणि हाय हाय! ह्मणाला; तेव्हां अनंतानें त्यास उत्तर केलें कीं, माझ्या प्रियकरास माझ्या मंदिरीं येण्यासारखें काय दुःख झालें आहे? तेथील ज्वाला दूरदेशांतहि आकाशापर्यंत दिसत होत्या; तेव्हां माझे भरंवशाचे मनुष्य जे याजक, त्यांतील ऐशीं हजार एकामागून एक टोळीनें आले, आणि गच्चीवर चढले; ते पळाले नाहीं, परंतु त्यांनीं अग्नींत उड्या टाकून हरपळले. याचदिवशीं सेईराचा हात व त्याची तरवार मजवर उठली; त्यानें बित्तेरास येऊन तेथेंच चार लक्षांस वधिलें, तेव्हां सरळ मनुष्यांची वाणी ढगांनीं झांकलेली देवापुढें येऊन (ह्मणाली) कीं, त्यानें मला मारिलें, घायाळ केलें व मजवरील शेलाहि त्यानें काढून घेतला. लढाईच्या दिवशीं आरब लोकांकडे ऐशीं हजार तरुण पळाले, ते तान्हेले व पाण्यासाठीं कासावीस

१ टीका २६. २ टीका २७. ३ टीका २८. ४ येहेजकेल अ. १० ओ. २ एथें लिहिल्याप्रमाणें हें घडून आलें. ५ आब्राहाम. ६ एसावाचे संतानाचा. ७ याकोबाची.

असतां त्यांनीं त्यास खार पदार्थ खावविले; त्यांचे डोळे द्राक्षरसाकडे लागले होते, परंतु त्या हावेनें फुगविलेल्या मसका होत्या; त्यांचें शांतवन करणारा कोणी नव्हता, त्यांजवर दया करणारा कोणी नव्हता, आणि माझ्या फांकाफांक झालेल्यांस एकवट करणारा कोणी नव्हता. हे परमेश्वरा! माझ्या सर्व छळणारांची आठवण कर, आणि त्यांच्या कर्मांचें योग्य फल त्यांस दे; आणि तारले जाणाऱ्या लोकांच्या तारणाकरितां त्वरा करून त्यांजवरील जोकडाच्या शिवळी मोड; मग शोक करणारे पहिल्याप्रमाणें गायन करून हर्ष करितील; आणि हाच माझा मित्र हाच माझा प्रियकर असें आह्मीहि गायनगृहांत गायन करूं.

גרושים מבית תענוגיהם रंगमहालांतून हाकून लावलेल्याच्या वधलेल्यामुळें माझा जीव व्याकुळ होतो, त्याच्या पडलेल्या मुडद्यांमुळें माझें मन, माझें मन धगधगतें, आणि त्यांच्या वधलेल्यामुळें माझीं अंतडीं माझी अंतडीं कळकळतात. ज्या दिवशीं कुमाऱ्या त्याच्या महालांतून निघून गेल्या, आणि आई त्यांच्या तान्ह्यांपासून पारक्या झाल्या, आणि लुटाऱ्यांच्या हातीं लूटीसारख्या उघड्या मिळाल्या, ज्या दिवशीं त्याचा शोक फारच वाढला, ज्या दिवशीं त्यांच्या (गळ्यांतील) कंठ्यांबद्दल त्याच्या मानेवर जोकड बसलें, आणि त्या धरून नेणारांच्या हातीं तरवारीच्या पाडाव अशा झाल्या तो हाच दिवस. जे वधले गेले त्यांच्या कण्हण्यामुळें, तान्ह्यांच्या ओरडण्यामुळें आणि बाळांच्या शोकामुळें माझे कान भणभणतात, कारण याच दिवशीं त्याच्या रक्ताचे लोट वाहिले, प्रार्थनामंदिर विटाळलें जाऊन धुळीस मिळालें, पवित्रशास्त्र रक्तांत लोळलें, आणि त्यांच्या सुज्ञांचीं तोंडें विस्मित झालीं. याच दिवशीं माझीं तान्हीं खडकावर आपटून त्यांचे तुकडे तुकडे झाले; माझे शेष भनानले व त्यांस कोणीच एकवटिलें नाहीं; ज्या लोकांनीं माझ्या देवाचें नाम धिक्कारलें, त्यांनीं माझें गौरव विटाळलें, माझें पवित्र स्थान भ्रष्ट केलें; याच दिवशीं सिंहाचीं पिलीं माझ्या मागें लागलीं, आणि त्यांच्या गरजण्यानें माझें मन वितळलें. जीं लेंकरें किरमिजी वस्त्रांवर वाढलीं व जीं किरमिजी वस्त्रें पांघरून मिष्टान्नें खात असत, तीं ज्या धन्यास दया नाहीं अशा विकणारांच्या व विकत घेणारांच्या हातीं कशीं धक्के खाऊं लागलीं ? याच दिवशीं त्यांजवर सैन्याचीं सैन्यें चढून आलीं,

या त्याच्या पाठी लागणारांचा मार्ग गरुडासारिखा हलका झाला. आकाशांतील ताऱ्यांप्रमाणें रचिलेली मंडळी मातीच्या फुटक्या मडक्याप्रमाणें कशी विखरली ! ती पाडाव होऊन पूर्वेस व उत्तरेस कशी गेली ! तिजमध्यें सूड घेणारी तरवार कशी चालली ! तिचे द्राक्षमळ्याचा नाश होऊन तो कसा ओसाड पडला ! आणि त्याच्या डाहळ्या पांढऱ्या फिकट कशा पडल्या !

איך נוי שודד माझें वस्तिस्थान कसें ओस पडलें आणि माझा प्रियकर कसा उडून पळून गेला ? लोकांनीं भरलेलें नगर कसें एकटेंच बसलें ! जी विश्वासु होती, ती विधवेसारिखी कशी एकटीच बसली आहे ! यासाठीं प्रतिवर्षी या दिवशीं मी शोक करितों, अघोर जीवांसारिखें मी आक्रंदन करितों व घुबडासारिखा विलाप करितों. भयंकर (देवानें) आपल्या क्रोधानें आपलें वचन पूर्ण केलें, सीयोनेच्या कन्येच्या राहुटींत त्यानें आपला राग अग्नीप्रमाणें ओतिला; ज्या मंडळींविषयीं "याकोबाचे रजःकण कोण मोजील[1]" असें ह्मटलें आहे, तिजवर त्याचा कोप नेमिलेलाच होता. तान्हीं बाळें त्यांच्या स्थानांकडे तोंडें पसरितात व बाळकें भाकर मागतात, परंतु त्यांच्या पुढें (भाकर तुकडा) ठेवणारा कोणी नाहीं; कारण आकाशांत वस्ति करणारानेंच त्याजवर दया केली नाहीं. हारएल, आरीएलें व पवित्र मंदिर हीं जळालीं; देवच शत्रु होऊन त्यानें इस्राएलाचा विध्वंस केला; ज्या इस्राएल लोकांस त्यानें आपलें वतन असें मानून घेतलें होतें, त्यास त्यानें धिक्कारिलें. मी दिवसोदिवस अश्रुधारा वाहवितों, आणि दुःखाची वाणी काढून ध्यान करीत व घुमत बसतों; याजकांतील तरुणांसाठीं मी पारव्यासारखा घुमतों. आश्रयासाठीं स्थापिलेल्या खडकानेंच[3] मला कांपविलें, त्यानें रागानें येहूदाच्या कन्येचा कोट मोडिला; येहूदा हा प्रांतोप्रांतीं (लोकांमध्यें) ह्मण व थट्टा असा झाला आहे. कांपतांना व थरथरतांना माझा जीव मजमध्यें म्लान होतो; अवघा दिवस व अवघी रात्र माझीं अंतडीं, माझीं अंतडीं तिडका देतात; मी तिडका देऊन

---

१ गणना अ. २३. ओ १०. २ हारएल व आरीएल हीं यज्ञवेदींचीं नावें होतीं. ३ देवानें.

शोक व खेद करितों. परक्यांनीं व जुल्म करणारांच्या लेंकरांनीं इश्माएल, मोआब व हागरी यांच्या डेऱ्यांत मला पीडिलें; हागरीम लोकांनीं माझी छलना केली; आणि मला कडू दवणा (हें विष) पाजिलें. दु:खानें व क्लेशानें नमलेल्या जीवास विश्रांति सांपडूं दे, आणि हर्षाची व आनंदाची वाणी ऐकूं दे; शोक करणारांस आनंद व आनंद करणारांस शोक करूं दे; ह्मणजे प्रतिवर्षी या दिवशीं आह्मी शोक करणार नाहीं, आणि परमेश्वरानें उद्धरलेले गायन करीत सीयोनेस परत येतील.

'' ככתוב ופדויי जसें लिहिलेलें आहे कीं, परमेश्वराचे उद्धरलेले गायन करीत सीयोनेस परत येतील; आणि त्यांच्या माथ्यावर सर्व काळचा हर्ष राहील; ते आनंद व हर्ष पावतील आणि शोक व कण्हणें पळून जातील अणखी असें लिहिलें आहे कीं, परमेश्वर ह्मणतो, त्या दिवसांत, त्या समयींच इस्राएलांचा अन्याय शोधण्यांत येईल, परंतु कांहीं नसेल; आणि येहूदाचीं पातकें शोधण्यांत येतील, परंतु तीं सांपडणार नाहींत; कारण ज्यास मी राखितों, त्यास क्षमा करीनें. आणि यापुढें कोणताहि अन्याय व कोणताहि अपराध यांकडून आमच्या प्रार्थनेस तुजपुढें येण्यास अडथळा होणार नाहीं.

אליכם עדה נאמנה अहो विश्वासू मंडळींतील लोकहो ! मी तुह्मांस एका विषयाविषयीं विचारितों. सर्व वर्षांमध्यें हाच दिवस विख्यात कां ? पेसाहाच्या दिवशीं मधुरवाणीनें आपण प्रार्थना कां करितों ? आतां तर आपल्या अपराधामुळें आपण कावळ्यासारिखी वाणी काढितों; कारण पवित्र नगरी भाल्यांनीं व तरवारींनीं नाश पावली; विश्वासू नगरी विधवेसारिखी कसी झाली ! पेसाहाच्या दिवशीं सर्व इस्राएल हर्षित कां असतात ? आतां तर आपल्या अपराधांमुळें आपण शोक व खेद करितीं; कारण किरमिजी वस्त्रांवर वाढलेल्यास मुख्य हस्तक्यानें वधिलें; हा दिवस विश्वासू मंडळीस विषाप्रमाणें कडू झाला आहे. पूर्वीच्या काळांत येशुरूनाचे वंशें सरदार कां होते ? आतां तर आपल्या अपराधामुळें ते मारले जाण्यास व नाश पावण्यास परक्यांच्या

१ हागारीचें संतान. २ यशया अ. ५१ ओ ११. ३ इर्मेया अ. ५० ओ. २०. ४ इस्राएलाचे वंश.

ह्मणजे मोआब व हागारी यांच्या लेंकरांच्या हातीं विखरले आहेत; अवघें वर्ष तूं त्यांस अल्पवेतनाच्या लोकांकडून कोंडून ठेविलें आहे. पूर्वीच्या काळांत आपण राष्ट्रांचे अधिपति कां होतों ? आतां तर आपल्या अपराधामुळें आपण सर्व लोकांपेक्षां नीच झालों आहों; खुनी मनुष्यांच्या हातीं हांकून नेलेले व पीडलेले आहों; लोकांनीं भरलेली नगरी कोटपर्यंत व केव्हांपर्यंत विधवेसारिखी राहील ?

אש תוקד בקרבי मी मिसरांतून निघतानां जें घडून आलें, तें मनीं आणिलें असतां माझ्या अंतर्यामांत अग्नि चेततो.

मी येरूशालेमेंतून निघतांना झालेल्या गोष्टी आठविल्या तर शोक करावा लागतो.

मी मिसरांतून निघतांना विसरलें जाणार नाहीं असें गीत[1] मोशेनें गाइलें.

मी येरूशालेमेंतून निघतांना इर्मेया रडला, आणि त्यानें अति मोठा शोक केला.

मी मिसरांतून निघतांना माझ्या राहुटीवर[2] देवाचें लक्ष होतें, आणि त्याजवर ढग होतें.

मी येरूशालेमेंतून निघतांना देवाचा राग मजवर ढगाप्रमाणें येऊन राहिला.

मी मिसरांतून निघतांना समुद्राच्या लाटा गरजल्या, परंतु त्या भिंतीसारिख्या उभ्या राहिल्या.

मी येरूशालेमेंतून निघतांना पाण्याचे लोट वाहिले, आणि माझ्या डोक्यावरून पूर गेले.

मी मिसरांतून निघतांना आकाशांतून अन्न उतरलें व खडकांतून पाणी वाहिलें.

मी येरूशालेमेंतून निघतांना मला विष, शोक व कडू पाणी हीं प्राप्त झालीं.

मी मिसरांतून निघतांना सकाळीं व संध्याकाळीं मी होरेब डोंगराच्या आसपास असें.

---

१ हें गीत निर्गम अ. १५ एथें आहे. २ इ. घरावर.

मी येरूशालेमेंतून निघतांना मला बाबेलच्या नद्यांजवळ शोक करावयास सांगितलें.

मी मिसरांतून निघतांना देवाच्या गौरवाची प्रतिमा मजपुढें भस्म करणाऱ्या अग्नीसारखी चालत असे.

मी येरूशालेमेंतून निघतांना वधायासाठीं पाजवलेली तरवार उपसलेली होती.

मी मिसरांतून निघतांना पशूचे होम, तर्पण व अभिषिक्त करण्याचें तेल होतें.

मी येरूशालेमेंतून निघतांना देवानें आपली संपत्ति असे मानिलेले लोकांस जशीं शेरडें कापायास नेतात तसें चालविलें होतें.

मी मिसरांतून निघतांना सण व शाब्बाथ स्थापन झाले, आणि चमत्कार व अद्भुत कृत्यें होत असत.

मी येरूशालेमेंतून निघतांना उपास व शोक स्थापन झाले, आणि व्यर्थतेमागें धांवणें होत असे.

मी मिसरांतून निघतांना चोहोंबाजूंस (उडणाऱ्या) झेंड्यांच्या मध्यें सुंदर राहुट्या असत.

मी येरूशालेमेंतून निघतांना सभोंवतीं इस्माएली लोकांच्या राहुट्या व परकीय लोकांच्या सैन्याचे तळ असत.

मी मिसरांतून निघतांना योबेलें व शेमित्ता चालू असून लोकांमध्यें शांतता असे.

मी येरूशालेमेंतून निघतांना इस्राएल सर्वकाळ विकले गेले, आणि (ईश्वराकडून) त्यांस सुटपत्राचा ठराव झाला.

मी मिसरांतून निघतांना दयासन, कोश व स्मरणाचीं रत्नें होतीं.

मी येरुशालेमेंतून निघतांना गोफणीचे धोंडे व गडपकरणारीं शस्त्रें होतीं.

मी मिसरांतून निघतांना लेवी, याजक व सत्तर वृद्ध लोक होते.

---

१ पन्नासावें वर्ष लेवी अ. २५ पाहा. २ सातवें वर्ष लेवी अ. २५ व अनुवाद अ. १५ पाहा. ३ इ. देशामध्यें. ४ निर्गम अ. २८ ओ. ९–१२ पाहा.

मी येरुशालेमेंतून निघतांना कहर करणारे, जुलूम करणारे, व विकणारे व विकत घेणारे होते.

मी मिसरांतून निघतांना मोशेनें मेंढवळण केलें, आहारोनानें (आह्मांस) चालविलें.

मी येरुशालेमेंतून निघतांना नेबूखादनेसार व आद्रीआनोस केसॅार यांनीं (आह्मांस कैद करून नेलें.)

मी मिसरांतून निघतांना लढाईची तयारी केली असतां परमेश्वर तेथें सहाय असे.

मी येरूशालेमेहून निघतांना (ईश्वर) दूर झाला, आणि पाहावें तर तो नाहींच.

मी मिसरांतून निघतांना (साक्षात्पणाच्या राहुटींत) पडद्याच्या आड असणाऱ्या गुप्त वस्तु व बाहेर रचिलेल्या दर्शनीय भाकरी असत.

मी येरूशालेमेंतून निघतांना (ईश्वरानें आपला) क्रोध मजवर ओतला व (आह्मास) गिचाडांत गुंतविलें.

मी मिसरांतून निघतांना होम, यज्ञ व सुवासिक होत्र चालत असे.

मी येरूशालेमेंतून निघतांना सीयोनेचीं महत्ववान लेंकरें तरवारीनें भोसकलीं जात असत.

मी मिसरांतून निघतांना याजक सन्मानाकरितां नेमलेलें सुंदर पागोटें घालीत असत.

मी येरूशालेमेंतून निघतांना ओरडणें व गोंगाट, थट्टा व छल होत असे.

मी मिसरांतून निघतांना सोन्याचें फूलें, अधिकार व सामर्थ्य हीं होतीं.

मी येरूशालेमेंतून निघतांना सहाय नाहींसें झालें, आणि आमचा मुगुट उडविला गेला.

मी मिसरांतून निघतांना पवित्रता, भविष्यकथन व भयंकर साक्षात्कार असे.

मी येरूशालेमेंतून निघतांना आह्मामध्यें विटाळ, भय व अशुद्ध आत्मा असे.

---

१ टीका. २९. २ मुख्य याजकाच्या कपाळावरील फूल, निर्गम अ. २८ ओ. ३६–३८ पाहा.

मी मिसरांतून निघतांना हर्ष, तारण व वाजवयाचे करणे होते.
मी येरूशालेमेंतून निघतांना रडणें व घायाळ झालेल्यांच्या आरोळ्या ऐकूं येत होत्या.
मी मिसरांतून निघतांना मेज, दिव्याचें झाड, सकलहोम व धूप दाखविणें होतें.
मी येरूशालेमेंतून निघतांना मूर्ति, ओंगळ वस्तु, कोरींव देव व स्तंभरूप देव होते.
मी मिसरांतून निघतांना शास्त्र, प्रमाण नेम व भजनपद्धति हीं होतीं.
मी येरूशालेमेंतून निघतांना शास्त्राभ्यास करणारे उणे झाले व नित्यार्पण बंद झालें.
मी मिसरांतून निघतांना जसे, तसे चमत्कार सैन्याचा देव आह्मांस दाखवो.
सीयोनेंत तो आपला साक्षात्कार, येरूशालेमेंत तो आपलें पूजन पुनः स्थापन करो.

אלי עדתי अहो माझ्या समाजांतील लोकहो! ज्या दिवशीं माझा मुगुट पडला, माझी सारंगी शोक करूं लागली, माझा पोंवा रडण्याचा सूर काढूं लागला, त्या दिवशीं तुह्मी शोक व विलाप करा; माझ्या अश्रुधारा तर वाहातच आहेत, कारण माझीं दुःखें फारच वाढलीं आहेत. माझ्या अत्यानंदाच्या दिवशीं देवानें माझ्या मार्गांत कुंपण घातली, लालबुंद दिसणारी मंडळी नागवी पडली, जसा केवळ तिच्या अघोर अन्यायाचा दंडच झाला आहे; या दिवशीं माझे अपराध मजविरुद्ध साक्ष देतात, आणि माझ्या दुष्कर्मामुळें मी लज्जित होतों. हे माझ्या जीवा! ज्या दिवशीं तुझ्या खडकरूप आश्रयानें तुझें मंदिर परक्यांच्या हातीं, आणि तुझा पवित्र डोंगर व तुझें नगर अन्य लोकांच्या व तुझ्या शत्रूंच्या हातीं दिलें, आणि ज्या दिवशीं माझ्या सर्व युक्ति निष्फल झाल्या, आणि माझ्या सर्व विचारांमुळें मी विस्मित झालों, त्या दिवशीं तूं खेदानें शोक कर. या दिवशीं परक्या लोकांनीं माझा माहाल ओसाड केला, त्यांतील पूजन करणारांची मंडळी शोक करीत बसली आहे, आणि त्यांतील सर्व मोलवान पदार्थ व माझ्या पवित्र मंदिरांतील व यज्ञवेदीवरील सर्व भांडीं

आम्मोन व गबाल यांच्या पुत्राकडे गहाण पडलीं आहेत, तीं वैऱ्यांच्या व द्वेषणाऱ्यांच्या वाड्यांत गेलीं. पवित्र डोंगर व टेंकड्या ओसाड पडल्या आणि पवित्र स्थानांतून शेखीनाचें पाखर घालणारें गौरव नाहींसें झालें, यामुळें ज्या दिवशीं माझा वाडा तुडविला गेला, आणि गांवकुसूं पडतांना मोठा आवाज झाला; त्या दिवशीं माझ्या डोळ्यांतून नाले वाहतात आणि अश्रूंच्या नद्या चालतात. अहो खेदित जीवांनो! तुह्मी माझ्या ऋणाच्या झडतीच्या दिवशीं पूर्वजांच्या कबरा ज्या नगरीं आहेत, त्या नगराकरितां, व उदारमनाच्या लोकांच्या वसतिस्थानाकरितां रडा, आणि जसें पखालींतून व निबिड मेघांतून पाणी ओतितात, तशा तुमच्या डोळ्यांतून धारा लागूं द्या; मजवरील जुलुमामुळें व संकटामुळें माझ्या आयुष्याच्या सर्व वर्षापर्यंत मी भटकत फिरत आहें. हे शुद्ध नजरेच्या (देवा)! वाईट पाहिल्यामुळें नागवा पडलेल्या बंदिवानावरील तूं आपली दया आवरून व आटोपून धरितोस; तर मीं आपल्या ऋणामध्यें कोठपर्यंत राहत असावें? आणि तूं आपला क्रोध माझ्या किती पिढ्यांपर्यंत वाढविशील! आणि पूर्वी झालेले चमत्कार मी पुन्हां पाहणार नाहीं काय? मद्यप्यासारिखें माझें मन भ्रमतें, आणि माझें सर्व शांतवन करणारेच मला छळतात; ज्या दिवशीं बापानें आपला ज्येष्ठ पुत्र विकला, त्या दिवसाची मला सर्वदा आठवण होते; तर जी आज्ञा तूं आठवायास व सांभाळायास सांगितली आहेस, त्या आज्ञेची तुझ्या तरुणपणाच्या स्त्रीकेरितां आठवण कर; माझे अपराध तूं सर्वकाळ आठवशील काय? आणि माझ्या वाङ्‌निश्चयाची प्रीति विसरशील काय? प्रत्येक दिवस तारणाची वाट पाहतां पाहतां माझे डोळे अंध झाले, माझ्या आयुष्यभर राहिलेल्या धिक्कारामुळें माझा जीव कंटाळला, (पवित्र नगराच्या) भिंती व त्याचे कोट हीं पडल्यामुळें माझा घांस कडू आणि माझे प्यावयाचे पदार्थ विष व कडू दवणा यासारिखे झाले आहेत.

१ हेब्रोन नगराकरितां. २ निर्गम अ. ४ ओ. २२ एथें लिहिल्याप्रमाणें इस्राएल. ३ शाब्बाथाची आज्ञा; इजविषयीं निर्गम अ. २० ओ. ८ एथें आठवायास आणि अनुवाद अ. ५ ओ. १२ एथें सांभाळायास सांगितलें आहे. ४ यशाया अ. ५४ ओ. ६ वरून अशी उपमा दिल्ही आहे.

נפש יריות איך प्राणसखी आपल्या घरोब्यांतून कशी उडून गेली; आणि क्रोधाच्या दिवशीं तिला तिच्या पवित्र शोभेंतून कशी हांकून लाविली? ज्या दिवशीं तिचा नाश झाला, त्या दिवशीं लेंकरें हरवलेली व विधवा यांजसारिखी ती शोक करिते; तिनें जन्म दिल्हेल्या लेंकरांतून तिला चालवायास कोणी नाहीं व तिचा हात धरायासहि कोणी नाहीं. तिच्या टोळ्या पृथ्वीच्या सर्व कोनीं घाबरलेल्या मनानें व नाकाच्या अशक्त श्वासोच्छ्वासानें पवित्र स्थानाच्या नाशाकरितां व ओसाड पडलेल्या द्वाराकरितां दुःखानें रडत आहेत; सोडलेल्या व आपल्या प्रियकरापासून वेगळी झालेल्या स्त्रीप्रमाणें त्या धापा देतात. हाय हाय! डोक्यावरील गौरव पायांनीं तुडविलें जातें, कारण तरुणपणाची स्त्री लवकरच धिक्कारली गेली, तिच्या दृष्टीपुढील सुंदर पदार्थ चोरले व लुटले गेले, तिला तिच्या पवित्र वसतिस्थानांतून व सुंदर उंच स्थानांतून हांकून लाविलें आहे. हाय हाय! कारण जीवंत देवाच्या लेंकरांचे डोळे त्याच्या शोभिवंत व तेजस्वी दिसणाऱ्या (पवित्र मंदिराकडे) आशेनें पाहातां पाहातां अंध झाले आहेत; जुलूम करणारांच्या देशीं ते आपल्या पापामुळें क्षीण होत आहेत; त्यांचे क्लेश पाहून त्यांची आईहि मोठ्यानें ओरडून शोक करिते, आणि ह्मणते, हाय हाय! कारण माझीं लेंकरें गेलीं, नाहींशीं झालीं; माझी शक्ति थकली, कारण शत्रूचा हात त्यांजवर बळावला. मला एकीकडून धक्की मिळते व दुसरीकडूनहि धक्की मिळते; एका जुलमांतून सुटलों नाहीं इतक्यांत दुसऱ्या जुलमांत पडतों; माझा खडकरूप आश्रय ज्याची बरोबरी करण्यासारिखा दुसरा कोणी नाहीं, त्यामागून जेव्हां मी वळलों, तेव्हां पळतां पळतां माझे गुडघे गळून पडले; संकटामुळें, देशांतरामुळें व मोठ्या भयंकर वाणीमुळें मी पश्चात्ताप करून आपली मांडी थापटितों. सेफारादांतील पाडावें वनांतील लांडग्याच्या तावडीस कसे सांपडले? संकटामुळें, अधिकाऱ्यांच्या जुलमामुळें व अतिशय त्रासामुळें बाप आपल्या लेंकरांकडे वळून पाहातहि नसत; वृद्ध, तरुण व लेंकरें यांची त्यांनीं एकदाच कत्तल उडविली; यामुळें जशी पहिल्यानें प्रसूत होणारी प्रसवतेवेळीं कांपते, तशी देवाची मंडळी भयानें कांपत आहे.

१ शेखीना. २ इ. द्वाराच्या उंबऱ्याकरितां. ३ टीका २० पाहा.

שכורה ולא מיין अगे द्राक्षरस न पितां मस्त झालेले ! तूं आपला डफ उडीव, आपलें टक्कल कर, केंस कातर आणि आपला चेहेरा कुरूप कर; उंच टेंकड्यांवर बसून शोक कर आणि आपल्या सर्व देशांतें फीर; तुझ्या वाईट इच्छिणारांनीं ज्या शासनाच्या दिवसाची वाट पाहिली, तो आला ह्मणून तूं विलाप कर; तुझ्या उंबऱ्याच्या नाशाकरितां तूं ईश्वरापुढें आरोळी कर, आणि त्याजकडे आपले तळहात पसर. राजधानीचें नगर सीयोन इजमध्यें परका व शत्रु कसा आला ! परक्यांचें पाय पवित्र भूमि कसे तुडवितात ! जेथें मुख्य याजकहि जावयास भीत असे, तेथें पडद्याच्या आंतहि कुटिल लोक आले; आणि जेव्हां ते आले, तेव्हां जरी याजक अर्पणें सिद्ध करीत होते, तरी पाण्याच्या लोटाप्रमाणें त्यांचें रक्त वहात जाईपर्यंत ते आपल्या पाहाऱ्यावरच राहिले, आणि त्यांनीं आपलें काम सोडिलें नाहीं; मग त्यांनीं छप्परें व उजेडाच्या खिडक्या मोडून टाकिल्या. सीयोनेच्या कन्येच्या कण्हण्याचा शब्द दुरून ऐकूं येतो; ती हेशबोनासारिखा शोक व मेफाआथासारिखा विलाप करिते; जो प्याला मी पितों, त्यांतील सर्व गाळहि मला चोखावा लागतो; माझी शोभा भूमीवर उडविलेली आहे, आणि माझें शिंग कापून पडलें आहे; सिंहाच्या ह्मणजे नाश करणाऱ्या बाबेलच्या कन्येच्या आणि पारासाच्या दुष्ट कन्येच्या दांतांनीं व त्यांच्या तीक्ष्ण दाढांनीं मला खाऊन टाकिलें आहे; अगे सीयोने ! तुझें पाप माहितच आहे, मग तूं कां शोक करतेस; तूं आपल्या भविष्यवाद्यांस अव्हेरिलेंस, व आपल्या मूर्तींची वाणी ऐकिलीस, ह्मणून तुझ्या बहुत अपराधांमुळें तुझे लोक नकळत पाडाव करून नेलेले आहेत. हे माझ्या शत्रू ! माझा नाश झाला ह्मणून तूं हर्ष करूं नको; कारण जरी मी पडलों, तरी मी पुनः उठेन व परमेश्वर मला सहाय होईल; मी आपल्या बोध करणारांस सोडिलें ह्मणून त्यानें मला बंदांत घातलें आहे; परंतु ज्या देवानें मला

---

१ यशाया अ. ५१ ओ. २१ एथें याप्रमाणें येरूशालेमेस म्हटलें आहे. २ इ. सैन्यांत. ३ एमोऱ्यांचा राजा सीहोन याची राजधानी हेशबोन जी मोशेनें जिंकून घेतली तिजसारिखा, गणना अ. २१ ओ. २५–२९ पाहा. ४ हें मोआबाच्या एका नगराचें नाम आहे, तें इर्मेया अ. ४८ ओ. २१ येथें सांपडतें; मोआबाचा नाश होऊन हें मेफाआथ नगर व दुसरीं नगरें मोठा आक्रोश करितील असें भविष्य आहे.

विखरिलें आहे, तोच आतां मला एकवटील; ज्या खडकरूप आश्रयानें मला विकिलें आहे, तोच मला खंडून घेईल; जो प्याला मला प्यावा लागला आहे, तोच तुला प्यावा लागेल; मग मीहि तुझीं बाळकें खडकांच्या छिद्रांमध्यें विखरीन.

יום אכפי הכבדתי ज्या दिवशीं माझ्या प्रभूच्या मंदिराच्या अंगणांत मी भविष्यवाद्याच्या रक्तांत आपला हात बुडविला, त्या दिवशीं माझ्या अपराधांचें पारडें वजनांत भारी होऊन माझा अपराध दुप्पट झाला; आणि मला पीडणाराची तरवार येईपर्यंत, त्याचें रक्त समुद्रासारखें उसळत होतें, आणि ती तरवार माझ्या समुदायावर येईपर्यंत पृथ्वीनेंहि तें रक्त झांकिलें नाहीं, आणि ईश्वर आश्चर्यानें त्याचा सूड घेईपर्यंत तें स्थिरावलें नाहीं; यावरून येहूदाच्या कन्येचा शोक व विलाप वाढला. अरेरे ! मला हाय हाय ! राजरक्षकांचा नायक येईपर्यंत तें रक्त अधिकाधिक उसळत होतें; आणि जेव्हां तो परमेश्वराच्या मंदिरीं आला, तेव्हां त्यानें तें उकळ्या देतांना पाहिलें; मग तेथें जे याजक अर्पण करीत होते, त्यांस त्यानें त्याविषयीं विचारिलें; त्यांनीं उत्तर केले, कीं हें अर्पिलेल्या पशूंचे रक्ताशिवाय दुसरें कांहीं नाहीं; मग त्यानें हें काय ? आणि हें असें कां ? याचा शोध लावण्यास त्यानेंहि अर्पण केलें; तेव्हां मी आपल्या जीवास ह्मणालों, हें तुझें पाप व हेंच त्याचें फळ. इतकें होत असतांहि तें रक्त स्थिरावलें नाहीं, परंतु तें समुद्रासारिखें आणखी खवळलें; मग त्या गोष्टीच्या चौकशीअंतीं दिसून आलें कीं, अपराधावांचून मारला गेलेल्या ईश्वरी मनुष्याचें रक्त तें होतें; तेव्हां नेबूझारआदान ह्मणाला, त्याचे रक्ताचाहि झाडा घेतला जाईल, अशावरून ईश्वरहि थांबणार नाहीं व उगाच बसणार नाहीं; तर आतां (सर्व) याजकांस अनंताच्या मंदिरांतून बाहेर आणून मजजवळ एकवट करा, जेखार्या भविष्यवाद्याचें रक्त स्थिर होईपर्यंत मीहि स्थिर राहणार नाहीं. त्यानें शेंकडों वृद्धांस व हजारों तरुणांस भोसकलें, सैन्याच्या परमेश्वराच्या याजकांस व बापाच्या दृष्टीसमोर शाळेंत जाणाऱ्या बालकांस वधावयास नेलें, तरी तें निर्दोष रक्त शांत होईना; ती एक आश्चर्यकारक खूणच झाली; याप्रमाणें परक्याची तरवार सूड घेऊं ला-

गली, तेव्हां सर्व नगरीमध्यें गोंधळच झाला, आणि पूर्वी कधींच नव्हती अशी शोकाची वाणी ऐकूं आली. मग त्यानें तान्हेबालकांसहित स्त्रियांस वधावयाचा क्रम चालविला, आणि जेव्हां त्यांचें रक्त त्या निर्दोष रक्तांत पाण्यासारिखें सोडिलें, आणि तें त्याच्या रक्तांत समुद्रासारिखें व मिसराच्या नदीसारिखें वाहूं लागलें, तेव्हां नेबूझारआदान आपले डोळे आकाशाकडे लावून ह्मणाला कीं, त्या रक्ताची शिक्षा येरूशालेमेच्या कन्यांवर अद्याप पुरे झाली नाहीं काय? कैयांच्या शेषाचा तूं समूळ नाश करितोस काय? तेव्हां तें निर्दोष रक्त स्थिरावलें, आणि तेव्हां त्या सूडघेणाऱ्या तरवारीची तृप्तता झाली. हे आमच्या देवा, आह्मी तुजविरुद्ध पाप, अतिक्रम व दुष्टाई हीं केलीं, आह्मी तुझ्या भविष्यवाद्यांस मारिलें, परंतु आमची दुष्टाई आतां आह्मास कळून येते; आमचें शांतवन व्हावें ह्मणून तूं आह्मावर दया कर, कारण खोलस्थानांतून आह्मी तुजकडे ओरडत आहों, आमच्या दुष्कर्माची शिक्षा आह्मी किती भोगीत आलों! दुःखांत पडलेले व वादळांत सांपडलेले "लोरूहामावर"[1] कृपा कर; ती आपली दृष्टि तुजकडेसच लाविते, आणि तुझ्याच सहायाची वाट पाहाते.

בת עמי תייליל हान्ना व तिचे सात पुत्र यांवरून माझ्या लोकांची कन्या दुःखानें शोक करिते; कारण ते सातहि तिच्या दृष्टिसमोर वधले गेले, आणि तीहि आपल्या पुत्रांवर पडून मरण पावली. त्यांनीं देवास सोडावें व बेल देवाची सेवा करावी ह्मणून शत्रूनें त्यांस भुलविलें; परंतु त्यांनीं पृथ्वी स्थापन करणाराच्या एकत्वाविषयीं साक्ष देत असतां व त्यांच्या आईचे अश्रू तिच्या तोंडावरून वाहात असतां (परमेश्वराच्या) वतनाचा वांटा जुलूम करणाराच्या हातीं कसा आला! तो जुलूम करणारा पहिल्यानें धाकट्यास ह्मणाला, कीं तूं अन्य देवापुढें नमन करायास मान्य होशील, तर मी तुझा आदरसत्कार करीन व राज्यकारभारांत तूं माझा सहायकारी असा होशील; (परंतु त्यानें उत्तर केलें

१ "लोरूहामा" म्हणजे दया न पावलेली. होशेया अ. १ ओ ६ एथें हें विशेष नाम इस्राएलांस दिल्हें आहे. २ इस्राएल; हें नाम त्यांस मोशेनें अनुवाद अ. ३२ ओ. ९ एथें दिल्हें आहे.

कीं), पराक्रमानें वेष्टिलेल्या देवास मी कसा विसरूं ! तेव्हां त्यानें हु-कूम करून लागलेंच त्याचें डोकें उडविलें; तरी त्याच्या आईनें मोठ्या थाटानें त्याचें चुंबन घेतलें. मग तो क्रोधायमान होऊन दुसऱ्यास ह्मणाला, कीं, माझ्या मूर्तीचें वंदन कर, कारण तिचा उजवा हात महाप्रतापि आहे; त्यानें उत्तर केलें कीं, आकाशांत वस्ति करणारा, ज्यानें आपली संपत्ति असें मानिलेल्या (इस्राएलांस) त्यांच्या पीडकांच्या हातांतून सोडविलें, त्या एकावांचून (दुसऱ्या कोणाचीहि) मी सेवा करणार नाहीं. मग तिसऱ्यास तो ह्मणाला कीं, मूर्तीपुढून माझी अंगठी उचलून घे, ती नाकारूं नको, आणि माझे नियम सिद्धीस ने; अशाकरितां कीं, मी हटलों, आणि मी व्यर्थ शपथ वाहिली असें माझ्या प्रतिनिधींनीं ह्मणूं नये; त्यानें उत्तर केलें कीं, मीहि आपल्या जिभेनें नाहींच ह्मणतों. इतक्यांत आकाशांतून एक वाणी ओरडतां ऐकूं आली कीं, अहो हान्नाचे सात पुत्र हो ! तुह्मी धन्य; तुह्माकरितां एदेन बागेंत वतन सिद्ध करून ठेविलें आहे, कारण तुह्मी विश्वासूपणें आपल्या देवाची सेवा केली; ती आई आतां एदेनांत आपल्या पुत्रांसहित हर्ष करीत आहे.

איך נוי माझ्या पापामुळें माझ्या वसतिस्थानाचा नाश कसा झाला ! त्याकरितां मी आपल्या गालावरून अश्रू वाहावितों, या दिवशीं मी मोठ्यानें शोक करितों, आणि दिवसेंदिवस मी विलाप करितों. रिब्बी इश्माएल मुख्य याजक याच्या पुत्राविषयीं व त्याच्या कन्येविषयींहि माझें मन कष्टी होतें, आणि शांतवन करणारा कोणी नाहीं, माझ्या दुःखाच्या वेदनांपासून सर्व दूर झाले आहेत; त्या गोष्टीची जेव्हां मला आठवण होते, तेव्हां माझ्या हृदयीं केवळ अग्नीच पेटतो. ज्या वेळीं तीं (दोन्ही भावंडें) कैदेंत गेलीं, त्या वेळीं तीं दोघां धन्यांच्या हातीं आलीं, ते दोघे समोरासमोर राहणारे शेजारी होते; ते कांहीं विषयावर भाषण करीत असतां त्यांतून एक दुसऱ्यास ह्मणतो, कीं सीयोनेच्या लढाईतून किरमिजी वस्त्रें पांघरणारी अशी एक दासी मीं पाडाव करून आणिली आहे; तिचें तेज व तिची मुखचर्या चंद्रासारिखी असून ती

१ ही गोष्ट माकाबीचें पुस्तक दुसरें अ. ७ एथें सविस्तर लिहिलेली आहे २ इ. शांतवन बंद पडलें.

केसीया व येमीमा यांसारिखी आहे. त्याच्या शेजाऱ्यानें या विषयावर भाषण करितांना आपल्या गुलामाची दुप्पट प्रशंसा केली, आणि ह्मणाला, मीहि येरूशालेमेच्या लढाईंतूनच आलों, तेथून दिसण्यांत सुंदर असा एक गुलाम मीं पाडाव करून आणिला आहे, त्याचें तेज दोन प्रहरच्या सूर्यासारिखें आहे; ये, आपण त्यांचें लग्न लावूं, मग त्यांस आकाशांतील ताऱ्यांसारिखीं जीं लेंकरें होतील, तीं आपण दोघे वांटून घेऊं; ही गोष्ट ऐकून माझे कान ठणकतात, आणि जेव्हां मला याची आठवण पडते, तेव्हां मी आपला झगा फाडितों. ही गोष्ट त्या दोघांस जेव्हां मान्य झाली, तेव्हां संध्याकाळीं त्यांनीं त्या दोघांस एका कोठडींत बंद केलें आणि आपण बाहेर बसून आनंद करूं लागले; परंतु आंत तीं दोघें भयानें, धास्तीनें, दुःखानें, त्रासानें व क्लेशानें शोक करीत होतीं. त्या मुलाचें मन विलापानें तप्त होऊन अगदीं वितळून जाऊन (तो ह्मणाला कीं,) आहारोनाच्या पुत्रानें दासीशीं कसें लग्न करावें ! तीहि आपल्या दुर्दैवास रडून ह्मणाली कीं, योखेवेदच्या कन्येनें गुलामाबरोबर विवाह कसा करावा ! इस्राएलांमध्यें असें कधींच झालें नाहीं; हा त्याचा शोक सकाळ होईपर्यंत थांबला नाहीं. उजेडतां त्यांनीं एकमेकांस ओळखिलें; आणि अरे माझ्या भावा हाय हाय ! अगे माझ्या वहिणी हाय हाय ! असें ह्मणून त्या उभयतांनीं अतिशय खेद केला, आणि शुद्धीवर येऊन भयानें, दुःखानें व क्लेशानें त्यांचे जीव निघून जातपर्यंत तीं एकमेकांस आलिंगून राहिलीं; याविषयीं सप्तर्षि, अगस्त्य व कृत्तिका हीं नक्षत्रेंहि शोक करितात.

אבכה ועל שור माझें नांदणें ओस पडलें यावरून मी रडतों आणि उलाय नदीसारिखे माझ्या नेत्रांतून झरे वाहतात. अरेरे, हाय हाय ! वैऱ्याच्या हातून नाश पावलेला पवित्र देश, ज्याचा उपभोग मजपेक्षां नीच व राखलेल्या गुलामाप्रमाणें मानिलेले इश्माएली व हागारी लोक घेत आहेत ह्मणून, आणि ते माझ्या हद्दींतील सुंदर महालाचे धनी झाले आहेत ह्मणून मी रडतों. अरेरे, हाय हाय ! पवित्र मंदिरा-

१ या ईयोबाच्या कन्या होत्या, व रूपांत त्या अतिसुंदर होत्या; ईयोब अ. ४२ ओ. १४–१५ पाहा. २ ही नदी बाबेल देशांत आहे. ३ हागारीचें संतान.

करितां ह्मणजे देवाच्या घराकरितां मी रडतों; अरे अरीएला अरीएला, हाय हाय! कोणी खंडून घेणारा व उद्धरणारा आहे काय? अशी मी आरोळी करितों; मजवर अधिकार करणारांनीं माझ्या उद्धाराचा वेळ बंद केला आहे; माझा अधिकार चालविणारा कोणीच राहिला नाहीं. अरेरे, हाय हाय! दहा आज्ञांच्या पाट्या, कोश, आहारोनाच्या कपाळावरील फूल व त्याचा मुगुट, एफोद व त्याच्या खांद्यावरील स्मरणसूचक रत्नें, त्याच्या झग्याच्या कांठावरील घांटा व त्याचीं वस्त्रें[1] असे जे पदार्थ नाहींसे झाले आहेत, त्यांकरितां मी रडतों; माझ्या तंतुवाद्याचा हर्षाचा नाद पालटून शोकाचा नाद निघत आहे. अरेरे, हाय हाय! लेव्याचा उभें राहण्याचा मंचक व अंगण याकरितां, मेज व शुद्ध समई याकरितां, आणि उरपट, एफोद व त्यावरील मोलवान रत्नें यांकरितां मी रडतों; ज्या मेंढ्यांकडून व एडक्यांकडून माझ्या अघोर अपराधांचें प्रायश्चित्त होत असे, ते आतां कोठें आहेत? अरेरे, हाय हाय! याजकांतील सुंदर तरुणांकरितां[2] मी रडतों; सत्वशील मनुष्यांकरितां, लेव्यांच्या गायनाकरितां व स्तुतीकरितां, राजा व भविष्यवादि यांकरितां, माझे न्यायाधीश व अधिकारी यांकरितां मी शोक करितों; माझ्या वाटा नीट करणारे कोठें आहेत? अरेरे, हाय हाय. मी आपल्या खडकरूप आश्रयाकडे रडून याचना करितों; तोच माझ्या डोक्यावर मुगुट घालील[3], तोच आपल्या मंदिराला गौरवयुक्त करील; ईश्वर करो आणि माझें रडणें पालटून नृत्य होवो, मग मी तंतुवाद्यांवर गायन करीन; ईश्वर असें करो.

יהודה וישראל अहो येहूदाचे व इस्राएलाचे लोकहो! जाणा कीं, मी फारच खेदित आहें; माझ्या पापामुळें मला थरकांप सुटला आहे; जेव्हां मी रडणें ऐकतों, तेव्हां मीहि रडावें असें माझ्या मनीं येतें, ज्या समयीं मी हर्ष पाहातों, त्या समयीं माझ्या अंगाचे कांटे उभे राहातात. अरे पुत्रा, अरे भावा, अहो बहिणी, अगे आई आणि अहो माझे सर्व नातलग हो! तुह्मीं आपलीं कुटुंबें एकत्र करून रडा, आणि आपणांवर फांसण्यों[4] घ्या. अरे प्रिय मित्रा, अहो पुरुषांनो व स्त्रीयांनो, तुह्मीहि रडा,

१ आहारोनाच्या सर्व वस्त्रांचें वर्णन प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग २ रा टीका १ पाहा. २ इ. याजकपणाच्या फुलांकरितां. ३ इ. बांधील. ४ अनुवाद अ. १४ ओ. १ एथें लिहिल्याप्रमाणें फांसण्या घेणें ही पूर्वीं दुःख दर्शविण्याची खूण होती.

मी तर रडतांना थरथर कांपतों, कारण पवित्र मंदिराचा अगदींच नाश झाला, याचा आठव मला झाला ह्मणून माझें गायन व माझा हर्ष सरला आहे. हे येहूदा, ऊठ, आणि हे इस्राएला, तूंहि शोक कर; कारण देवाची मंडळी आणि शास्त्र व नीति शिकणारे सरले आहेत. माझें विशेषत्व सरत व उणें होत चाललें आहे, माझ्या मंडळ्या नाहींशा झाल्या व त्यांचा सत्यनाश झाला आहे. समयाप्रमाणें घडून येणाऱ्या गोष्टींवरून माझी बुद्धि सरत जाते, आणि मला गायनाचा, तंतुवाद्यांचा व नृत्याचा वीट येतो. विद्वानाचें शिक्षण देणारे विचार सरले; शत्रूनें त्यांतील निवडक लोकांस शेरडांप्रमाणें व रानगाढवांप्रमाणें वधिलें. देवाची कृपा सरली व त्याच्या दयेचा विसर पडला, तो मजशीं निष्ठुरासारिखा झाला आहे व अगदीं कडवटपणें वागतो. पूर्वजांची पुण्याई सरली, तिजकडून त्यांच्या बीजास व संतानांस कांहींच आश्रय सांपडत नाहीं, ते थरथर कांपतात. प्रतिष्ठित स्त्रियांचें पातिव्रत्य सरून त्यांस गर्व चढला; ज्या दिवशीं त्या परक्याच्या हातीं सांपडल्या, त्या दिवशीं त्यांची कत्तल उडाली. येहूदांचें शांतवन सरलें व त्याच्या मनीं निराशा उत्पन्न झाली, कारण तो बंदांत पडलेलाच आहे. माझ्या लोकांच्या लेंकरांस मारणारांवरील, लुटणारांवरील व खोटे आळ घेणारांवरील ईश्वरी न्याय सरला. शास्त्राची व त्यांतील आज्ञांची सत्यता सरली, कारण परक्या लोकांच्या गर्वामुळें आह्माकडून त्यांचा अभ्यास सुटला आहे. माझ्या लोकांच्या लेंकरांचें सुख सरलें, परंतु (त्यांचीं दुःखें सरलीं) नाहींत; त्यांची योग्यता, त्यांचें सत्व व त्यांच्या ज्ञान्यांचें ज्ञान सरलें, त्याजवर गंज चढला आहे. त्यांच्या आरोळीस दिव्य उत्तर मिळणें सरलें. त्यांस उत्तर देणारा व त्यांजवर दया करणारा कोणी नाहीं; संकटामुळें ते अगदीं म्लान झाले आहेत. खालीं इस्राएलामध्यें पवित्र मंदिरीं वास करणारा शेखीनै सरला, त्यानें (केरूबांवर) पाखर घालणें सोडिलें. **कद्दीशास** उत्तर देणें व **बारेखूस**

१ सर्व इस्राएल लोकांचें. २ शास्त्र व त्यांतील आज्ञा ईश्वरदत्त असल्याकारणें सत्यच आहेत; परंतु अलीकडे इस्राएलांतहि कित्येक शहाण्या लोकांस शास्त्राच्या सत्यतेचा संशय येऊं लागला आहे. ३ ईश्वरी साक्षात्कार. ४ कद्दीश आणि बारेखू हे प्रार्थनेंतील ईश्वरस्तुतीचे मुख्य भाग आहेत; त्यांजकडे सर्वांचें विशेष लक्ष असून त्यांचीं उत्तरें देण्यांत तत्पर असलें पाहिजे.

उत्तर देणें सरलें, प्रार्थनामंदिरें पायांतून तळसून काढलीं आहेत. खडकरूप आश्रय जो सैन्याचा परमेश्वर याचें व त्याच्या **याह, एलोहीम, एल** व **शद्दाय** या नामांचें स्मरण सरलें जात आहे. मजमधील भविष्यकथन सरलें व सर्व दृष्टांत बंद पडले आहेत; ऊरीम व थुम्मीमें यांचे गुण व ईश्वरी संयुक्त नामाचें गुह्यहि सरलें. शास्त्राभ्यासहि सरला, तो इतका कीं, ज्या वेळीं (तो अभ्यास) लेंकरांकडून पूर्ण व्हावा, तो होत नाहीं ह्मणून तीं तरट पांघरतात व त्यानें तीं अगदीं वेष्टिलेलीं आहेत. शाब्बाथाचें महत्त्व सरलें व त्याप्रमाणें सणांचेंहि, ह्मणून तुह्मी आपल्या अंथरुणावर अंधार करा व काळें वस्त्र अंथरा. प्रार्थना मंदिरीं नेमिलेल्या प्रार्थना करण्याच्या गायनाचा, मफतीरें वाचणाराचा व वक्तृत्वानें भाषण करणाऱ्या कवीचा मंजुल शब्दहि सरला. जो महापुरुष दावीदाचा पुत्र तो राज्य करीपर्यंत येहूदाच्या राज्याचें गौरव सरलें आहे; परंतु तो माझ्या लोकांस पुनः मुळांतून सजीव करील.

יתומים היינו परक्या देशांत आह्मी पोरके झालों आहों; यामुळें माझे डोळे नेहमीं अश्रू गाळितात. मी आपल्या विश्रांतीच्या नगरीं असतां, सर्व परगण्यांची राजकन्या, राष्ट्रांत थोर व पुष्कळ लेंकरांनीं तृप्त अशी होतें; परंतु आतां मी दास्यत्वांत पडलें आहें, माझीं दुःखें वाढतात, आणि येरूशालेमेकडे माझे डोळे आशेनें लागले आहेत. माझ्या सर्व प्रियकरांतून मजवर दया करणारा कोणीच नाहीं; माझ्या आप्तांनींहि मला अव्हेरिलें, माझें शांतवन करणारा कोणीच नाहीं; लेंकरें भाकर मागतात; परंतु पाहा, मी तर पीडलेली व वादळांत सांपडून एकटीच बसलें आहें. अनेक संकटें मजवर येतात, शत्रु व दुःखें माझ्या पाठीस लागतात; हाय हाय! माझ्या अपराधांनीं मला गांठलें आहे, यामुळें मी ओंगळ होऊन राहिलें आहें. माझ्या नांदणुकीच्या घराच्या नाशामुळें अश्रूनें माझे डोळे अंधारमय झाले आहेत; परमेश्वराच्या सामर्थ्याचें वर्णन कोण करूं शकतो? त्याची स्तुति असो, त्याचीच मी मुकाट्यानें अशा करीन. जरी आमच्या अंगीं सत्कर्में नाहींत, तरी तूं

१ प्रायश्चित्ताच्या दिवसाची प्रार्थना भाग २ टीका १ पाहा. २ शास्त्र वाचणें पुरें झाल्यावर पुनः कांहीं वाक्यें वाचून भविष्यकथनांतील जो भाग वाचितात तो.

आपली दया वाढीव, तुझ्या शत्रूंचा व वैऱ्यांचा निःपात कर; (कारण तूं ह्मटलें आहेस कीं), तुह्मी जर मजकडे फिराल, तर मीहि तसें करीन; पाहा, मी तुह्मांकडे एलीया भविष्यवाद्यास पाठवीन.

עיני עיני येरूशालेमेच्या नाशामुळें माझ्या डोळ्यांतून, माझ्या डोळ्यांतून पाणी वाहतें. माझ्या लोकांच्या कन्येच्या वधावरून मी रात्रंदिवस रडतों, आणि आकाशीं वासकरणारापुढें मी आपला जीव व आपलें रक्त ओतितों. माझीं सर्व गायनें पालटून शोक झाला आहे, माझा सतार व वीणा फुटला आहे; येहूदा व एफ्राईम यांच्या लेंकरांकरितां माझ्या पायांत बिडी पडली आहे. शत्रु मजवर हंसतात व सिंहाप्रमाणें दांत कडकडवितात, तोंडानें ते मजवर फुसकारतात व हातानें टाळ्या वाजवितात. अगे आई ! आतां (तूं आपल्या) लेंकरांकरितां, तरुणांकरितां वृद्धांकरितां व तान्ह्याबालांकरितां शोक, अक्रोश व विलाप कर. परमेश्वरानें आपली यज्ञवेदि अव्हेरिली आहे; त्यास त्यांच्या विश्रांतीच्या पवित्र स्थानाचा वीट आला आहे, त्यानें येरूशालेमेचीं गांवकुसें आपल्या धिक्कारणारांच्या हातीं सोंपलीं आहेत. ज्या आव महिन्याच्या नवमीस शत्रूनें पवित्र मंदिराचा व सीयोन या पवित्र नगरीचा नाश केला, त्या दिवसापासून आह्मां सर्वांचे हात शक्तिहीन झाले आहेत. हे खडकरूप आश्रया ! आपला राग व क्रोध सोड, ऊठ आणि आह्मांस तट असा हो, आणि सूर्याचा प्रकाश सातपट तेजस्वी कर[1].

הרגת ביום אפך तूं आपल्या क्रोधाच्या दिवशीं (आमच्या लोकांचा) वध केलास व त्यांची कत्तल उडविलीस; तुजला दया आलीच नाहीं. पूर्वीं आह्मी पवित्र राष्ट्र व देवदूतांच्या बरोबरीचे होतों; परंतु आतां आह्मी मेंढरांसारिखे वहकलों आहों, आणि तुझ्या आज्ञा उल्लंघिल्या आहेत. स्त्रीच्या प्रसूत वेळेसारिखे भंगामागून भंग आह्मांवर आले; जवळून जाणारे सर्व मजवर दांत कडकडवितात; ते तुझ्या वतनींहि शिरले आहेत. अनेक दुःखांनीं मला गांठिलें, आई लेंकरांवर आपटून मेली, तुझ्या कुरणांतल्या शेरडांचा शेष रात्रीं थंडींत उघडा पडत आहे. आमच्या सर्व शत्रूंनीं आमचा वध केला, आमच्या सर्व मनःप्रिय वस्तु

१ ही ह्मण यशाया अ. ३० ओ. २६ वरून घेतली आहे.

त्यांनीं घेतल्या, आणि आमच्या सर्व पापांमुळें त्यांनीं तुझ्या पवित्र स्थानाचा नाशहि केला. दुःखाचेच दिवस मजपुढें येतात, माझा सर्व हर्ष खेदकारक होतो, रात्रीं माझें मन भ्रमतें, तरी आतां तुझें मुखकमल पहाण्याची आवड मला झाली आहे. वादळांत सांपडलेली व पीडलेली अशा नामानें म्हटलेली खोल खांचेंतून ओरडत आहें; तर आतां तूं एलीया भविष्यवाद्यास पाठीव म्हणजे तुझ्या इष्ट बंदरीं आम्ही तुझी स्तुति करूं.

זאבי ערב अधाशी लांडगे व दवा धरून बसणारे सर्व अस्वल यांनीं माझी हर्षयुक्त नगरी ओसाड केली आहे, त्यांनीं मला तरवारीनें जिंकून पाडाव करून नेलें आहे; माझा न्याय कोणीच करीत नाहीं व माझा वाद कोणीच उचलीत नाहीं; पाहा, मी पारव्यासारिखी (सुंदर) असतां, कावळ्यासारिखी काळी पडलें आहें; कारण त्यानें माझ्या घराचा नाश केला आहे. माझें पवित्र मंदिर पाणकोळी व सायाळ यांचें वतन झालें आहे, ह्मणून रडण्यानें व शोकानें माझें डोकें जलमय झालें आहे; एफोदाबद्दल मूर्ति दृष्टीस पडतात, तर मी आश्रयाकरितां कोणाजवळ रडूं, शोक करूं व लोटांगण घालूं? कोश व होरेबांत मिळालेल्या पाट्या राखून ठेवण्याच्या मंदिरीं वधस्थंभाची पीडा मात्र दिसून येते[3], माझ्या पापामुळें कादेशांत मी रडलों व अश्रू गाळिलीं, (केनाआन देशाविषयीं) वाईट वर्तमान आणणारांच्या शब्दांवर भरंवसा ठेविल्यामुळें माझ्या पवित्र वसतिस्थानांतून (देवानें) मला हांकून लाविलें; ज्या रात्रीं मी तेथें रडलों, त्याच रात्रीं पिढोपिढीं रडण्याचा नियम चालत आला आहे; मी येहूदाच्या कन्येचा पक्ष धरून बोलतों, कारण आश्रय नाहींसा झाला आहे. परात्पर देवाचे पुत्र आश्चर्यकारक प्रकारें नीचावले आहेत; ते खंडणी भरूनहि सोडविले जाणार नाहींत, आशाप्रकारें विकले गेले आहेत; कारण सीयोनेच्या कन्येचें गौरव ओसरलें, तिच्या मंगलमंचकाचें वैभव गेलें, अनेक जातीचे लोक एकत्र होऊन

---

१ तुझ्या प्रिय येरुशालेम नगरीं. २ एफोद म्हणजे मुख्य याजकाचा उरपट. ३ कोणीं हें वाक्य "सकाळीं व संध्याकाळीं पिडाच दिसण्यांत येतें" असें वाचितात. ४ इ. वाणीवर. ५ इ. संध्याकाळची छाया ओसरली आहे.

परमेश्वराच्या राहुटींत राहणारांवर व जवळ जाणारांवर खोटे आळ घे-
तात. माझे सर्व दिवस दुःखांत जातात व संपतात, कारण मी बंदांत
पडलों आहें, त्यांतून मी निघूं शकत नाहीं; माझे स्वस्त असणारे शत्रु चढले
आहेत, त्यांनीं माझ्या लेंकरांस धरून नेलें व त्यांजवरील सर्व अलं-
कार हिरावून घेतले, आणि नेऊन आश्शुराच्या वाद करणाऱ्या राजास न-
जर केले. हे माझ्या पारव्या! तूं माझी व माझ्या वचनाची आशा कर;
कारण मी पुनः पूर्वीप्रमाणें आपला मंडप उभारीन, आणि तेथें मी आ-
पला राजा दावीद याचा दीपक सिद्ध करीन; तूं शुद्ध होऊन प्रतीक्षा
कर, ह्मणजे सुंदर मुखाची व मंजुळ शब्दाची जी मंडळी, तिजवर
दवा धरून येणाऱ्या पशूंचा मी निषेध करीन.

שומרון קול תתן शोमरोनें मोठ्यानें ओरडून ह्मणते, मला माझ्या
अपराधांनीं गांठलें आहे, आणि माझीं लेंकरें मजपासून परदेशीं गेलीं
आहेत; आणि आहोलीबाँ आरोळी करून ह्मणते, माझा वाडा जळाला,
आणि सीयोन ह्मणते, परमेश्वरानें मला सोडिलें आहे. (शोमरोन उ-
त्तर करून ह्मणते), अगे आहोलीबा! माझ्या दुःखासारिखें तुझें दुःख
आहे असें तूं समजूं नको; माझ्या भंगाशीं तुझ्या भंगाची तुळणा करि-
तेस काय? मी आहोलें (आपल्या सरळ) मार्गापासून वळलें व ताठर-
पणें फितूर केला, माझा दगा मजवर उठला व माझें बंड मजविरुद्ध
साक्ष देतें; हें माझें ऋण मला थोडक्याच दिवसांत फेडावें लागलें;
तिगलाथ पिलएसेरें यानें माझ्या कष्टांचें फल खाल्लें, त्यानें माझे अलंकार
लुटले व माझे मोलवान पदार्थ हिरावून नेले, आणि हाला व हाबोर
एथें मला कैद करून ठेविलें, अगे आहोलीबा! उगी राहा, मी रडतें
तसी तूं रडूं नको, मला दूर हांकून लाविलें आहे व माझे क्लेश पुरे असे
झाले आहेत, तुझीं वर्षें वाढलीं तशीं माझीं वर्षें वाढलीं नाहींत. आ-

१ प्रियकर इस्राएला. २ इस्राएलांमध्यें दुफळी झाल्यावर इस्राएलांची राजधानी.
३ हें नांव येरूशालेमेस व येहूदाच्या राज्यास दिल्हेलें आहे. ४ हे नांव शोमरोनास
व इस्राएलाच्या राज्यास दिलें आहे. ५ आश्शूराचा राजा; २ राजे अ. १६ ओ ७
पाहा. ६ इस्राएलाचें राज्य गेल्यावर १३३ वर्षांनीं येहूदाचें राज्य गेलें, इस्राए-
लांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालाअनुक्रम यांत ३२०५ आणि ३३३८
हीं वर्षें पाहा.

होलीवानें उत्तर केलें, मीहि तसेंच केलें व आहोलाप्रमाणें मीहि आपल्या तरुणपणाच्या भ्रताराशीं दगा केला; अगे आहोला! तूं उगी राहा; मला दुःखाची शिक्षा झाली आहे; तुला तर एकवेळ हांकून लाविलें, परंतु मला अनेक वेळा हांकून लाविलें; पाहा कासद्यांच्याच हातीं मी दोनवेळ पडलें, ज्या माझ्या मंदिरीं माझें वैभव होतें तें जळालें, नंतर पीडलेल्या पाडावाप्रमाणें मी बाबेलास गेलें; पुनः सीयोनेस परत येऊन मी आपल्या मंदिराचा पाया घातला, परंतु यावेळींहि कांहीं वेळ टिकलें नाहीं, इतक्यांत शत्रूनें मला नेलें, आणि बहुशः माझा नाश झाला आहे व माझा समुदाय सर्व देशीं विखरला आहे. हे सर्वांवर दया करणाऱ्या (दयासागरा!) त्यांच्या अपकर्षाची तुला दया येऊंदे, त्यांच्या ओसाडीकडे व त्यांच्या दीर्घ प्रवासाकडे तूं पाहा, त्यांची दरिद्रावस्था वाढावी ह्मणून तूं अतिशय संतप्त होऊं नको, त्यांचे अपराध व त्यांचा मूर्खपणा सदा तूं आठवूं नको, तूंच त्यांजवरील घाव बरे कर व त्यांच्या शोकाचें शांतवन कर; कारण तुजवरच त्यांची आशा व तृषा आहे; तूंच त्यांचे दिवस पूर्वीप्रमाणें नवे कर ह्मणजे "मग परमेश्वरानें मला सोडिलें" असें सीयोन ह्मणणार नाहीं.

קול יללה मी आक्रोश करून रडतों, आणि मोठा आकांत करून ओरडतों, यावरून सर्वांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहातात; माझें डोकें पाण्यानें कोण भरील! आणि माझे डोळे अश्रूंचे झरे असे कोण करील! आक्रोशाची वाणी चवाठ्यांत व रस्त्यांत कसी ओरडते! आणि घायाळ झालेले कसे कण्हतात! माझ्या लोकांच्या कन्येच्या ओरडण्याची वाणी दूर देशाहून ऐकूं येते; यामुळें माझ्यानें शांत रहावत नाहीं. आक्रोशाची वाणी व नाशाची वाणी सर्व प्रदेशीं ऐकूं येते, माझें नगर घायाळ झालेल्यांनीं व कबरेंत उतरणाऱ्या प्रेतांनीं भरलें ह्मणून प्रत्येक मनुष्यानें आपले हात कंबरेवर ठेविले आहेत असें मी पहातों, यावरून मीहि आपलें डोकें डुलवितों. आक्रोशाची वाणी काढून बाप व पुत्र कसे एकत्र रडतात! सर्वांचीं तोंडें कशीं पिकट झालीं! (याचें कारण असें कीं,) तरवारीनें आपली तृप्ति करून घेतली आहे, ती मानेवर येऊन पोंचली आहे.

१ येहोयाखीन राज्याच्या वेळीं एकवेळ २ राजे अ २४ ओ ११, आणि सिदकीया राजाच्या वेळीं एक वेळ. २ राजे अ. २५. २ ही म्हण इर्मेया अ. ३० ओ. ६ येथून घेतली आहे.

אלה אזכרה या (पुढील) गोष्टींचा जेव्हां मला आठव होतो तेव्हां मी आपणावर आपला जीव ओतितों; कारण लांडग्यांनीं न उलथलेल्या भाकरीसारिखें मला गिळलें; आणि केसाराच्या दिवसांत धर्मावेशामुळें राजाज्ञेनें मारले गेलेल्या दहा (ईश्वरभक्तांस) कांहीं उपाय साधला नाहीं. गव्हांच्या राशीची उपमा मिळालेल्या सुज्ञजनांच्या तोंडचें पुस्तक वाचून व लक्षांत घेऊन तो (केसार) त्या धर्मशास्त्रावर टीका करूं लागला, आणि निर्गम अध्याय २१ उघडून त्यांतील "जो मानसाला चोरून त्याला विकतो, किंवा हा त्याच्या हातांत सांपडतो, तर त्याला जिवें मारावें" या वाक्यावर त्यानें कुभांड रचिलें. त्या दुष्ट मूर्त्तिपूजकानें मनीं गर्व मानून आपल्या महालीं पायतनें भरायास आज्ञा केली, आणि शास्त्र व त्यांतील नियम व त्यांचें मर्म जाणणाऱ्या दाहा थोर सुज्ञ ग्रहस्थांस बोलाविलें. तो ह्मणाला "कोणी माणूस आपल्या भावांतला, ह्मणजे इस्राएलांच्या संतानांतला प्राणी चोरून बंद करितो किंवा त्याला विकितो" याचा न्याय तुह्मी सत्यतेनें करा, त्यांत कांहीं विपरीत करून खोटा न्याय सांगूं नका, परंतु जें सत्य तेंच प्रकाशांत आणा. त्यांनीं त्यास उत्तर केलें कीं, तो चोर मरो; तेव्हां तो ह्मणाला कीं, मी शिक्षा करावी ह्मणून ज्यांनीं आपल्या भावांस विकलें आणि इश्माएली काफल्याशीं त्याचा व्यापार केला, आणि पायतनांबद्दल त्यांस दिल्हें, ते तुमचे पूर्वजें आतां कोठें आहेत? तर आतां तुह्मी आपणावर तो ईश्वरी न्याय मान्य करा, कारण त्यांच्या दिवसांपासून तुह्मांसारिखे कोणी सांपडले नव्हते; जर ते आतां जीवंत असते, तर त्यांचा न्याय मी तुह्मांसमक्षच केला असता; परंतु तुह्मीच आतां आपल्या पूर्वजांची शिक्षा भोगा. (ते ह्मणाले,) आह्मांस तीन दिवसांचा अवकाश दे, इतक्यांत हा नियम आकाशांतून झाला आहे काय? हें आह्मांस कळेल; आणि जर आह्मी दोषी व अपराधी असलों, तर दयासागराचा निवाडा

१ क्रूर लोकांनीं. २ ही म्हण होशेया अ. ७ ओ. ८ एथून घेतली आहे; तिचा अर्थ असा आहे कीं, भुकेला मनुष्य भाकरी भाजतांना जशी ती अर्धकच्ची घेऊन खातो, तसें मला क्रूर लोकांनीं अधाशीपणें गिळलें आहे. ३ ही उपमा सुज्ञजनांस शेलोमोचें गीत अ. ७ ओ. ३ एथें दिल्ही आहे. ४ याकोबाचे दहा पुत्र ज्यांनीं योसेफास विकलें ते.

आह्मी मान्य करूं. यावरून ते सर्व मूर्छित झाले, त्यांस घाम सुटला व ते थरथर कांपूं लागले; आणि हा निवाडा त्यांच्या ईश्वराकडूनच आहे, हें जाणण्याकरितां एलीशाचा पुत्र रिब्बी इश्माएल मुख्य याजक यानें ईश्वरी नाम स्मरून त्यांच्या प्रभूकडे चढून जावें ह्मणून त्या सर्वांनीं आपली दृष्टि त्याजकडे लाविली. रिब्बी इश्माएलानें शुद्ध होऊन मोठ्या भक्तिभावानें ईश्वरी नामाचें स्मरण केलें, आणि सणाचीं वस्त्रें पांघरणाऱ्या एका दूतास त्यानें विचारिलें; तेव्हां तो ह्मणाला, अहो प्रिय, सात्विक व सुज्ञ गृहस्थ हो ! तुह्मी हें मान्य करा, कारण यांत तुह्मी सांपडले आहां, असें मी पडद्यामागून ऐकिलें आहे. रिब्बी इश्माएल उतरला, आणि हें ईश्वरी वचन त्यानें आपल्या मित्रांस कळविलें; तेव्हां त्या दुष्टानें इस्राएलांतील जे दोघे मुख्य, ह्मणजे एलीशाचा पुत्र रिब्बी इश्माएल मुख्य याजक आणि गमलीएलाचा पुत्र रब्बान शिमओन, जो इस्राएलांचा मुख्य अधिकारी यांस पहिल्यानें हिंमतीनें व धैर्यानें मारावें अशी आज्ञा केली. तेव्हां (रब्बान शिमओनानें) अर्ज केला, कीं आकाशांत वस्ति करणाराच्या सेवकाचें मरण मीं पाहूं नये, ह्मणून पहिल्यानें माझें डोकें उडविण्याची कृपा कर; यावरून त्या सर्पानें सोडत काढण्यास आज्ञा केली, आणि ती सोडत रब्बान शिमओनावर निघाली. त्या दुष्टानें लागलेंच बैल व पाडे यांच्या रक्ताप्रमाणें त्याचें रक्त पाडिलें, तेव्हां रिब्बी इश्माएल मोठ्यानें[1] व दुःखानें ओरडून ह्मणाला कीं, जी जीभ वक्तृत्वानें सुंदर भाषणें करीत असे ती कशी माति चाटूं लागली ! तो थरथर कांपून मोठ्या दुःखानें त्याजविषयीं रडला, तेव्हां त्या दुष्टाची कन्या त्याच्या रडण्याची वाणी ऐकून उभी राहिली, आणि त्याचे सुंदर स्वरूपावरून ती आपल्या मनीं लुब्ध झाली, आणि तिनें आपल्या बापास त्याचा जीव वांचविण्याकरितां विनंति केली. त्या दुष्टानें ही गोष्ट नाकारिली; मग पहिल्यानें त्याच्या तोंडावरील कातडें काढावें असें तिनें त्याजपाशीं विनंति केली; तेव्हां त्या वैऱ्यानें तसें करायास अवकाश लाविला नाहीं; यावरून रिब्बी इश्माएल मोठ्या दुःखाच्या वाणीनें आपल्या आत्म्याच्या घडणाराकडे ओरडला. आकाशांतील सेराफीम दूतहि मोठ्या दुःखानें ओरडून ह्मणाले, हे झग्याप्रमाणें प्रकाश

१ इ. करण्याच्या आवाजाप्रमाणें.

परिधान करणाऱ्या ! शास्त्र हेंच काय ? आणि त्याचें वेतन हेंच काय? हे थोर व भयंकर देवा ! तुझा शत्रु तुझ्या नामाविरुद्ध अपवाद करितो; तो तुझ्या शास्त्रांतील वचनांची निंदा व त्यांचा धिक्कार करितो. तेव्हां आकाशवाणी होऊन असें उत्तर आलें कीं, जर पुनः एक शब्द निघाला, तर मी पृथ्वी पालथी घालून ती सर्व जलमय करीन, आणि माझें पादासन अस्ताव्यस्त व शून्य करीन; तर अहो दोन हजार वर्षें राखून ठेविलेलें शास्त्र आचरणारेहो ! हा निवाडा मजकडून झाला आहे, तो तुह्मी मान्य करा. शास्त्रांतील नियम मोठ्या निष्ठेनें आचरणारे आणि बहुतकरून प्रार्थनामंदिरींच वास करणारे मारले गेले. डाळिंबाप्रमाणें त्यांच्या अंगीं पुण्याई भरली होती, ठिकाणोठिकाणीं ते शास्त्रीय विषयांवर व्याख्यानें देत असत, त्यांतील एक रिब्बी आकीबा जो अक्षरांवरील निरनिराळ्या चिन्हांचाहि अर्थ सांगत असे, त्यास आणायास त्या-दुष्टानें आज्ञा केली, आणि खवणीसारख्या टोंकांच्या शस्त्रानें त्याचें मास खवणिलें. मग त्यानें तेरादयोनाचा पुत्र रिब्बी हानानया यास त्याच्या एकांत अभ्यास करण्याच्या कोठडींतून आणायास आज्ञा केली, आणि जळून त्याची लवकर खाक होऊं नये ह्मणून द्राक्षवेलाच्या डाहळ्या त्याच्या अंगाभोंवत्या बांधिल्या, आणि भिजलेल्या लोंकरेचे थर त्याच्या हृदयावर ठेविले; तरी तो आणि त्याजबरोबर शास्त्राची एक प्रत अशीं लागलींच जळून भस्म झालीं. अहो सर्वभावें न त्यागलेल्या लोकांनो ! शोक करा; कारण नम्र लोक मारिले गेले, आणि त्यांचा रक्तपात झाला आहे; त्यांनीं ईश्वरी नामाकरितां आपले प्राणहि अर्पण केले; याप्रमाणेंच रिब्बी हुसपिथ जो तर्जुमा करणारा हा मारला गेला. रिब्बी एलआझार जो शम्मूवाचा पुत्र याच्या वधाची गोष्ट ऐकणारास थरकांप सुटो, त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालोत, आणि त्याचा सर्व हर्ष पालटून खेद होवो. मौज करणाऱ्या लोकांनीं (आपल्या मौजेकरितां) आमचा नाश व विघात केला आहे; पृथ्वीवरील सर्व राजांपेक्षां त्यांनीं आमचा अधिक पाठलाग केला आहे; आणि दामाचा पुत्र यहुदा यासारिखे आह्मांमधले त्यांनीं किती मारले आहेत! आह्मी शास्त्रांतील आज्ञा मोडाव्या ह्मणून त्यांनीं आह्मांवर फारच जबरी केली; त्याकरितां जें द्रव्य

१ टीका ३०. २ कोनोकोनीं.

व जी खंडणी आह्मी त्यांस देत होतों; ती त्यांनीं नाकारिली आणि इश-बाव जो लेखक यासारख्या शास्त्रांतील मधुर वचनाचें मनन करणाराचे प्राण घेण्यास त्यांनीं हट्ट धरिला. माझ्या शत्रूंनीं व पीडणारांनीं माझा मोड केला, माझ्या मोलवान पदार्थांनीं त्यांनीं आपलीं पोटें भरून घे-तलीं, आणि हाखीनायाचा पुत्र जो रिव्वी हानीना याच्या वधावरून त्यांनीं मला केवळ विष प्यावयास व कडू दवणा खावयास दिल्हा आहे. (हे देवा,) तूं ह्मटलें आहेस, कीं याकोबाचा घराणा अग्नि व योसेफाचा घराणा जाळ आहे; परंतु पाहा ! आतां त्यांचा अग्नि विझाला आहे; का-रण शत्रूंनीं शत्रुत्वानें मसलत करून त्या मारलेल्या दहा सात्विकांमध्यें बाबाचा पुत्र येहुदा यासहि त्यांनीं मारिलें. आशा नेमिलेल्या नाशाप्रमाणें मारले जाणारांचें कण्हणें पिढोपिढीं ऐकूं येतें; शत्रु त्यांस ह्मणतात कीं, अहो नायकांनो ! तुह्मी दूर व्हा, कारण तुमच्या अंगीं पालीसारिखी अशुद्धता आहे; तर आतां मला सहाय कोठून येईल ! परमेश्वर जो आ-काशाचा व पृथ्वीचा कर्त्ता, याकडूनच मला सहाय होईल.

אמרה ציון सीयोन ह्मणते, मी आपल्या अपराधांत सांपडलें, आणि माझीं लेंकरें परक्या देशांत निघून गेलीं आहेत; परंतु माझीं उ-ल्लंघनें जरी वाढलीं आहेत, आणि मी जाणून केलेले अपराध जरी बहुत झाले आहेत, तरी हे परमेश्वरा ! तुझी पूर्वींची दया कोठें आहे ?

परमेश्वर ह्मणतो, हे सीयोने, तूं माझें विश्रांतिस्थान होतीस, सर्व लोकांपेक्षां तुझे लोकांस माझा खासगी लोक असें मीं ह्मटलें होतें; परंतु तूं माझे निषेधास मान्य झाली नाहींस, आणि तूं माझें शास्त्र सोडलेंस, ह्मणून मीं आपला राग तुजवर ओतला आहे.

सीयोन ह्मणते, माझ्या आशेचा भंग झाला आहे, माझीं अनाथ झालेलीं लेंकरें, जीं थरथर कांपून ओरडतात, त्यांच्या ओरडण्याची वाणी ऐकून माझा प्रकाश अंधारमय झाला आहे; तरी कृपा करायास देव विसरला आहे काय ? क्रोधेंकरून त्यानें आपला कळवळा बंद केला आहे काय ?

परमेश्वर ह्मणतो, तूं आपलीं ओंगळ कर्में वाढविलीं आहेस, तूं अ-नेक वेळा अविश्वासानें वागलीस, ह्मणून तुझा नवरा जो तुझा उत्पन्न-कर्त्ता, यानें तुला धिक्कारिलें आहे, तुझ्या उदरांतून निघालेल्या दगाखो-

१ इ. तूं

रांनीं तुजशीं दगा केला आहे, आणि तुझ्याच लेंकरांतून तुझे मोडणारे व तुला ओसाड करणारे निघाले आहेत.

सीयोन ह्मणते पहिल्यानें मी कशाकरितां रडूं? माझ्या पवित्र मंदिराच्या नाशाकरितां काय? अथवा या भयंकर पाडावपणाकरितां काय? हे माझ्या पवित्र खडकरूप आश्रया! ज्या त्वां आमचा क्षय केला आहेस त्या तुजकडे आमच्या प्रार्थनेनें चढूं नये ह्मणून त्वां आपणास ढगांनीं झांकून घेतलें आहे काय?

परमेश्वर ह्मणतो, पाहा, तूं आपल्याच फांसांत गुंतली आहेस, तुझ्या अतिलोभामुळें तुझ्या पवित्र मंदिराचा नाश झाला आहे, तुझ्या पवित्र खडकरूप आश्रयानें तुझ्या तारुण्यांतील पापांची झडती घेतली आहे; कारण तूं आपल्या नवऱ्यावर फितून भ्रष्ट झाली आहेस.

सीयोन ह्मणते, मी काय उत्तर देऊं! आणि मी काय ह्मणूं! माझ्या बहुत अपराधांमुळें माझा हर्ष पालटून शोक झाला आहे, आणि माझ्या वस्तिस्थानाच्या नाशाकरितां मी मोठ्या खेदानें ओरडत आहें; पाहा, कुशलाच्या ठिकाणीं मला मोठें दुःख प्राप्त झालें आहे.

परमेश्वर ह्मणतो, तुझ्या आश्रय देणारानें तुजशीं दगा केला आहे, कारण तुझ्या शत्रूनें व तुझ्याच पाहारेकऱ्यानें एकत्र मसलत केली; या गोष्टी मी तुला सर्व भविष्यवाद्यांच्या भयंकर व उग्र वचनांकडून कळविल्याच होत्या.

सीयोन ह्मणते, माझ्या अपराधांमुळें मला हाय हाय असो! कारण खरोखर व निश्चय यामुळेंच माझ्या राजवाड्याचा नाश झाला; परंतु जरी मीं उल्लंघनें केलीं, आणि माझे अपराध वाढले, तरी परमेश्वर सर्वकाळ मला अव्हेरील काय?

परमेश्वर ह्मणतो, तूं आपल्या पाडावपणांत शांतवन पाव, जरी तुझ्या पापांमुळें मी तुझ्या वस्तिस्थानाचा नाश केला आहे, तरी तुझ्या कल्याणाकरितां मी तुझी आठवण करीन, आणि तुझ्या पाडावांस परत आणीन; कारण तुझ्या परिणामाविषयीं आशा आहे.

לשכינה עלתה शेखीना वर निघून गेला ह्मणून शोक फार वाढला आहे; अरेरे, मला हाय हाय!

१ इ. विख्यात.

शास्त्र जळालें ह्मणून तुह्मी खेदानें शोक करा; अरेरे मला हाय हाय!

प्रार्थनामंदिरांकरितां आणि विचारवंत गृहस्थांकरितांहि; अरेरे, मला हाय हाय!

तरुणांच्या वधाकरितां आणि सात्विकांच्या कत्तलीकरितांहि; अरेरे, हाय हाय!

पवित्र मंदिरांच्या नाशाकरितां तुह्मी कठोर शोक करा; अरेरे, मला हाय हाय!

गर्भार आणि स्तन पाजणाऱ्या बाया, ज्यांचे जीव भुकेनें व तान्हेनें व्याकुळ झाले आहेत त्यांकरितां; अरेरे, मला हाय हाय!

तान्हीं लेंकरें, ज्यांचे प्राण पाण्याकरितां शोषले आहेत त्यांकरितां; अरेरे, मला हाय हाय!

शाळेंत जाणाऱ्या अर्भकांच्या भयंकर नाशाकरितां; अरेरे, मला हाय हाय!

אללי לי ללי माझ्या दुराचारामुळें हाय हाय, मला हाय हाय! माझ्या बालकांच्या पाडावपणामुळें हाय हाय, मला हाय हाय! माझें आयुष्य दुःखांतच कसें संपतें! सर्व नालायक मनुष्यें मजशीं वादच करितात, मी चाकरासारिखा होऊन ते मजवर अधिकार चालवितात, माझा धनी कोण, हें मला कळत नाहीं; एक त्रास देतो, दुसरा पीडा करितो, आणि तिसरा हटकून छळतो; अगे माझ्या आई! तूं मला कलहाचा पुरुष व विवादाचा पुरुष असा प्रसवली आहेस ह्मणून मला हाय हाय! मी रात्रंदिवस रडत बसतों, कारण माझ्या भंगाचा शेवट होणें तो लांबविला आहे; मी आईच्या उदरीं असतांच कां मेलों नाहीं! माझी आईच माझी कबर कां झाली नाहीं! कारण जो कोणी इस्त्री या नामानें ह्मटला जातो, त्यास सर्व मनुष्यांचा धिक्कार सोसावा लागतो; मजवरील घाव वाढूं लागले आहेत, माझा मोड झाला ह्मणून मला हाय हाय! मजवर वार करणारानें मला पाडाव करूनहि नेलें आहे, त्यानें माझे मार्ग दगडानें आडविले आहेत; माझा दिवा अकस्मात विझाला, दिवस असतांहि माझा सूर्य अंधारमय झाला; इस्राएलांचें वैभव गेलें, त्यांस रूप नाहीं व शोभा नाहीं; माझ्या सूर्याचें तेज दिपलें, माझा प्र-

काश तेजरहित झाला; मी मेशेखांत प्रवास करितों, व केदाराच्या डे-ऱ्यांजवळ वास करितों ह्मणून मला हाय हाय ! माझें वैभव लवकर सु-कणाऱ्या गचिवरील गवतासारिखें झालें आहे; मळाप्रमाणें मी उडविला गेलों, सर्व प्राण्यांपुढें मी खतासारिखा झालों आहें; शत्रु माझ्या पाठीस लागून (आपल्या सोबत्यांस) हाक मारून ह्मणतात, पीक तयार आहे ह्मणून इळा घाला; मी वगळलेल्या उन्हाळ्यांतल्या फळाप्रमाणें व हंगा-मांतल्या द्राक्षाप्रमाणें झालों आहें ह्मणून मला हाय हाय !

הנותן בים דרך जो समुद्रांत मार्ग करणारा आणि अगाध जलांत वाटा पाडणारा, तोच आमच्या तारणाकरितां त्वरा करील, आणि तोच आमचा पक्ष धरून आमचा वाद चालवील; तोच आमच्या पूर्व स्थितीपेक्षां आमची उत्तर स्थिति चांगली करील. हे परमेश्वरा ! आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं; जसें लिहिलें आहे, कीं हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वीप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

עד אנה सीयोनेंत शोक व येरूशालेमेंत विलाप कोठपर्यंत चालेल? हे परमेश्वरा ! फीर, सीयोनेवर दया कर, आणि येरूशालेमेचीं गांव-कुसें बांध; जसें लिहिलें आहे, कीं तूं उठून सीयोनेवर दया करशील, कां तर तिजवर कृपा करण्याची वेळ झाली आहे; ह्मणजे ह्मटल्याप्रमाणें परमेश्वराचे उद्धरलेले उत्सवानें सीयोनेस परत येतील, आणि त्यांच्या माथ्यांवर अक्षय हर्ष होईल, ते आनंद व हर्ष पावतील, आणि शोक व कण्हणें पळून जातील.

यानंतर קדיש דהוא עתיד ह्मणून शास्त्र काढितांना हें पुढील ह्मणतात.

על היכלי मी आपल्या मंदिराकरितां, आणि विटाळलेल्या सी-योन नगराच्या सुंदरपणाकरितां रात्रंदिवस रडत आहें. सुंदर देश व सुंदर येरुशालेम यांचा दोन वेळ नाश झाला ह्मणून, आणि त्यांतील लोक पाडावपणांत गेले ह्मणून मी नेहमीं रडत आहें. माझ्या सुंदर मंदिराचा शत्रूनें नाश करून टाकिला आहे, आणि नेबायोथ व शम्मा यांच्या हातीं

१ मेशेख हा याफेताचा पुत्र व केदार हा इश्माएलाचा पुत्र होता, या दोघांचीं संतानें फार क्रूर व रानटी होतीं. २ नेबायोथ हा इश्माएलाचा पुत्र व शम्मा हा एसावाचा नातू होता.

मला कैद करून ठेविलें आहे ह्मणून मी शोकाच्या वाणीनें नेहमीं रडत आहें. हे शास्त्रा, तुझें सुंदरपण विटाळलें गेलें ह्मणून शोक कर; तुझा नाश झाल्या दिवसापासून तुझा मुगुट पडला आहे; तर तूं आहोलीबा व आहोला यासाठीं विलाप कर. अहो माझे लोकहो ! धैर्य धरा; लवकरच मी तुमचें मंदिर बांधीन; सूड घेण्याचीं वस्त्रें पांघरून मी तुह्मांस तुमच्या पाडावपणांतून परत आणीन; आणि पूर्वीप्रमाणें मी आपल्या मंदिरीं वास करीन; कारण सीयोनेंतून शास्त्र व स्तुति हीं निघतील.

ספרי והלילי हे येकूथीऐल[3]च्या शास्त्रा ! आरीऐला[4]च्या पाडावपणाकरितां, आणि जे एदोम व इश्माएल यांमध्यें मोठ्या संकटानें प्रवास करीत आहेत, त्यांकरितां शोक व विलाप कर, आणि तरट पांघरून सुंभाचा कंबरबंध बांध; पवित्र देवाचे लोक यांच्या वधाकरितां तूं रड; कारण तरवारीनें इस्राएलाचे शेष खाऊन टाकिले आहेत. हे पवित्र शास्त्रा ! सर्व देशांमध्यें मुख्य असा जो इस्राएलाचा देश, त्याकरितां शोक व विलाप कर; पुष्कळ अपराधांमुळें तो परस्वाधीन झाला आहे; पवित्र डोंगराकरितां व हैरएलांच्या नाशाकरितां तूं रड. हे पूर्ण शास्त्रा ! पवित्र मंदिरांत परक्यांनीं येऊन रागानें व क्रोधानें अग्नि लाविला ह्मणून शोक व विलाप कर आणि अश्रु गाळून व हृदय फोडून याजविषयीं रड.

קומי וספרי תורה हे शास्त्रा ! ऊठ आणि शोक कर; या आव महिन्याच्या नवव्या तारखेस संकटाच्या, त्रास होण्याच्या, व क्रोधाच्या दिवसाची, आणि ज्या दिवशीं (ईश्वराचा) राग मजवर चेतला, आणि मंदिराचा व त्यांतील आंगणाचा नाश झाला त्याची आठवण करून विलाप कर; मोठ्यानें व खेदानें ओरड, कारण शास्त्राचा असाच नियम आहे. तूं आपल्या मनीं अत्यंत दुःखानें प्रश्न कर, कीं शेखीनाचें राहण्याचें ठिकाण आणि लेव्यांचीं घरें व त्यांचीं मंचकें कोठें आहेत ? सत्यशील मनुष्यें कोठें आहेत ? विश्वासू नगरीचें वैभव कोठें गेलें ? पहिल्यानें मागणी केलेली कशी वेश्या झाली ? यावरून प्रसूत होणाऱ्या स्त्रीच्या वेदना सोसणाऱ्या मनाप्रमाणें तुझें मन मोठ्या खेदानें

---

१ येरुशालेम किंवा येहूदाचें राज्य, व शोमरोन किंवा इस्राएलांचें राज्य. २ मोठ्या. ३ येरुशालेमेच्या. ४ येरुशालेमेच्या.

ओरडो. तुझे पाठशाळेचें अध्यक्ष कोठें आहेत? आणि तुझी सनहेद्रीनें सभा कोठें आहे? तुझ्या नीतीच्या मार्गानें वर्तून तुझ्या गौरवाचें तेज प्रकाशित करणारे कोठें आहेत? तुझ्यांतील गुह्य गोष्टी विचारणारांस उत्तरें सिद्ध करून ठेवणारे कोठें आहेत? तुझ्या रीतिभातींचे शोध करणारे हजारों हजार शत्रूच्या हातीं बंदांत पडले आहेत. अर्पणें वाहणारे कोठें आहेत? तेल काढणारें कोठें आहेत? होमांचे तुकडे रचणारे आणि दर्शनीय भाकरींचें गुह्य जाणणारे कोठें आहेत? हुजऱ्यांच्या सरदारानें येऊन आईबाप व लेंकरें यांस एकदांच मारिलें; आणि सरदारांनीं बांधलेले दरवाजे शोक व विलाप करीत आहेत; कारण. ईश्वरानेंच आपली तरवार बोलाविली आहे, आणि आपले तीर सोडले आहेत.

במקום אשרי העם हे लोक धन्य असें ह्मणावें, तर सोनें[२] कसें निस्तेज झालें? परमेश्वराला थोर माना असें आमच्या समुदायानें ह्मणावें, तर आमच्याच डोक्यावरील मुगुट पडला आहे. तो मुगुट आह्मीं घालावा तर आह्मास नागाचें विष व कडू पदार्थ चोखावे लागले आहेत. (शास्त्राच्या प्रतीवर) सुंदर रुमाल घालावा तर पडदा सुद्धां नाहींसा झाला आहे. आकाशानें हर्ष करावा असें ह्मणावें तर आह्मास दुप्पट शोक करावा लागला आहे. त्यांचा प्रकाश तेजस्वी असावा परंतु त्यांस गोणताटानेंच झांकून टाकिलें आहे.

במקום ישמחו השמים आकाशानें हर्ष करावा असें ह्मणावें तर अहो आकाशांनो! तुह्मी याविषयीं विस्मित व्हा, असें ह्मणावें लागलें आहे. पृथ्वीनेंहि हर्ष करावा असें ह्मणावें, तर विघ्नेंच येतात, ह्मणून माझें मन खेदित झालें आहे. सीयोन डोंगरानें हर्ष करावा असें ह्मणावें, तर माझ्या बंडखोर विचारामुळें माझे हात अशक्त होऊन गळून पडले आहेत. येहूदाच्या कन्यांनीं हर्षावें असें ह्मणावें, तर मीच आज शोक व विलाप करीत आहें. (ईश्वर) सर्वांपेक्षां थोर मानिला जावो असें ह्मणावें, तर मीच आपल्या डोईवरील केंस उपटितों, आणि माझें रडणें बंद होत नाहीं. तो पवित्र मानिला जावो असें ह्मणावें; तर

---

१ टीका. ३१ २ ही सोन्याची उपमा इस्राएलांस दिली आहे; ती विलापाचें पुस्तक अ. ४ ओ. १ एथून घेतली आहे.

पवित्र वस्तु व पवित्र मंदिर यांच्या नाशामुळें मलाच नवीन शोक करावा लागतो. जें देवानें उत्पन्न केलें आहे त्या जगभर मी यादिवशीं वादळांतून ओरडतों. आणि भयंकर देवाच्या मंदिराचा नाश, आणि याजकांचा व भविष्यवाद्यांचा हुद्दा रद्द होणें, या गोष्टी त्याच्या व त्याच्या भिणारांच्या इच्छेविरुद्ध झाल्या ह्मणून शास्त्र उदास व शून्य होऊन बसलें आहे. आपले लोक इस्राएलांचें घराणें यांच्या इच्छेविरुद्ध अरे आरीएला, हाय हाय अशी अरोळी तें आज करितें. आमच्या नेमशास्त्राच्या कोशावरून शेखीना निघून वर गेला ह्मणून आह्मास लज्जा प्राप्त होते. आणि आह्मी आपल्या हद्दींत जाऊं तोंपर्यंत हर्ष करण्याबद्दल आह्मी दुःखाचे उसासे टाकीत आहों. (तर हे देवा!) तूं आपला राज्याधिकार प्रगट करून आह्मास दाखीव.

यानंतर शास्त्रांतून अनुवाद अ. ४ ओ. २९ पासून ओ. ४० पर्यंत वाचायास तीन मनुष्यें स्वतां उठून जातात; तिसरा मनुष्य शेवटपर्यंत वाचून קדיש לעילא वाचितो, आणि पुढील व मागील धन्यवाद करून हाफतारा ह्मणजे भविष्यकथनांतील भाग इर्मेया अ. ८ ओ. १३ पासून अ. ९ ओ.२४ पर्यंत वाचितो; मागील धन्यवाद तो מגן דוד एथपर्यंत मात्र वाचितो. मग हाज्जान אשרי व दुसरें वाक्य सोडून ובא לציון व קדיש תתקבל वाचून शास्त्र ठेवायास नेतो; आणि तें नेतांना יהללו बद्दल על נהרות בבל गीत १३७ म्हणतो. मग इर्मेयाचा विलाप व ईयोब हीं पुस्तकें वाचितात; आणि त्या मागून בית יעקב इत्यादि नित्याप्रमाणें वाचून प्रार्थना पूर्ण करितात. या दिवशीं कोणताहि व्यवहार करूं नये; केल्यास तो सफल होत नाहीं; आणि दोनप्रहरपर्यंत पशू किंवा पक्षी कापूं नये व जेवणाची तयारी करायास लागूं नये अशी चाल आहे.

तिसऱ्या प्रहरची प्रार्थना.

ही प्रार्थना करतेवेळीं धन्यवाद करून सीसीथ पांघरतात व तेंफीलीन बांधितात. मग हाज्जान नित्याच्या तिसऱ्या प्रहरच्या प्रार्थनेप्रमाणें למנצח על הגיתית इत्यादि קדיש לעילא पर्यंत वाचितो; मग संक्षेपांत ברוך המקום व יהי יי इत्यादि ह्मणून शास्त्र काढितो. त्यांतून इतर उपासांप्रमाणें ויחל משה हा भाग तीन मनुष्यें वाचितात, आणि तिसऱ्या मनुष्यानें तें वाचन संपविल्यावर तो पुढील व मागील धन्यवाद करून हाफतारा ह्मणजे भविष्यकथनांतील भाग होशेया अ. १४ ओ. २–१० आणि मीखा अ. ७ ओ. १८–२० वाचितो; परंतु मागील धन्यवाद–מגן דוד पर्यंत मात्र करितो. मग יהללו ह्मणून शास्त्र परत नेऊन ठेवितात; आणि קדיש לעילא ह्मणून नित्याच्याप्रमाणें ארני שפתי ही प्रार्थना हळू व पुनः मोठ्यानें करितात, आणि तिजमध्यें उपोषणाकारणें עננו אבינו हा भाग, आणि תשכון בתוך ירושלם या भागाच्या शेवटच्या धन्यवादा अगोदर हें पुढील ह्मणावें लागतें.

" נחם " हे परमेश्वरा आमच्या देवा, सीयोनेकरितां शोक करणारांचें,

आणि येरुशालेमेकरितां शोक करणारांचें, आणि त्या नाश पावलेल्या, धिक्कारलेल्या व ओस पडलेल्या नगरीचें शांतवन कर. ती आतां लेंकरांवांचून बसली आहे; ज्या वांझेला लेंकरें झालीं नाहींत, त्या स्त्रीसारिखी ती बोडकी होऊन बसली आहे. गर्विष्ठांनीं तिला गिळलें आहे; आणि मूर्त्तिपुजकांनीं तिचें वतन घेतलें आहे. त्यांनीं तुझ्या इस्राएल लोकांस तरवारी पुढें टाकिलें आहे; आणि परात्पराच्या यथार्थ (भक्तास) हट्टानें वधिलें आहे. यास्तव सीयोन खेदानें रडते, आणि येरुशालेम मोठी वाणी काढून ह्मणते कीं, त्यांच्या पडलेल्या मुडद्यांवरून माझें मन धगधगतें, आणि त्यांच्या वधलेल्यावरून माझें अंतरयाम, माझें अंतरयाम कळकळतें. कारण हे परमेश्वरा, तूं तिला अग्नीनें जाळिलेंस; आणि तूं तिला पुनः अग्नीनें बांधिशील. जसें लिहिलें आहे, कीं परमेश्वर ह्मणतो, मी तिजभोंवता अग्नीचा कोट असत जाईन; आणि तिजमध्यें गौरव असा होईन.

याप्रमाणें ארני שפתי वाचल्यानंतर हीं पुढील गीतें व वाक्यें ह्मणतात.

נחמו נחמו עמי माझ्या लोकांचें शांतवन करा, शांतवन करा[1], असें कापराचा गेंद[2] ह्मणतो; शास्त्रांत जें सर्व लिहिलेलें सांपडतें, त्याप्रमाणें त्यांचें शांतवन व्हावें आणि सीयोनेकरितां शोक करणारांस राखेच्या ठिकाणीं शोभा प्राप्त व्हावी (ह्मणून तसें करा). माझ्या लोकांच्या कन्येच्या पडलेल्या मुडद्यावरून, देवडीचा नाश झाल्यावरून व माझें मंदीर, ज्यास मी आपल्या नामानें ह्मटलें होतें, आणि ज्यास मी आपलें पादासन असें नांव दिल्हें होतें, तें ओसाड पडल्यावरून माझें मन धगधगतें; कारण एफा व एफेर[3] यांच्या संतानानें त्यांचा नाश करून ढीग करून ठेविले आहेत. सीयोनेच्या मनाशीं शांतवनाच्या गोष्टी करा, आणि तिनें आपणावरून आपल्या पाडावपणाचें वस्त्र काढून टाकावें असें तिला हाक मारून सांगा; कारण जेव्हां ती पश्चात्ताप करील, तेव्हां ईश्वर पुनः तिचें मंदीर विटाळूं देणार नाहीं; आणि परका लोक त्या सुंदर व मनोरम वतनावर अधिकार करणार नाहीं. (हे देवा,) या

१ यशाया अ. ४० ओ. १. २ ही उपमा शेलोमोचें गीत अ. १. ओ. १४ एथें ईश्वरास दिल्ही आहे. ३ आब्राहामाची बायको केटूरा इजपासून जन्मलेला मिदयान याचे हे पुत्र होते.

शोक करणाऱ्या लोकांचें शांतवन कर; जें जोकड ते वाहतात तें हलकें कर, त्यांस प्राप्त झालेली लज्जा दूर कर; त्यांजवरील भय दूर करण्याकरितां दयेचा दूत पाठीव; नाशापासून तूं आपले लोकांस सोडीव; आणि त्यांची पूर्ण खंडणी पोंचली आहे असें ह्मण.

נחמו נחמו עמי माझ्या लोकांचें शांतवन करा, शांतवन करा, असें कापराचा गेंद ह्मणतो; शास्त्रांत जें सर्व लिहिलेलें सांपडतें, त्याप्रमाणें त्यांचें शांतवन व्हावें व सीयोनेकरितां शोक करणारांस राखेच्या ठिकाणीं शोभा प्राप्त व्हावी (ह्मणून तसें करा). मी राष्ट्रांकरितां, व सर्व पृथ्वीवर वास करणाऱ्यांकरितां आणि वतनाचा वांटा ह्मटलेल्या लोकांस[1] एलाम, एबाल, एफा व एफेर यांच्या देशांतून सीयोन डोंगराकडे परत आणण्याकरितां, आणि शोकाच्या ठिकाणीं त्यांच्या डोक्यावर त्यांस आनंदाचें तेल प्राप्त व्हावें ह्मणून मी झेंडा उभारीन. मूर्च्छित पडलेल्यांच्या समुदायास मी त्यांच्या पवित्र मंदिराकडे परतवीन, मी त्यांच्या शोकाचें शांतवन करीन, मग ते नृत्यानें हर्ष करितील. मी त्यांचा शोक पालटून आनंद करीन, आणि त्यांच्या दुःखांत मी त्यांस हर्षित करीन, तेव्हां त्यांचे शत्रु व पिडणारे आपणांस लज्जेनें व अपमानानें झांकून घेतील. मी येरूशालेम बांधीन, आणि तिच्या सभोंवतें अग्नीचा कोट आणि तिच्या वस्तीच्या घरांस गौरव असें होईन; तेव्हां ते तिच्या पुष्कळ कल्याणावरून ह्मणतील कीं, परमेश्वरानें सीयोनेचें शांतवन केलें आहे, तिच्या सर्व ओसाड्यांचें शांतवन केलें आहे; तोच त्याचें मधूर वचनाचें वतन पावलेल्या लोकांस तिजकडे परतवून तिजमध्यें सर्वकाळ स्थापन करील.

शांतवनाचीं ईश्वरी वचनें.

נחמו נחמו עמי माझ्या लोकांचें शांतवन करा, शांतवन करा असें तुमचा देव ह्मणतो. येरूशालेमेच्या मनाशीं समाधानाच्या गोष्टी करा आणि तिला हाक मारून सांगा कीं, ती आपल्या सैन्यानें पुनः भरेल, तुझें युद्ध करणें समाप्त झालें आहे, तुझ्या अन्यायाची क्षमा झाली आहे, आणि त्वां आपल्या सर्व पापांसाठीं परमेश्वराच्या हातून दुप्पट घेतलें आहे. जो तुझें शांत्वन करितो तो मी, मीच आहें; तूं अशी कशी

१ इ. वरें करण्याकरितां. २ इस्राएलास.

कीं, मनुष्य जो मरतो व मनुष्याचा पुत्र जो गवतासारिखा होतो त्याजला तूं भितेस. तर परमेश्वर सीयोनेचें शांतवन करील, आणि तिच्या सर्व ओसाड्यांचें शांतवन करील; आणि तिचें रान एदेनासारिखें व तिचें जंगल परमेश्वराच्या बागासारिखें करील; त्यामध्यें आनंद व हर्ष, उपकार मानणें व गायनाचा शब्द हीं होतील. अहो आकाशांनो! उत्सव करा; अगे पृथ्वी! तूं उल्हास कर; अहो पर्वतांनो! गायन करीत सुटा; कां कीं, परमेश्वरानें आपल्या लोकांचें शांतवन केलें आहे, आपल्या पिडलेल्यांवर दया केली आहे. जे तुह्मी येरूशालेमेवर प्रीति ठेवितां, ते सर्व तिजसंगतीं हर्ष व उल्हास करा, जे तुह्मी तिजविषयीं शोककरितां, ते सर्व तिजशीं हर्षेंकरून आनंद करा. यासाठीं कीं, तुह्मी तिच्या शांतवनाचें स्तन पिऊन तृप्त व्हावें, आणि तिच्या गौरवाची विपुलता चोखून संतुष्ट व्हावें. जशी कोणेकाची आई त्याचें शांतवन करीती, तसा मी तुमचें शांतवन करीन; आणि येरूशालेमेंत तुह्मी शांतवन पावाल. तुझे पाहरेकरी आपला शब्द उंचावतील, शब्दानें एकदांच उत्सव करितील, कारण परमेश्वर सीयोनेला यथास्थित करील, तेव्हां ते प्रत्यक्ष दृष्टीनें पाहतील. येरूशालेमेच्या ओसाड स्थलांनो! एकदांच उत्सव करीत सुटा; कां तर परमेश्वरानें आपल्या लोकांचें शांतवन केलें आहे, येरूशालेम त्यानें खंडून घेतली आहे. मग परमेश्वरानें उद्धरलेले उत्सवानें सीयोनेस परत येतील, आणि त्यांच्या डोक्यावर सर्वकाळ हर्ष होईल, ते आनंद व हर्ष पावतील आणि शोक व कण्हणें पळून जातील. तुझा सूर्य पुनः मावळणार नाहीं व तुझ्या चंद्राचा क्षय होणार नाहीं; कारण कीं, परमेश्वर तुझी सर्वकाळची प्रभा होईल, आणि तुझ्या शोकाचे दिवस पूर्ण होतील. तर तुह्मी घाईनें निघणार नाहीं, आणि पळ काढित चालणार नाहीं; कारण कीं, परमेश्वर तुह्मापुढें चालेल, आणि इस्राएलाचा देव तुमच्यामागें संभाळील. तुझे सर्व लोक न्यायी होतील; आणि माझा महिमा व्हावा ह्मणून जसे माझ्या लावण्याचे रोप, माझ्या हाताचें कर्म तसे ते सर्वकाळ भूमीचें वतन भोगतील. जो लहान तो हजार होईल, आणि जो धाकटा तो मोठें राष्ट्र होईल; हें समयीं लवकर घडे असें मी परमेश्वर करीन. आणि असें होईल कीं, सीयोनांत जो वांचलेला व येरूशालेमांत जो उरलेला

त्याला पवित्र ह्मणतील; प्रत्येक जो येरूशालेमांतल्या जीवंतांमध्यें लिहिलेला आहे तो. गळते हात बळकट करा, लटपटीत गुडघे दृढ करा, जे घाबऱ्या हृदयाचे त्यांस ह्मणा, धैर्यवान असा, भिऊं नका, पाहा, तुमचा देव सूड उगवीत येईल, देव फेड करीत येईल, तोच येऊन तुह्मांला तारील. मग तुह्मी हर्षानें निघाल, आणि तुमचें चालविणें कुशलानें होईल; तुह्मापुढें पर्वत व डोंगर उत्सव करीत सुटतील, आणि सर्व वनांतील वृक्ष टाळ्या वाजवितील. परमेश्वराच्या प्रसन्नतेचें वर्ष व आमच्या देवाचा सूड घेण्याचा दिवस गाजवून सांगायाला (त्यानें मला पाठविलें आहे.) बंदिवानांस बाहेर जा, जे अंधारांत आहेत त्यांस उघड दृष्टी पडा असें ह्मणायास (मला पाठविलें आहे). ते मार्गावर चालतील व सर्व उंचवट्यांवर त्यांची चरण होईल. सीयोनांतल्या शोक करणारांस राखेच्या ठिकाणीं शोभा, शोकाच्या ठिकाणीं आनंदाचें तेल, खिन्न आत्म्याच्या ठिकाणीं प्रशंसेचें वस्त्र नेमून द्यावयाला; आणि त्याचा महिमा व्हावा ह्मणून त्यांस न्यायाचे वृक्ष परमेश्वराचें लावणें असें ह्मटलें जावें (ह्मणून त्यानें मला पाठविलें आहे). सीयोन न्यायेंकरून उद्धरेल; नीतीकरून तिचे परत आलेले उद्धतील. हे परमेश्वरा, प्रसन्नतेच्या वेळेस तुजकडे माझी प्रार्थना आहे, हे देवा, तूं आपल्या परम कृपेनें, आपल्या उद्धारक सत्यतेनें मला उत्तर दे. परमेश्वराविषयीं माझा जीव उल्हासेल, त्याच्या तारणामुळें संतोष पावेल. म्यां तुझ्या दयेवर भाव ठेविला आहे, माझें हृदय तुझ्या तारणाविषयीं उल्हासेल; परमेश्वरानें मजवर उपकार केले आहेत, ह्मणून मी त्याला गाईन. हे प्रभू, ऐक; हे प्रभू, क्षमा कर; हे प्रभू, कान देऊन कार्य कर, उशीर करूं नको; हे माझ्या देवा, तूं आपणाकरितां असें कर; कां कीं, तुझ्या नगरास, आणि तुझ्या लोकांस तुझें नाम ठेविलें आहे. हे परमेश्वरा, आह्मास तुजकडे फिरीव ह्मणजे आह्मी फिरूं; पूर्वींप्रमाणें आमचे दिवस नवे कर.

यानंतर קדיש תתקבל, שיר המעלות בשוב יי, קדיש יהא שלמא व עלינו לשבח वाचून ही तिसऱ्याप्रहरची प्रार्थना पूर्ण करितात.

उपोषणांचा दिवस समाप्त झाल्यावर संध्याकाळची प्रार्थना ही नित्याप्रमाणें करून चंद्रावरून करायाचा धन्यवाद तो करितात.

תם ונשלם שבח לאל בורא עולם

पृथ्वी उत्पन्न कर्त्या देवाची स्तुति परिपूर्ण व अखंडित असो.

टीका.

टीका १.

भविष्यकथनाचा खोरा.

भविष्यकथनाचा खोरा ह्मणजे येरूशालेम; शास्त्रांतील बहुतेक भविष्यें तिजविषयीं कथलेलीं आहेत, ह्मणून तिजला असें नांव दिल्हें आहे.

टीका २.

तेवेत महिन्याच्या दशमीस इस्राएलांवर आलेलीं तीन अरिष्टें.

गणना अ. १७ ओ. ११ एथें लिहिलेली पटकी, नेबूखादनेसाराचें चढून येणें आणि एज्रा जो याजक व लेखक याचा मृत्यु, या दुःखाच्या तीन गोष्टी तेवेत महिन्याच्या दशमीस घडून आल्या.

टीका ३.

किरयाथ सेफेर एथें जय मिळविणारा वीर.

कालेबास हेब्रोन हें शहर मिळाल्यावर त्यानें असा पण मांडिला होता कीं, जो कोणी किरयाथ सेफर हा गांव जाऊन घेईल, त्यास मी आपली कन्या देईन; यावरून त्याचा भाऊ ओथनीएल यानें जाऊन तो गांव जिंकून घेतला आणि तो पणहि जिंकला. न्यायाधीश अ. १ ओ १२—१५ पाहा.

टीका ४.

पहिल्या पाट्या.

मोशे सीनाय डोंगरावर असतां इस्राएलांनीं सोन्याचें वांसरूं केलें; आणि त्यामुळें मोशेनें वरून येतांना ईश्वरानें दिल्हेल्या पहिल्या पाट्या फोडून टाकल्या. ही गोष्ट याच दिवशीं घडून आली. इस्राएलाच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम या पुस्तकांत २४४८ हें वर्ष पाहा.

टीका ५.

नित्याचें अर्पण बंद होणें.

दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं रोमी लोकांनीं जेव्हां येरूशालेमेस वेढा

घातला, तेव्हां अर्पणाचे पशु मिळत नाहीं असें झालें, ह्मणून नित्याचें अर्पण बंद पडूं लागलें, आणि तें पहिल्यानें तम्मूज महिन्याच्या सतराव्या तारखेस बंद पडलें. इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम या पुस्तकांत ३८२८ वें वर्ष पाहा.

टीका ६.

एग्लाईमाचा आक्रांत.

एग्लाईम हें मोआब देशांतील एक नगर होतें. त्याचें नांव शास्त्रांत यशाया अ. १५ ओ ८ एथें सांपडतें. या अध्यायांत मोआबाचा नाश होऊन एग्लाईमांत मोठा आक्रांत होईल असें ह्मटलें आहे; ह्मणून कवीनें एथें त्याची उपमा घेतली आहे. कोणी ह्मणतात कीं, मोआब देशांत एग्लाईम नांवाची एक नदी होती; तिजमधील वाहते पाण्याचा आवाज फार मोठ्यानें होत असे, ह्मणून त्या आवाजाची उपमा एथें मोठ्या आक्रांतास दिल्ही आहे. कोणी एग्लाईम या शब्दाचा अर्थ इयोब अ. ३८ ओ. २८ एथील אֶגְלֵי טָל या शब्दांच्या अर्थासारखा करून दहिंवराच्या टांकांतून जसें दहिंवर वाहतें, तसे मी अश्रु गाळितों, असा करितात.

टीका ७.

हादादरिम्मोनाचा शोक.

हादादरिम्मोन हें मेगिद्दो या सपाटीवरील एक ठिकाण होतें. कालवृतांत अ. ३५ ओ. २४–२५ एथें लिहिल्याप्रमाणें योशीया राजास मिसराचा राजा फारो नीखो यानें या ठिकाणीं मारलें, ह्मणून लोकांनीं तेथें मोठा शोक केला. यावरून जेखार्या अ. १२ ओ. ११ एथें मोठा शोक करणें यास हादादरिम्मोनाचा शोक अशी उपमा दिल्ही आहे.

टीका ८.

दोन दिवसांनंतर सजीव होणें.

हें वाक्य होशेया अ. ६ ओ. २ एथें सांपडतें हें ह्मणणें बाबेलच्या व हल्लींच्या या दोन प्रवासांविषयीं आहे, ह्मणजे या दोन प्रवासांनंतर ईश्वर आपल्या परम दयेनें इस्राएलांचें तारण करील.

टीका ९.

आपोसतेमोस.

आपोसतेमोस याविषयीं गेमारा ताआनीथ अ. ४ याशिवाय शास्त्रांत किंवा इतिहासांत कोठेंच लिहिलेलें नाहीं. आणि तेथेंहि याची ही गोष्ट पूर्वज सांगत आल्यावरून लिहिली आहे, असें एक टीकाकार ह्मणतो. कित्येक असें ह्मणतात कीं, आन्तिओखोस एपिफेनस, ज्यानें दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं येरूशालेमेवर चढून येऊन तें मंदिर विटाळलें, आणि इस्राएलामधून शाब्बाथ, सुंता इत्यादि मुख्य नियम बंद करायास प्रयत्न केला, तोच हा आपोसतेमोस असावा.

टीका १०.

पवित्र ठिकाणीं मूर्त्तीची स्थापना.

२ राजे अ. २१ ओ. ७ एथें लिहिल्याप्रमाणें यहूदाचा राजा मेनश्शे यानें पवित्र मंदिरांत जी मूर्त्ति मांडिली, ती चौथ्या महिन्याच्या सतराव्या तारखेस मांडिली असें गेमारा ताआनीथ अ. ४ एथें लिहिलें आहे.

टीका ११.

तम्मुजमहिन्याच्या सतराव्या तारखेस इस्राएलांवर आलेलीं पांच अरिष्टें.

या तारखेस पहिल्या पाट्या फुटल्या, नित्याचें अर्पण बंद पडलें, येरूशालेम नगर फुटलें, आपोसतेमोसानें शास्त्र जाळलें, आणि पवित्र मंदिरामध्यें मूर्त्ति स्थापन झाली. येरूशालेम नगर या दिवशीं फुटलें याविषयीं इर्मेया अ. ५२ ओ. ६–८ आणि इस्राएलांच्या प्राचिन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम वर्ष. ३३३८ पाहा.

टीका १२.

शेशाख.

शेशाख हें नांव इर्मेया अ. २५ ओ. २६ आणि अ. ५१ ओ. ४१ या दोन ठिकाणीं मात्र सांपडतें. तें या दोन्ही ठिकाणीं बाबेलेस दिल्हें आहे. इब्री ग्रंथकारामध्यें शास्त्रांचा अर्थ करण्याच्या ज्या अनेक रीति आहेत, त्यांमध्यें תמורה ही एक रीति आहे. या रीतीनें את בש ह्मणजे א

या अक्षराबद्दल ת, ב या अक्षराबद्दल ש, ג या अक्षराबद्दल ר इत्यादि किंवा אל בם ह्मणजे א या अक्षराबद्दल ל, ב या अक्षराबद्दल מ, ג या अक्षराबद्दल נ इत्यादि, अशीं अक्षरें एकाबद्दल दुसरीं लावून अर्थ करण्याची रीति आहे. याप्रमाणें בבל या शब्दांतील तीन अक्षरांबद्दल वर सांगितलेल्या את בש या पहिल्या रीतीप्रमाणें अक्षरें लाविलीं, तर ששך या नांवांतून בבל असें नांव उत्पन्न होतें. यावरून ששך हें नांव בבל यास योजून लिहिलें आहे, असें सर्व इस्राएल व कित्येक खीस्ती टीकाकारहि मान्य करितात. आणि यावरून अशा रीतीनें शास्त्रांतील शब्दांचा व वाक्यांचा गुप्तार्थ काढण्याची रीति पूर्वीपासून चालत आली आहे, असें दिसून येतें.

टीका १३.

याजेरा सारखा शोक.

याजेर हें मोशेनें जिंकलेलें एमोऱ्यांचें एक शहर होतें. मोशेनें त्यांतील व आसपासच्या गांवांतील राहणाऱ्यांस जेव्हां हांकून लाविलें, तेव्हां त्या लोकांनीं मोठा आकांत केला; आणि यावरून मोठा शोक दर्शविण्याकरितां "याजेरासारखा शोक" अशी ह्मण झाली. या ह्मणीचा उपयोग येशाया अ. १६ ओ. ९ आणि इर्मेया अ. ४८ ओ. ३२ एथें केलेला आहे.

टीका १४

धूपाचा डोंगर

धूपाचा डोंगर हें नांव मोरीया डोंगर ज्यावर पवित्र मंदिर बांधलें होतें, त्यास दिल्हें आहे. हें नांव देण्याचें कारण असें कीं, पवित्र मंदिर स्थापन असतां त्या डोंगरावर नित्य धूप जळत असे.

टीका १५.

"माझ्या लेंकरांविषयीं व माझ्या हाताच्या कामाविषयीं मला आज्ञा कराल काय?"

हें वाक्य यशाया अ. ४५ ओ. ११ एथें सांपडतें. जेव्हां सर्वसमर्थ परमेश्वर आपल्या परम दयेनें आपला पुत्र इस्राएल याचें तारण करील, तेव्हां त्यास कोणी आड येऊं शकणार नाहीं, आणि त्याच्या पुत्राविषयीं व त्याच्या हाताच्या कामांविषयीं अन्य राष्ट्रांतून कोणीहि कोणत्याहि प्रकारें त्यास आज्ञा

करूं शकणार नाहीं; परंतु ज्या वेळीं इस्राएलाचें तारण करणें तो मनावर घेईल; त्याच वेळीं तो करूं शकेल, अशा अर्थाचें हें वाक्य आहे.

टीका १६.

हरणें.

ही उपमा शेलोमोचें गीत अ. ४ ओ. ५ वरून घेतली आहे. कोणी ती इस्राएलांकडे, कोणी पवित्र कोशाच्या काठ्यांकडे, आणि कोणी त्या कोशावरील केरूबांकडे लावितात.

टीका १७.

शेथीया दगड.

या दगडाच्या "शेथीया" या नांवावरून हा कांहीं पायाचा दगड असावा असें अनुमान होतें; आणि अशा अनुमानावरून हाखामीम लोक असें ह्मणतात कीं, ज्या डोंगरावर येरूशालेम नगर बांधलें होतें, त्या डोंगराच्या पायाचा हा दगड होता. कित्येक या नामाचा "शेथाया" असा उचार करून अनंत देवानें मांडलेला दगड असा अर्थ करितात. हा दगड पहिल्या भविष्यवाद्याच्या दिवसापासून अति पवित्र ठिकाणीं भूमीच्या वर तीन बोटें निराधार होता, असें משנה च्या יומה या भागांत सांगितलें आहे. पहिल्या पवित्र मंदिराच्या वेळीं सुगंधाचें धुपाटणें कोशाच्या दोन काठ्यांच्या मध्यें ठेवीत असत; परंतु दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं तें धुपाटणें या शेथीया दगडावर ठेवीत असत.

टीका १८.

वित्तेर.

रोमन लोकांनीं दुसऱ्या पवित्र मंदिराचा नाश केल्यावर निमित्तें काढून इस्राएलांवर ते फारच जुलूम करूं लागले. ज्या दिवशीं येरूशालेमेचा व पवित्र मंदिराचा दोन वेळ नाश झाला, त्या आब महिन्याच्या नवव्या तारखेस रोमन लोकांचा एक सण होता; त्या दिवशीं इस्राएल लोकांनीं आपणावर राज्य करणाऱ्या लोकांबरोबर आनंद करण्याबद्दल शोक केला. यावरून त्यांच्या अंगीं राजभक्ति नाहीं असा अरोप ठेवून त्यांजवर जुलूम चालविला.

एके वेळीं हानुक्काचे सणांत बादशाहाचा कोणी नातलग मेला; तेव्हां इस्रा-

एलांनीं आपणांवर राज्य करणाऱ्या लोकांसारखें दुःख दर्शविण्याबद्दल आपल्या सणाच्या नेमाप्रमाणें दिवे लाविले. परंतु राजाच्या कुटुंबास दुःख झाल्यावरून त्यांनीं ही आरास करून आनंद केला असें रोमन लोकांस वाटलें, व ह्यामुळें ते त्यांजवर जुलूम करूं लागले.

आणखी एक वेळ असें झालें कीं, बादशाहाच्या मुलीची स्वारी इस्राएलांच्या देशांतून जात असतां, तिच्या गाडीचा आंस मोडला. तो नीट करण्याकरितां तिचे शिपाई इस्राएलांच्या दारांसमोरील झाडें तोडूं लागले. हीं झाडें त्या इस्राएलांनीं आपल्या पुत्रांच्या व कन्यांच्या जन्माच्या आठवणीकरितां व त्यांच्या लग्नांच्या समयीं त्यांच्या लांकडांचे त्यांकरितां पलंग करण्याकरितां लाविलीं होतीं, ह्मणून तीं त्यांनीं तोडूं दिल्हीं नाहींत. यावरून आपणाविषयीं व बादशाहाविषयीं इस्राएलांच्या मनीं हेवा आहे, असें रोमन लोकांस वाटून ते त्यांजवर जुलूम करूं लागले.

हा जुलूम सहन न झाल्यामुळें इस्राएलांनीं बंडावा करून लढाई चालू केली. या लढाईंत बारकोखाब व रिब्बी आकीबा हे पुढारी होते. त्यांनीं अनेक लढाईंत रोमनलोकांचा पराजय करून एका वर्षांत पन्नास किल्ले व नऊशें पस्तीस शहरें जिंकून घेतलीं. या बरोबर येरूशालेम नगरही त्यांच्या हातीं आलें होतें; परंतु लढाई चालू असल्याकारणें त्याच्यानें तें पुनः बांधून पूर्वीप्रमाणें त्याची बंदिस्ती झाली नाहीं. शोमरोनाजवळ बित्तेर ह्मणून जें मोठें व बळकट नगर डोंगरावर होतें, त्याचीच त्यांनीं बंदिस्ती केली. या नगराविषयीं असें ह्मटलें आहे कीं त्याजमध्यें ४०० पाठशाळा, प्रत्येक शाळेंत ४००शिक्षक व प्रत्येक शिक्षकापाशीं शिष्यांची तशीच मोठी संख्या असे. एखाद्या शत्रूस त्यांतील विद्यार्थ्यांनींच हटविलें असतें; त्यांतील सैन्यामध्यें १६०००० फक्त करणे वाजविणारे होते. या शहराचा नाश झाल्यावर त्याजमध्यें जुन्या तफीलीनीनें भरलेल्या ३०००० पेट्या सांपडल्या. या शहरचें हें वर्णन फारच अतिशयोक्तिचें दिसतें, तरी त्यावरून तें फार मोठें व मजबूत असावें असें अनुमान होतें.

याप्रमाणें कांहीं दिवस इस्राएल लोक फारच बळावले; आणि त्यांच्या देशांतून रोमन लोकांचा राज्याधिकार लयास जाण्याच्या लागास आला होता. परंतु असे जय मिळाल्यावरून इस्राएल लोक व त्यांचे सैन्यपति फारच उन्मत्तपणें व निश्चितपणें वागूं लागले. आणि जसे येरूशालेमेच्या दुसऱ्या ना-

शाच्या वेळीं, तसे आपणांतच भांडूं लागले. यामुळें रोमन लोक पुन: ब-ळावून जे किल्ले व जीं शहरें इस्राएलांनीं घेतलीं होतीं तीं सर्व त्यांनीं परत घेऊन बित्तेर नगरास वेढा घातला. हा वेढा एक वर्षपर्यंत होता; आणि तो लांबवेल ह्मणून आंतील इस्राएलांनीं आंतून लांबपर्यंत भुयमार्ग खणिले होते. या मार्गांनीं त्यास अन्नाचा, हत्यारांचा व सहायासाठीं सैन्याचाहि पुरवठा होत असे; आणि जवळूनच एक नदी वाहत होती, तिजकडून पाण्याचा पु-रवठा होता. परंतु शोमरोनी लोकही इस्राएलांचा हेवा करीत असत, ह्म-णून त्यांनीं आपला वाद साधण्याकरितां शत्रूस हे भुयमार्ग दाखविले व त्यांनीं वेढलेल्या लोकांचा सर्व प्रकारचा पुरवठा बंद केला. जेव्हां असा प्रसंग आला, तेव्हां मोदीन शहरांतील एक वृद्ध रिब्बी एलीएझेर हा बित्तेर नग-राच्या तटावर चढून मोठ्या दु:खानें व उपास करून ईश्वराची प्रार्थना करूं लागला. याच्या भक्तिभावावरून ईश्वर खरोखर दयाकरील व बित्तेर न-गर शत्रूच्या हातीं कधींच लाभूं देणार नाहीं, अशी सर्व इस्राएलांची व शो-मरोनी लोकांचीही खात्री होती. मग एक शोमरोनी मनुष्य कृत्रीम करून शहरांत गेला; आणि शत्रूकडून रिब्बी एलीएझेरास कांहीं गुप्त निरोप आहे असें दर्शविण्याकरितां तो प्रार्थनेंत निमग्न असतां नकळत त्यापाशीं गेला. आणि परत जात असतां जवळच्या शिपायांनीं त्यास धरून बारकोखाबापाशीं नेलें. बारकोखाब त्यास ह्मणाला, तूं रिब्बी एलीएझेर याच्या कानांत काय सांगितलेंस तें सांग. तेव्हां खरें सांगीतलें तरी मरणार व खोटें सांगितलें तरी मरणार असें जाणून तो ह्मणाला कीं, मेलों तरी मजसांगातें शत्रूनें पाठविलेला गुप्त निरोप सांगणार नाहीं. मग बारकोखाबानें रिब्बी एलीएझेरास आपणासमोर बोलावून त्या शोमरोनी मनुष्यानें त्याच्या कानांत काय सांगितलें तें विचारलें. परंतु त्या शोमरोनी मनुष्यानें खरोखर त्याशीं कांहींच भाषण केलें नव्हतें, ह्मणून त्यानें ती सर्व गोष्ट नाकारिली. या-वरून बायकोखाबास राग येऊन त्याने त्यास लातेनें उडविलें व तो तेथेंच लागलाच मरण पावला. रिब्बी एलीएझेराच्या मरणामुळें बित्तेर शहराकरितां सर्व लढणारांचें धैर्य खचलें; आणि वेढलेले इस्राएलांची सर्व प्र-कारें तंगचाई झाल्यामुळें रोमन लोक हल्ला करून शहरांत शिरले. तरी इ-स्राएल लोक मोठ्या शौर्यानें लढले; आणि असें तुंबळ युद्ध झालें कीं, र-क्ताच्या नद्या वाहिल्या; आणि शत्रूनें असा जुलूम केला कीं, एका दगडा-

खालीं ३०० मुलांचीं डोंकीं चेंचून त्यांस मारिलें असें ह्मणतात. याप्रमाणें इस्राएलांवर महासंकट येऊन बित्तेर शहराचा नाश झाला तोहि आब महिन्याच्या नवव्या तारखेसच इशवी सन १३४ मध्यें झाला.

टीका १९.

येहोयारीबाचा पहारा.

१ कालवृत्तांत अध्याय २४ एथें सांगितल्याप्रमाणें दावीदानें पवित्रस्थानाच्या सेवेसाठीं जे चोवीस याजक नेमिले होते, त्यांमध्यें ओ. ७ प्रमाणें पहिली नेमणूक येहोयारीबाची होती. आणि ज्या अर्थी याप्रमाणें २४ याजकांची नेमणूक होती, त्या अर्थी दिवसाच्या प्रत्येक तासास एकाची नेमणूक असावी; आणि येहोयारीबाची नेमणूक पहिलीच होती ह्मणून ती संध्याकाळच्या पहिल्या तासांत असावी. यावरून "मी येहोयारीबाच्या पहाऱ्यावर पहारा करीत असतां," या लिहिण्याच्या संप्रदायाचा अर्थ "मी संध्याकाळच्या पहिल्या पहाऱ्याच्या वेळीं अथवा पहिल्या तासांत पहाऱ्यावर असतां," असा होतो.

टीका २०.

सेफाराद.

युरोपांतील स्पेन आणि पोर्तुगाल देशांस इब्री भाषेंत सेफाराद असें ह्मणतात. या देशांत पंधराव्या शतकांत आणि विशेषेंकरून १४८१ या वर्षी राजा फर्डिनान्ड व त्याची राणी इझेबेला यांकडून इस्राएलांचा पराकाष्ठेचा छल होऊन कित्येकांस त्यांनीं जुलमानें खिस्ती केलें, कित्येकांस त्यांचें सर्व द्रव्य घेऊन जिवें मारिलें, आणि राहिलेल्यांस आपल्या देशांतून हांकून लाविलें.

टीका २१.

इश्माएली लोकांनीं मारलेले ऐशीं हजार.

यशाया अ. २१ ओ. १३–१४ यांजवर रशीनें केलेली टीका व इर्मेयाचे विलापावर केलेली मिद्राश नामें टीका यांजमध्यें असें लिहिलें आहे कीं, बाबेलचा राजा नेबूखादनेसार हा जेव्हां येरूशालेमेवर चढून आला, आणि अतिशय नाश करूं लागला, तेव्हां ऐशीं हजार अधिकारी लोक जीव घेऊन रानांत पळाले, तेथें इश्माएली लोकांस पाहून, तेहि आब्राहामाचें संतान आहेत, ह्मणून आश्रय देतील, या आशेनें त्यांजकडे गेले. परंतु त्यांनींहि आपला वाद साधिला. जेव्हां

त्यांनीं त्यांपाशीं प्यावयास पाणी मागितलें, तेव्हां ते दग्यानें ह्मणाले कीं, पहिल्यानें कांहीं खा, मग पाणी प्या. त्यांच्या या भाषणावरून त्यांस हें निष्कपटाचे व प्रीतीचे भाषण असें वाटलें. परंतु त्यांनीं त्यांस खारविलेलें अन्न दिल्हें आणि त्यामुळें त्यांस अधिक तहान लागली. मग पाणी मागूं लागले तेव्हां त्यांनीं हवेनें भरलेल्या मसका त्याच्या तोंडांशीं धरिल्या आणि त्या मसकांतील हवा त्यांच्या तोंडांत फुंकल्यावरून त्यांचीं पोटें फुगून ते ऐशीं हजार लोक इस्माएली लोकांच्या हातून मारले गेले.

टीका २२.

याजकाच्या रक्तासाठीं मारले गेलेले.

हें वाक्य येहोयादाचा पुत्र जेखार्या याजक याजविषयीं लिहिलें आहे. योआश राजाच्या वेळीं इस्राएल पुनः मूर्त्तिपुजा करूं लागले, तेव्हां येहोयादाचा पुत्र जेखार्या याजक याजवर ईश्वरी आत्मा येऊन त्यानें त्यांचा निषेध करून त्यांच्या नाशाविषयीं भविष्यकथन केलें. यावरून लोकांनीं त्याजवर उठून त्यास उपाध्यांच्या आंगणांत जिवें मारिलें; तेव्हां तो ह्मणाला "परमेश्वर पाहून न्याय करील" ही गोष्ट २ कालवृत्तांत अ. २४ ओ. १७–२२ एथें सांपडते. याजविषयीं मिद्राशमध्यें अशी टीका आहे कीं, जेथें तो मारला गेला, त्या आंगण्याच्या फरसबंदीवर त्याचें रक्त उकळ्या देत असतां, नेबूखादनेसाराचा सरदार नेबूझारआदान हा येरूशालेमेवर चढून आल्यावर त्याच्या नजरेस जेव्हां हें आलें; तेव्हां त्यानें त्याविषयीं इस्राएलांजवळ चौकशी केली. ते ह्मणाले कीं, हें गोऱ्हयांचें व मेंढ्यांचें रक्त आहे. परंतु त्यास संशय उत्पन्न होऊन त्यानें गोऱ्हयांचें, मेंढ्यांचें व दुसऱ्या किलेक पशूंचें रक्त तेथें आणविलें; परंतु तें त्या रक्ताशीं जमलें नाहीं; आणि जेखार्याच्या रक्ताचा उकळ बंद राहिला नाहीं. मग तो इस्राएलांस ह्मणाला, खरें सांगा; नाहीं तर मी तुमचें मास खवणीनें खवणीन. तेव्हां त्यांनीं झालेलें सर्व वर्तमान खरोखर सांगितलें. मग आतां मी त्याचा सूड उगवितों, असें ह्मणून त्यानें मोठे सनहेद्रीम ह्मणजे न्यायसभेचे लोक, त्यांमागून लहान सनहेद्रीमचे लोक, त्यांमागून तरुण याजक लोक, शेवटीं तान्हीं बालकें आणून तेथें मारिलीं; तरी तें रक्त शांत होईना. मग तो जेखार्यास हाक मारून ह्मणाला, हे जेखार्या! तुझ्या लोकांतील उत्तम यांस तर मीं मारिलें; आतां

मी सर्वांचा नाश करावा अशी तुझी इच्छा आहे काय? हे शब्द त्याच्या मुखांतून निघतांच त्या रक्ताच्या उकळ्या बंद झाल्या. शेवटीं नेबूझार-आदान यासहि पश्चात्ताप होऊन त्यास असें वाटलें कीं, जो रक्त पाडतो, त्याचें रक्त पाडिलें जावें हा न्याय आहे. मग मी एवढ्या लोकांचें रक्त पाडिलें ह्मणून माझी दशा काय होणार! अशा त्याच्या पश्चात्तापावरून ईश्वरास करुणा आली, आणि तें रक्त लागलेंच तेथच्या तेथें आटून गेलें. ही गोष्ट ३१०० या वर्षी घडून आली. इस्राएलांच्या प्राचीन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम यांत पाहा.

टीका २३.

सर्व रात्रींपेक्षां आजची रात्र कशामुळें निराळी आहे?

हा प्रश्न मुळीं पेसाहाच्या पहिल्या दोन रात्री हाग्गादामध्यें केला जातो. परंतु सप्तकांतील ज्या दिवशीं पेसाहाचा पहिला दिवस असतो, त्याच दिवशीं तिशआवेआव येतो, ह्मणून एथें या रात्रीविषयींही तोच प्रश्न करून या गीतांत पेसाहाची व तिशआवेआवची तुळणा केली आहे.

टीका २४.

याखीन व बोआझ.

याखीन व बोआझ हीं शेलोमोनें बांधलेल्या पवित्र मंदिरांतील दोन खांबांचीं नांवें होतीं. हे खांब पितळेचें होते. त्यांचें पूर्ण वर्णन १ राजे अ. ७. ओ. २१–२२ आणि इर्मेया अ. ५२ ओ. २१–२३ एथें सांपडतें. याखीन या नांवाचा अर्थ "(ईश्वर) स्थापन करील" असा, आणि बोआज या नांवाचा अर्थ "त्यांत (ईश्वरांत) बळकटी आहे" असा होतो. या खांबांस हीं नांवें योजून या मंदिरास ईश्वरानें स्थापन करून बळकटी द्यावी असें शेलोमोनें इच्छिलें होतें.

टीका २५.

आरावनाचा खळा.

आरावना हा येरूशालेमेंत राहणारा एक यबूसी होता. दावीदानें लोकांची गणती केल्यामुळें ईश्वराचा राग होऊन जी पटकी उठली होती, ती बंद होण्याकरितां गाद भविष्यवाद्यानें दावीदास सांगितलें कीं, आरावना यबूसी याच्या खळ्यांत वेदि बांध व तेथें होम कर. तेव्हां दावीद तो खळा

त्याजवळ विकत मागूं लागला; परंतु ही जागा ईश्वरी पूजेकरितां दावीद मागतो, असें जेव्हां आरावनानें पाहिलें; तेव्हां तो ती जागा, व होमाकरितां बैल, लांकडें इत्यादि फुकट देऊं लागला. परंतु दावीदानें न ऐकतां त्यास किंमत देऊन तो खळा विकत घेतला व तेथें वेदि बांधून होम केला; तेव्हां ईश्वरी कोप शांत झाला. हा खळा येरूशालेमेंत मोरीया डोंगरावर होता; आणि त्याच ठिकाणीं शेलोमोनें पवित्र मंदिर बांधलें होतें. २ शेमूएल अ. २४ पाहा.

टीका २६.

इथोन व तेदी.

पवित्र मंदिरीं इस्राएलाच्या अंगणास जे सात दरवाजे होते, त्यांतील एक दरवाजाचें नांव इथोन असें होतें; यास बहुत करून निकानोराचा दरवाजा असें ह्मणत. आणि तेदी हा मंदिराच्या दक्षिण बाजूच्या भिंतींतील दरवाजा होता. असें गेमारा मिद्दोथ अ. १ एथें सांपडतें.

टीका. २७.

लिशकाथ हाग्गोला.

दुसऱ्या पवित्र मंदिरीं लिशकाथ हाग्गोला या नांवाची एक कोठडी होती. बाबेलच्या प्रवासांतून परत आलेल्या लोकांनीं तिजमध्यें एक विहीर खणिली होती; या विहिरीचें पाणीं त्या मंदिराच्या सर्व अंगणांत पुरत असे असें गेमारा मिद्दोथमध्यें सांपडतें.

टीका २८.

एबेन हाज्जोहेलेथ.

एबेन हाज्जोहेलेथ या नांवाचा अर्थ सरपटणारा दगड असा होतो. या दगडाविषयीं शास्त्रांत १ राजे अ.१ ओ. ९ एथें लिहिलें आहे. या दगडास असें नांव पडण्याच्या कारणाविषयीं अनेक मतें आहेत. कोणी ह्मणतात कीं तरुण लोक आपली शक्ति ताडून पाहाण्याकरितां तो ओढीत असत; कोणी ह्मणतात कीं त्याजवळून एन रोगेल हा झरा वाहात होता ह्मणून; कोणी ह्मणतात कीं त्या दगडाचा आकार सरपटणाऱ्या प्राण्यासारखा होता ह्मणून त्यास असें नांव पडलें. योनाथानाच्या तर्गूम भाषांतरांत असें आहे, कीं हा द-

गड उंच होता, आणि नजर फार दूर जावी ह्मणून लोक त्याजवर उभे राहात असत.

टीका २९.

आद्रीआनोस केसार.

हा रोम शहराचा बादशाहा होता; त्याचें पूर्ण नाम ईलीयस आद्रीयन असें होतें. हा इशवी सन ११७ च्या सुमारास राज्य करूं लागला. यानें येरूशालेम नगर पुनः बांधून त्यास आपल्या नांवासारखें "ईलीया क्यापिटोलीना" असें नांव दिल्हें, पवित्र मंदिराच्या ठिकाणीं ज्युपिटर ह्मणजे बृहस्पति याचें देऊळ बांधलें, आणि इस्राएलांस येरूशालेमेजवळ जाण्याची सक्त मनाई केली. याच्याच वेळीं बित्तेर शहराचा नाश झाला. यानें इस्राएलांस अतिशय छळिलें.

टीका ३०.

दोन हजार वर्षें राखून ठेवलेलें शास्त्र.

नीति अ. ८ ओ. २२–२५ यावरून कित्येक राबी लोक असें अनुमान करितात, कीं मोशेच्या हातून इस्राएलांस दिल्हेलें शास्त्र पृथ्वीच्या उत्पत्तीच्या दोन हजार वर्षांपूर्वीं उत्पन्न झालें होतें. परंतु कित्येकांचें ह्मणणें असें आहे, कीं पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर सुमारें दोन हजार वर्षें होऊन जातपर्यंत ईश्वरानें तें कोणासही दिल्हें नाहीं; परंतु मोशे जो २३६८ व्या वर्षीं जन्मला त्याच्या हातून २४४८ व्या वर्षीं तें त्यानें इस्राएलांस दिल्हें. इस्राएलांच्या प्राचिन इतिहासांतील गोष्टींचा कालानुक्रम या पुस्तकांत पाहा.

टीका ३१.

सनहेद्रीन.

सनहेद्रीन हा ग्रीक भाषेंतील शब्द आहे. या शब्दाचा उपयोग शास्त्रांत कोठेंच केलेला नाहीं; परंतु मागाहून झालेल्या ग्रंथांत सांपडतो. ग्रीक भाषेंत याचा अर्थ एकत्र बसणें असा होतो, परंतु इत्री ग्रंथांत न्यायसभा अशा अर्थानें या शब्दाचा उपयोग केलेला आहे. गणना अ. ११ ओ. १६–१७ या वाक्यांवरून या न्यायसभेची स्थापना मोशेच्या वेळेपासून होती असें अनुमान होतें; परंतु तिजला सनहेद्रीन हें नांव दुसऱ्या पवित्र मंदिराच्या वेळीं

पडलें. सनहेद्रीन हें लहान व मोठें असें दोन प्रकारचें असे. लहान सनहेद्रीनांत तेवीस सभासद असत; आणि मोठ्या सनहेद्रीनांत एकाहत्तर सभासद असत. हे सभासद ईश्वरभक्त, विद्वान, अनेक भाषा जाणणारे, शाहाणे व नम्र असून ते लोकांकडून नेमिले जात असत; त्यांस कांहींच वेतन नसे, प्रत्येकास आपला धंदा करून हें काम करावें लागत असे. ज्या गांवीं एकशें वीस कुटुंबें असत, त्या गांवीं एक लहान सनहेद्रीन असे. याशिवाय येरूशालेमांत दोन लहान व एक मोठें अशीं तीन सनहेद्रीनें असत. लहान सनहेद्रीन प्रत्येक सोमवारीं व गुरुवारीं भरत असे; त्यास दिवाणी व फौजदारी मुकदम्यांचा व देहांतशिक्षा करण्याचा अधिकार असे. येरूशालेमेंतील पहिलें लहान सनहेद्रीन पवित्र मंदिराच्या हार हाब्बींइथ या ठिकाणीं, दुसरें लहान सनहेद्रीन आजारा या ठिकाणीं, आणि मोठें सनहेद्रीन लिशकाथ हाग्गाझीत या ठिकाणीं भरत असे. हीं दोन्ही प्रकारचीं सनहेद्रीनें अर्धवर्तुलाकृतीनें बसत असत; अध्यक्ष हा मधोमध बसून दुसरे सभासद त्याच्या उजवीकडे व डावीकडे बसत असत, आणि शेवटास निवाडे लिहिण्याकरितां लेखक असत. कोणी ह्मणतात, कीं अध्यक्षाच्या उजवीकडे न्यायाधीश व डावीकडे मंत्री हे असत. अध्यक्ष सभेंत येतांना तो आपल्या जागीं जाऊन सर्वांस बसायास सांगेपर्यंत सर्व सभासद उभे असत; न्यायाधीस येतांना तो आपल्या जागीं जाऊन बसेपर्यंत उभे असत; आणि मंत्री येतांना प्रत्येक सभासद त्यास नमन करून आपल्या जागीं बसत असे. जर एखाद्या गोष्टीचा निवाडा बाहेर गांवच्या सनहेद्रीनाच्यानें न करवला, तर ती गोष्ट येरूशालेमेंतील पहिल्या सनहेद्रीनाकडे, त्याच्यानें न झाल्यास दुसऱ्या लहान सनहेद्रीनाकडे, व त्याच्यानेंही न झाल्यास ती गोष्ट मोठ्या सनहेद्रीनाकडे जात असे. या मोठ्या सनहेद्रीनाकडून झालेला निवाडा शेवटला असून फिरला जात नसे; कारण या मोठ्या सनहेद्रीनाचा अधिकार सर्वांहून मोठा असे; आणि कायदे करणें, ते अमलांत आणणें, लढाई चालू करणें व बंद करणें इत्यादि सर्व मोठमोठ्या कामांची सत्ता या सनहेद्रीनाच्या हातीं होती. यांचे सर्व ठराव बहुमतानें होत असत. जर एखाद्या वरच्या सनहेद्रीनांत एखादी जागा रिकामी झाली, तर ती त्याच्या खालच्यास व त्याची जागा त्याच्या खालच्यास आणि शेवटल्याची जागा खालच्या सनहेद्रीनांतील पहिल्यास अशा क्रमानें भरली जात असे.

वर्गणीदारांचीं नांवें.

मुंबई.

नांवें.	प्रती.
अ. शेमूएल इसाजी पिंगले. जस्टीस आफ धी पीस, डेप्यूटि एक्झामिनर पी. डब्ल्यू. आकौंट्स	२
,, आब्राहाम सकोबा पेणकर, चोगले.	१
,, रेऊवेन बिनयामीन पेणकर	१
,, हाईम रेऊबेनजी पेणकर.	१
,, दावीद हाय रेऊबेनजी पेणकर.	१
,, मोशे रेऊबेनजी पेणकर.	१
,, योसेफ शेमूएलजी ढोकरकर, मेस्त्री.	१
,, सीलेमान सकोजी भास्तेकर.	१
,, आब्राहाम शिमशोनजी रामराजकर.	१
,, मोशे शेमूएलजी आष्टमकर.	१
,, इसहाक बाबनजी थलकर....	१
,, आहारोन आब्राहामजी केहिमकर.	१
,, दावीद रेऊबेनजी कोर्लेकर.	१
,, आब्राहाम शेमूएलजी राजपूरकर.	१
,, शेमूएल शालोमजी बोरघरकर.	१
,, जे. एस. जेकब.	१
,, मोजेस स्यामूएल मिलरैट.	१
,, शेमूएल हाईमजी फनसापूरकर.	१
,, शालोम योसेफ पेणकर, हाज्जान.	१
,, शेमूएल याकोबजी खरीलकर, सु. पे.	१
,, शिमशोन मोशे दिवेकर, टौन सबपोस्टमास्तर.	१
,, दावीद शेलोमो बोरघरकर, चोगले.	१
,, आब्राहाम दावीदजी बोरघरकर, बेलीफ.	१
,, योसेफ रेऊबेनजी कोर्लेकर, मेक्यानिक फोरमन.	१

अ. शेमूएल शालोमजी आष्टमकर. १
,, मोशे एलीया राजपूरकर, चोगले. १
,, येहेजकेल शालोमजी कासूकर, गार्ड. १
,, शिमओन बिनयामीनजी चरीकर. १
,, शिमशोन शेमूएलजी आक्षीकर. १
,, याकोब बिनयामीनजी दांडेकर. १
,, शेमूएल मोशे किल्लेकर, चोगले. १
,, आहारोन शेमूएलजी किल्लेकर. १
,, आहारोन मोशे उमर्डेकर.... ... ... १
,, शिमशोन शालोमजी वरोलकर. १
,, याकोब आब्राहामजी शापूरकर. १
,, मोशे बिनयामीनजी कासुकर. १
,, मोशे शेलोमो काजी झिराटकर. १
,, शेमूएल बिनयामीन चोर्डेकर. १
,, बिनयामीन इसहाक तलकर. १
,, बिनयामीन दावीदजी वासकर. १
,, बिनयामीन शालोम गडकर... ... ... १
,, रेऊबेन शालोम गडकर. १
,, योसेफ आब्राहामजी तलकर, गवई. १
खानसाहेब हाईम शेलोमो चीचोलकर, सुपरवैझर, पी. डब्ल्यू. डी.... १
अ. शिमओन दानीएलजी कोलाटकर. १
,, मोशे बिनयामीन, स्टेशनमास्तर, बी. बी. आन्ड सी. ऐ. रेलवे.... १
,, एलीया शालोम वालवटकर. १
,, आहारोन शेलोमो वरसोलकर, मु. पे. १
,, शिमशोन मोशे काजी झीराटकर. १
,, योसेफ रेऊबेनजी पेझारकर. १
,, इसहाक एलीया शापूरकर... ... ... १
,, इसहाक आहारोनजी भास्तेकर... ... ... १
,, येहेजकेल इसहाकजी पुगांवकर, दाक्तर. १
,, आहारोन दानीएलजी तलकर, चोगले. १

अ. शेमूएल सिलेमानजी वरोलकर...	... ...	१
,, मोशे येहेजकेलजी तलकर. ...	... ...	१
,, दावीद सिलेमानजी पेझारकर...	... ...	१
,, योएल शेमोएलजी शिरकोलकर दाक्तर. ...	... ...	१
,, याकोब एलीया पिंगळे...	... ...	१
,, याकोब शेमूएलजी शिरकोलकर.	... ...	१
,, एज्रा रेऊबेन नौगांवकर, बी. ए.	... ...	१
,, एज्रा शेमूएल तलकर. ...	... ...	१
,, लेवी येहेजकेल तलकर. ...	... ...	१

बेने इस्राएल बालोत्तेजक सभेच्या तर्फे.

रेवरेन्ड जे. एच. लॉर्ड. ...	... ...	१
अ. योसेफ आहारोन तलकर.	... ...	१
,, इसहाक आब्राहामजी शापूरकर.	... ...	१
,, शेमूएल मोशे राजपूरकर. ...	... ...	१
,, मीखाएल रेऊबेनजी मलेकर.	... ...	१
,, रेऊबेन येहेजकेलजी मलेकर.	... ...	१
,, दानीएल दावीदजी मलेकर.	... ...	१
,, मेनश्शे हाईमजी वामनोलकर.	... ...	१
,, बिनयामीन एलीएझेरजी वामनोलकर. ...	... ...	१
,, रेऊबेन आब्राहामजी भिजेकर, मेस्त्री. ...	... ...	१
,, रेऊबेन सीलेमानजी नागांवकर, मेस्त्री. ...	... ...	१

पुणें.

अ. बिनयामीन शालोमजी नागांवकर, सु. मे. पे.	... ...	१
,, रेऊबेन येहेजकेलजी झशीलकर, सु. पे. ...	... ...	१
,, एलीएझेर शिमशोनजी किल्लेकर, सु. पे. ...	... ...	१
,, शालोम शेमूएलजी चरीकर, ज. पे. ...	... ...	१
,, शिमओन शेमूएलजी चरीकर.	... ...	१
,, शिमशोन योसेफ शिमशोनजी किल्लेकर. ...	... ...	१
,, शेमूएल निस्सीमजी कोर्लेकर, दाक्तर. ...	... ...	१
,, इसहाक शेमूएलजी आष्टमकर, दाक्तर. ...	... ...	१

अ. येहेजकेल शिमशोनजी किह्लेकर, दाक्तर, पे. १
,, शाऊल येहेजकेलजी नागांवकर. १
,, आब्राहाम दानीएल बेनजामिन कांदलेकर, सिगनलर... ... १
,, दानीएल आब्राहामजी चरीकर. १
,, दानीएल राहामीम तलकर, सु. मे. बा. पे. १
,, सालोमन एलायझा वांकुलकर, सु. मे. स. बा. पे. १
,, आब्राहाम बिनयामीन शिरगांवकर, सु. पे. १
,, शालोम शेमूएलजी तलकर, सु. पे. १
,, एलीएझेर दानीएलजी कोलेटकर, ड्राफ्समन. १
,, आहारोन दानीएलजी तलकर, रैटर. १
,, आहारोन येहेजकेल सानकर, रैटर. १
,, शेमूएल मोशे आष्टमकर, सु. पे. १
,, रेऊबेन आहारोन दीघोरकर, दाक्तर. १
,, योसेफ शेलोमो झीराटकर. २
,, आब्राहाम शेमूएल दिवेकर, सु. पे. १
,, शेमूएल शेलोमो झिराटकर. १
,, रेऊबेन शेलोमो झिराटकर. १
,, सा रन शालोम आपटेकर. १
,, जे. जेकब. १
,, इसहाक शेलोमो घोसालकर. १
,, हाईम शालोमजी बंदरकर, मेस्त्री. १
,, दावीद शेलोमो झीराटकर. १
,, शालोम रेऊबेन आष्टमकर. १

कराची.

अ. राहामीम स्यामूएल भास्तेकर, स्टेशनमास्तर. १
,, ज्यूडा स्यामूएल ह्लेडेकर, क्लार्क. १
,, दावीद बनाजी नागांवकर, मेस्त्री. १
,, शालोम रेऊबेन शिमशोन कामरलेकर, क्लार्क. १
,, ईलाईझा एरन नागोठणेकर, मेक्यानिक. १
,, शालोम दावीदजी उमर्डेकर, म्युनिसिपल सर्वेर. २

अ. दावीद मुसाजी दीघोरकर, सु. पे. १
,, एहेजकेल शेमूएलजी तलकर, रैटर. पे. १
,, दावीदजी दानीएलजी नागांवकर, हेडक्लार्क. १
,, गेरशोन शालोमजी उमर्डेकर, ओव्हरसीयर, पी. डब्ल्यू. डी. ... १
,, येलीएझेर विनयामीनजी कांदलेकर, दाक्तर. १
,, मोशे येलीया पेणकर, दाक्तर हा. आ. १
,, रेऊबेन आहारोनजी भोनकर, हे. क्ला. पे. १
,, शालोम येहेजकीएल सायगांवकर, दाक्तर. १
,, रेऊबेन मुसाजी सातामकर, मेस्त्री. १
,, शेमूएल विनयामीनजी भास्तेकर, ड्राप्समन पी. डब्ल्यू. डी. ... १
,, याकोबजी दानीएलजी कांमरलेकर. १
,, दावीद मुसाजी घोसाळकर, कूपर. १

रेवदंडा.

अ. शेमूएल योसेफ राजपूरकर, हाज्जान पंतोजी. १
,, योसेफ एलीया शापूरकर. १
,, इसहाक धमाजी सानकर, शम्माश. हा. पे. १
,, आहारोन येलोजी पेणकर, हाज्जान. १
,, इसहाक सीलेमानजी आष्टमकर. १
,, शालोम एलिया शापूरकर. १
,, शालोम आहारोनजी ढोकरकर. १
,, आहारोन दावीदजी ढोकरकर. १

ठाणें.

अ. शालोम मोशे पेणकर, सु. मे. पे. १
,, शेमूएल इसहाकजी जावलीकर, सु. मे. स. बा. पे. १
,, शेमूएल मोशे नागांवकर, सु. गब्बाय. १
,, दानीएल विनयामीनजी गारसुलकर, दाक्तर, पे. १
,, राहामीम इसहाकजी पिंगले, रैटर. १
,, आब्राहाम रेऊबेनजी आष्टमकर. १
,, योसेफ इसहाकजी दिवेकर, क. मु. ४

नागपूर.

अ. शालोमजी येलोजी चेऊलकर, हेड मेस्त्री.... ... ... १
,, शिमशोन दानीएलजी पेणकर, मेस्त्री. १
,, आब्राहाम येलोजी चेऊलकर, आसिस्टंट क्यारेज आन्ड व्यागन फोरमन. १
,, बारूख सिलेमानजी वरसोलकर. १
,, येहूदा आहारोनजी येरूलकर, फिटर. १
,, राहामीम हाईमजी मलेकर. १

अहमदाबाद.

अ. योसेफ शिमशोनजी सानकर, आपोथीकारी. १
,, योसेफ शेलोमो दांडेकर, दाक्तर. १
,, शेमूएल योसेफजी दांडेकर. १
,, इसहाकजी मोशेजी कोलेटकर, फौजदार १
,, शेमूएलजी सीलेमानजी काजी झिराटकर, मु. पे. १
,, हाईमजी शेमूएलजी काजी झिराटकर. १

पनवेल.

अ. आहारोन शिमशोन आष्टमकर हेल्थ आफिसर, ... १
,, इसाजी शेमूएलजी नागांवकर, आणि बंधु. १
,, योसेफ आहारोनजी खुलाबकर. १
,, आब्राहाम दावीदजी भाचेकर... ... ... १
,, शालोम बापुजी बामलोनकर.... ... ... ४
,, शेमूएल आब्राहामजी तरणखोपकर, पंतोजी. १

बीना.

अ. एलीएझेर सिलेमानजी तलकर. १
,, योसेफ याकोबजी मेंद्रीकर. १
,, योसेफ दानीएलजी कामरलेकर. १

कुरलें.

अ. हाईम शेमूएलजी चरीकर, मेस्त्री. १
,, रेऊबेन आब्राहामजी बेलकर, मेस्त्री. १

आलीबाग.

अ. सिलेमान सत्केलजी कोगबानकर, सु. पे.... ... ... १
,, सिलेमान योसेफजी तलकर, सु. पे. १

रोहें.

अ. आहारोनजी दावीदजी मल्यानकर, हा. पे... ... ... १

वरसोली.

अ. दावीद येलीया शापूरकर... ... ... १

लोनावली.

अ. शेमूएल हासकेलजी वरवटनेकर. १

अहमदनगर.

अ. बापुजी आब्राहाम वरघरकर, सु. पे. १

बऱ्हाणपूर.

अ. याकोब शेमूएलजी वासकर, दाक्तर. १

कपडवंज.

अ. आब्राहाम शालोमजी पेझारकर, दाक्तर. १

डीसा.

अ. ए. इ. बेनजामीन कांदलेकर, गव्हरमेंट टेलेग्राफर १

चरखी दादरी स्टेशन.

अ. इसहाक विनयामीनजी कांदलेकर, इन्स्पेकटर. १

प्रांतीज.

अ. योसेफ विनयामीन वामनोलकर, दाक्तर. १

नीमच.

अ. याकोब येहेजकेलजी पिंगले, गार्ड. २

शिमोगा.

अ. आब्राहाम शेमूएलजी नागांवकर एल्. सी. ई. एक्झीक्युटिव इन्जिनीयर. १

रेजिमेन्ट ८ वें.

अ. शेलोमो दानिएलजी कोर्लेकर, सु. मे. २

अ. येहूदा येलीया आष्टमकर, हा. पे. रैटर. १
,, रेऊबेन शेलोमो वर्सोलकर, क्वार्टर मास्तर हा. १

रेजिमेन्ट १७ वें.

अ. येहूदा याकोबजी कासूकर, जमादार. १
,, शेलोमो मोशे कोलाटकर, क्वार्टर मास्तर हा. १

रेजिमेन्ट २४ वें.

अ. एज्रा शेमूएल भोनकर. १

रेजिमेन्ट २५ वें.

अ. आर. शालोमजी आगरवारकर, दाक्तर. १

बेने इस्राएल बालोत्तेजक सभा.

अवश्य वाचा व **सहाय करा.**

पुस्तकालय.

ही सभा डिसेंबर ता० १६ सन १८८८ दिवशीं स्थापन झाली व तिचा पहिला वार्षिक समारंभ डिसेंबर ता० २२–२३ सन १८८९ मध्यें झाला. या सभेचा उद्देश तरुणांस नीतीचें वळण लावण्यास, त्यांकडून चांगला विद्याभ्यास करविण्यास, त्यांस वक्तृत्वानें भाषण करण्याचा सराव पाडण्यास, सर्वांशीं स्नेहभावानें वागण्यास आणि धर्मावर श्रद्धा ठेवण्यास उत्तेजन देण्याचा आहे. हा उद्देश पूर्ण व्हावा ह्मणून प्रत्येक रविवारीं संध्याकाळीं सभा भरून तेथें सभासदांकडून अनेक विषयांवर शक्त्यनुसार निबंध वाचले जातात व व्याख्यानें दिलीं जातात व त्यांवर वादविवाद होत असतात. आणि तरुणांनीं आपला वेळ व्यर्थ दवडूं नये आणि त्यांस पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचण्याची गोडी लागून अनेक राष्ट्रांच्या उत्कर्षाचीं व आपकर्षाचीं कारणें कळूं यावीं आणि आपल्या लोकांची हल्लींची निकृष्ट स्थिति सुधारण्याचे उपाय सुचावे ह्मणून पुस्तकालय काढिलें आहे. या पुस्तकालयास हल्लीं तीनशाहून अधिक इंग्लीश, मराठी व इब्री पुस्तकें मिळालीं आहेत व कांहीं उदार ग्रहस्थांकडून मदत झाली आहे व आणखी होण्याची आशाही आहे. परंतु हीं कामें सतत चालावींत ह्मणून ह्या सभेकडून सर्व इस्राएल बांधवांस व बायांस विनंति करण्यांत येते कीं, त्यांनीं आपणांकडून व आपल्या मित्रमंडळीकडून मदत करावी, कारण या सत्कार्यास मदत केल्यानें आपण सर्व इस्राएल बांधवांस व त्यांच्या लेंकरांस उत्तेजन दिलें असें होईल.

या पुस्तकालयासंबंधानें मेहेरबान सेलीम एस. सालोमन, आंग्लोज्यूइश आसोसिएशनच्या मुंबईतील शाखेचे आनरेरी सेक्रेटरी, मेहेरबान एज्रा रेऊबेन नागांवकर बी. ए. व दुसऱ्या कांहीं सद्ग्रहस्थांनीं आपलीं चांगलीं मतें दर्शविलीं आहेत.

या संबंधीं विशेष माहिती खालीं सही करणाराकडे मिळेल. आश्रय पाठविणारांनीं अ. आब्राहाम रेऊबेन भिंजेकर खजीनदार, ठिकाणा डोंगरी बाजार, पोस्ट उमरखाडी मुंबई, यांच्या नांवें पाठविल्यास आभारपूर्वक मान्य केला जाईल.

आपला नम्र,

मुंबई,
ता० १५ जुलई, १८९०.

विनयामीन एलीएजेर वामनोलकर,
चिटणीस.

त्वरा करा व सभासद व्हा! आयुष्य क्षणभंगुर आहे!! मरण केव्हां येईल याचा भरंवसा नाहीं!!!

हिशेब चोख.

स्वजनकल्याणेच्छु सभा.

व्यवस्था नीट.

समस्त इस्राएलबंधुजनांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, वरील नांवाची मंडळी स्थापन झाली आहे. मंडळीचे हेतु फारच फायदेशीर असून "**स्वार्थ**" व "**परमार्थ**" दोन्ही घडण्याचा संभव आहे तर सर्वांनीं या सभेपासून लाभ करून घेण्याची संधी दवडूं नये. सर्वांस सभासद होण्यास सुलभ पडावें ह्मणून वर्गणीदारांचे "अ" आणि "ब" असे दोन वर्ग केले आहेत.

"अ" या प्रथम वर्गाच्या सभासदांच्या चार प्रती केल्या आहेत. त्यांची मासिक वर्गणी अनुक्रमें १ रुपया, बारा आणे, आठ आणे, आणि चार आणे आहे. वर्गणीचा ४ था हिस्सा वर सांगितलेल्या धर्म-कृत्यास व मुख्यत्वें करून "बेने इस्राएल आर्फनेज" (निराश्रित बालगृह) फंडामध्यें जमा केला जाईल व बाकीचे तीन हिस्से सभा-सदांच्या मागें त्यांच्या कुटुंबास किंवा वारसांस परत करण्यांत येतील.

"ब" या दुसऱ्या वर्गणीदारांच्या सभासदास फक्त प्रवेश फी दोन रुपये पडतील, एखादा सभासद मरण पावेल तेव्हां प्रत्येक सभासदास एक रुपया द्यावा लागेल. हे जमलेले रुपये मृत सभासदाचे कुटुंबास किंवा वारसास पावती घेऊन देण्यांत येतील. जर पांचशें सभासद असले तर त्या मृत सभासदाचे कुटुंबास त्याच्या पश्चात् ५०० रुपये मिळण्याचा संभव आहे.

स्त्री व पुरुष या सर्वांस या सभेचे सभासद होतां येतें; पण सभा-सदाचें वय २० वर्षांचे वर व ६० वर्षांचे आंत असून तो साधारण सशक्त असला पाहिजे. हें पाहणें चिटणीस व डैरेक्तर यांजकडे आहे.

कोणी उदार गृहस्थानें देणगी दिल्यास तिचा आभारपूर्वक स्वीकार केला जाईल. विशेष माहिती चिटणीसांकडे मिळेल.

आपला नम्र,

शिमशोन शमोएल आक्षीकर,

चिटणीस,

डोंगरीस्ट्रीट घरनंबर ४३, मांडवी.